ऑगस्ट २०१६ / पाने ६० / किंमत ₹ १०

# लोकराज्य



## आदिवास ते अग्रक्रम

# राज्यातला शेतकरी सुखी होऊ दे...



राज्यावरचे अवर्षणाचे संकट दूर कर, राज्यातला शेतकरी सुखी होऊन हे राज्य सुजलाम् सुफलाम् कर, असे साकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आषाढी एकादशीनिमित्त पांडुरंग चरणी घातले. या वेळी त्यांच्यासोबत सौ. अमृता फडणवीस, मानाचे वारकरी हरिभाऊ फुंदे आणि सौ. सुनिता फुंदे उपस्थित होते.

# अंतरंग

## मायेचा ओलावा...

दोन वर्षांपूर्वी महाराष्ट्राच्या राज्यपालपदी निवड झाल्यावर राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी सर्वप्रथम आदिवासी विकास या विषयाची, राज्यातील अनुसूचित क्षेत्रांची, तेथील सामान्य जनतेच्या समस्या व अडचणींची माहिती करून घेतली. पहिल्याच पंधरवाड्यात राजभवन येथे वरिष्ठ शासकीय अधिकारी, सेवाभावी अशासकीय संस्थांच्या प्रतिनिधींची तसेच आदिवासी लोकप्रतिनिधींची भेट घेऊन त्यांच्याकडून अनुसूचित क्षेत्रांच्या तसेच तेथील लोकांच्या समस्या समजावून घेतल्या.


६

## माझी पहिली पोस्टिंग

क्षेत्रिय पातळीवरील प्रश्न जाणून घेण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दुर्गम भागांचे दौरे केले पाहिजे. त्यासाठी आपल्या पहिल्या पोस्टिंगच्या ठिकाणी आवर्जून भेट देण्याविषयी सांगताहेत मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय...


१२

## कौशल्यातून रोजगाराकडे

किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम व त्यातून मिळणारा रोजगार यावर राज्य सरकारने लक्ष वेधले आहे.


२२


| | |
|---|---|
| मायेचा ओलावा | ६ |
| नवी दिशा विकासाची | ८ |
| विकास आणि प्रगती | १० |
| माझी पहिली पोस्टिंग | १२ |
| वाटा समृद्धीच्या | १४ |
| हक्कांचे संरक्षण | २० |
| कौशल्यातून रोजगाराकडे | २२ |
| शाश्वत विकासासाठी पेसा | २४ |
| सुसंधी उभारणीची | २६ |
| हसत-खेळत ज्ञानार्जन | २७ |
| वनहक्क म्हणजे काय? | २८ |
| दर्जेदार इंग्रजी शिक्षण | २९ |
| मेळघाटात कुपोषणमुक्ती | ३० |
| अमृत आहार | ३१ |
| रावलापाणी - गाथा संघर्षाची | ३२ |
| बचतगट आणि आदिवासी महिला | ३४ |
| आकाश भरारी | ३५ |
| गुणवत्तेत वाढ | ३६ |
| हक्काचे घर | ३७ |
| कंपोस्ट खतातून समृद्धी | ३८ |
| चिखलदऱ्यात स्ट्रॉबेरी | ४० |
| दूत सुधारणेच्या | ४१ |
| क्रीडारत्ने | ४२ |
| आदिवासी क्षेत्रातील किल्ले | ४४ |
| नवा अध्याय सहकार्याचा | ४६ |
| आपले नवे मंत्री | ४८ |
| चक्रावतीला नवसंजीवनी | ५३ |
| स्पर्धा परीक्षा | ५४-५७ |


## वाटा समृद्धीच्या...


१४

आदिवासी बांधवांचा शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक विकास व्हावा त्यासाठी केंद्र व राज्यशासनाच्या विविध योजना प्रभावीपणे राबवण्यात येत आहेत. या योजनांची माहिती देणारा विशेष लेख.

## शाश्वत विकासासाठी 'पेसा'




पंचायत अधिनियम तसेच वनहक्क अधिनियम अशा कायद्यांद्वारे आदिवासी ग्रामसभांना विशेष अधिकार देण्यात आले आहेत. त्यामुळे आदिवासी समाजाचे उत्थान होण्यास मदत झाली आहे.


२४

## क्रीडारत्ने

आदिवासी क्रीडापटूंनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर भारत आणि महाराष्ट्राचा नावलौकिक वाढवला.अशा काही खेळाडूंचा परिचय...


४२

## नवा अध्याय सहकार्याचा...



४६

५८




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या यशस्वी रशिया दौऱ्याचा विशेष वृत्तांत..

वर्ष ६८ वे | अंक २ | ऑगस्ट २०१६

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

## संपादन

- अतिथी संपादक — मनीषा पाटणकर-म्हैसकर
- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- प्रबंध संपादक — देवेंद्र भुजबळ
- संपादक — सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक — प्रवीण टाके
- उपसंपादक — राजाराम देवकर

## प्रशासन

- प्रशासन व वितरण अधिकारी — दिगंबर पालवे
- वितरण — अश्विनी पुजारी
- साहाय्य — प्रज्ञा गायकवाड

## मांडणी

- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रण — एच.टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

## वितरण आणि वर्गणीदार


वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
Email : lokvitaran.dgipr@maharashtra.gov.in

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

## वन मंत्र्यांकडून कौतूक

वन विभागाने १ जुलै २०१६ रोजी एकाच दिवशी राज्यात दोन कोटी वृक्षलागवडीचा संकल्प केला होता. या संकल्पाच्या निमित्ताने व्यापक जनजागृती करण्याच्या दृष्टीने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने दिलेले योगदान अभिनंदनीय आहे.

लोकराज्य तसेच महाराष्ट्र अहेडच्या जुलै २०१६ च्या अंकात या संकल्पाच्या निमित्ताने आपण दिलेल्या मुलाखती, लेख तसेच व्याघ्र संवर्धनासंबंधीची माहिती छान आहे. शिवार भरू लागले. या लेखातून आपण जलयुक्त शिवार योजनेचे यश सांगितले आहे, तर आधुनिक शेती आणि अधिक उन्नती या लेखातून ४४ व्या संयुक्त कृषी संशोधन परिषदेत झालेल्या मूलभूत चर्चे चे उत्तम चिंतन देण्यात आले आहे. जगातील वाघ हा लेख खूप माहितीप्रद आहे. एकूणच वनसंवर्धन, व्याघ्र संवर्धन, जल, जमीन आणि संवर्धनाची माहिती देणारे अंकातील हे लेख देखणे, वाचनीय आणि माहितीपूर्ण आहेत. यासाठी अतिथी संपादक म्हणून



मनीषा पाटणकर-म्हैसकर, मुख्य संपादक ब्रिजेश सिंह, प्रबंध संपादक देवेंद्र भुजबळ, संपादक सुरेश वांदिले आणि संपूर्ण लोकराज्य टीमचे मन:पूर्वक अभिनंदन...

**- सुधीर मुनगंटीवार, मंत्री, वने, वित्त**

## सोशल मीडियावर माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

तळहातावर असलेल्या स्मार्टफोनने जग जवळ आणून ठेवलं आहे. त्याद्वारे आधुनिक समाजमाध्यमांचा वापर प्रचंड वाढीस लागला आहे. ट्विटर, फेसबुकसारखी समाजमाध्यमे आता गरजेची या व्याख्येत मोडू लागली आहेत. या समाजमाध्यमांचा व्यक्तिगत, व्यावसायिक कारणांसाठी वापर होत असतानाच शासनाचे विविध विभागही या समाजमाध्यमांचा मोठ्या प्रमाणात वापर करू लागले आहेत. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयानेही समाजमाध्यमांचा (सोशल मीडिया) दैनंदिन कामकाजात वापर सुरू केला आहे. महासंचालनालयाच्या MahaDGIPR या ट्विटर हॅण्डलला नेटकऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. फेसबूकच्या (www.facebook.com/dgipr) या पेजवर नियमित अपडेट होणाऱ्या माहितीमुळे जनतेमध्ये महासंचालनालयाची ही समाजमाध्यमे लोकप्रिय ठरली आहेत.

महाराष्ट्र शासनाचे लोकाभिमूख निर्णय, उपक्रम अथवा अन्य घडामोडींच्या अचूक माहितीसाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे आधुनिक माध्यम...

फॉलो करा...www.twitter.com/MahaDGIPR
लाइक करा...www.facebook.com/dgipr

### प्रतिक्रियांचे स्वागत

लोकराज्य अंकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आम्हाला हव्या आहेत.

**पत्ता : संपादक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२**

**वार्षिक वर्गणी :** वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वठणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. आपला संपूर्ण निवासी पत्ता सुवाच्च अक्षरात पीनकोडसह असावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा.
(प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)

लोकराज्यची वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी http://dgipr.maharashtra.gov.in

* या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

महाराष्ट्र शासन

# नव्या दिशा प्रगतीच्या

ऑगस्ट महिन्यात स्वातंत्र्यदिन, ऑगस्ट क्रांती दिन तसेच जागतिक आदिवासी दिन साजरा केला जातो. मूलनिवासी समजल्या जाणाऱ्या आदिवासींचे सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिकदृष्ट्या वेगळे वैशिष्ट्य आहे. महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या 9 टक्क्यांच्या आसपास आदिवासी लोकसंख्या असून नंदुरबार, पालघर, गडचिरोली, धुळे, ठाणे, यवतमाळ, नागपूर, गोंदिया, चंद्रपूर, भंडारा, नाशिक, जळगाव या जिल्ह्यांमध्ये मोठ्या संख्येने आदिवासी आढळून येतात. आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने विशेष लक्ष केंद्रित केले आहे.

अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना आदिवासी उपयोजनेंतर्गत 5 टक्के निधी थेट अनुदान देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. त्यामुळे या भागाच्या विकास आणि आदिवासी बांधवांच्या सक्षमीकरणास गती प्राप्त झाली आहे. आदिवासी बांधवांमध्ये यामुळे चैतन्य निर्माण झाल्याची आदिवासी विकास मंत्री विष्णू सवरा यांनी दिलेली प्रतिक्रिया सर्वथा योग्य अशीच आहे.

या शासनाने राबवलेली आणखी दुसरी महत्त्वाची योजना म्हणजे मध्यवर्ती स्वयंपाकगृह योजना. या अंतर्गत नाशिक जिल्ह्यातील मुंढेगाव व पालघर जिल्ह्यातील कांबळगाव येथे देशातील पहिले मध्यवर्ती स्वयंपाकगृह उभारण्यात आले आहे. या स्वयंपाकगृहाद्वारे शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना अत्यंत उच्च प्रतीचा पौष्टिक आहार मिळत आहे. अंगणवाडी क्षेत्रातील सर्व गरोदर स्त्रिया आणि स्तनदा माता यांच्या उत्तम आरोग्यासाठी 'डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना' राबवणारे महाराष्ट्र हे वैशिष्ट्यपूर्ण राज्य ठरले आहे. या योजनेमुळे कुपोषण कमी होण्यास साहाय्य होईल.

जागतिक आदिवासी दिनानिमित्त आम्ही 'आदिवास ते अग्रक्रम' हा आदिवासी विकास विशेषांक प्रकाशित करीत आहोत. या अंकात आदिवासी विकास आणि त्यांच्या कल्याणासाठी राबवण्यात येणाऱ्या विविध योजना, निर्णय, धोरणे यांची एकत्रित माहिती समाविष्ट केली आहे.

या अंकापासून आम्ही अधिक आकर्षक स्वरूपात माहिती, लेख देण्याचा प्रयत्न करणार आहोत. राज्य लोकसेवा आयोगाच्या विविध परीक्षा व इतर स्पर्धा परीक्षांना बसणाऱ्या उमेदवारांना उपयुक्त ठरेल, असे नवे सदर या अंकापासून आम्ही सुरू करीत आहोत.

हा अंक आमच्या वाचकांना आवडेल, अशी खात्री वाटते.

**ब्रिजेश सिंह**
**(मुख्य संपादक)**

# मायेचा ओलावा...

**दोन वर्षांपूर्वी महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालपदी निवड झाल्यावर राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी सर्वप्रथम आदिवासी विकास या विषयाची, राज्यातील अनुसूचित क्षेत्रांची, तेथील सामान्य जनतेच्या समस्या व अडचणींची माहिती करून घेतली. पहिल्याच पंधरवाड्यात राजभवन येथे वरिष्ठ शासकीय अधिकारी, सेवाभावी अशासकीय संस्थांच्या प्रतिनिधींची तसेच आदिवासी लोकप्रतिनिधींची भेट घेऊन त्यांच्याकडून अनुसूचित क्षेत्रांच्या तसेच तेथील लोकांच्या समस्या जाणून घेतल्या.**




**नाशिक जिल्ह्यातील मुंढेगाव येथे अन्नपूर्णा मध्यवर्ती स्वयंपाकगृहाचे उद्घाटन करताना राज्यपाल सी. विद्यासागर राव. यावेळी आदिवासी विकास मंत्री विष्णू सवरा, नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री आणि जलसंपदा मंत्री गिरीष महाजन उपस्थित होते.**

**उमेश काशीकर**

राज्य घटनेच्या पाचव्या अनुसूचीनुसार देशात अनुसूचित क्षेत्र असलेल्या, महाराष्ट्रासह, दहा राज्यांच्या राज्यपालांना आदिवासी विकासाच्या अनुषंगाने काही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवण्यात आली आहे. महाराष्ट्रात अनुसूचित जमातीची लोकसंख्या राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या साधारणपणे ९ टक्के आहे. पाचव्या अनुसूचीतील तरतुदीनुसार राज्यपालांना राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील प्रशासनाच्या अनुषंगाने, आपल्या वस्तुनिष्ठ निरीक्षणांसह, राष्ट्रपतींना दरवर्षी एक अहवाल पाठवावा लागतो. अनुसूचित जमातींच्या विकासाच्या अनुषंगाने अधिसूचना जारी करण्याचा एक महत्त्वपूर्ण घटनात्मक अधिकार राज्यपालांना प्राप्त आहे. या अधिकाराचा प्रभावी वापर करीत राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील जनतेच्या विकासाच्या दृष्टीने शासन यंत्रणेमार्फत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. त्यामुळे अनुसूचित क्षेत्रातील लोकांचे जीवनमान उंचावण्यास निश्चितपणे मदत झाली आहे.

## गौण वनोपजाच्या वापराचे अधिकार

राज्यातील वनांपासून उत्पन्न होणारे गौण वनउपज अनुसूचित प्रदेशातील लोकांच्या जीवनशैलीशी तसेच त्यांच्या उपजीविकेशी निगडित आहेत. पेसा कायदा तसेच अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वनवासी (वन हक्क) कायदा अंमलात आल्यानंतर अनुसूचित क्षेत्रातील लोकांचा गौण वनोपजांवरील अधिकार कायद्याने मान्य झाला, परंतु प्रत्यक्षात आदिवासींना गौण वनोपजावर केवळ नाममात्र अधिकार होता. या संदर्भात राज्यपालांच्या कार्यालयाने एका

अधिसूचनेच्या माध्यमातून बांबू, तेंदूपत्ता यांसह सर्व गौण वनौपजांच्या वापराबद्दल अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभांना अधिकार प्रदान केले. त्यासाठी प्रथम बांबूचा गौण वनौपजामध्ये समावेश केला. त्यामुळे आता गौण वनौपजांबाबत प्राप्ती, वापर तसेच वाटपाचा अधिकार ग्रामसभांना देण्यात आला आहे. या निर्णयामुळे अनुसूचित क्षेत्रातील ग्रामस्थांमध्ये वनांच्या मालकीबद्दल विश्वास निर्माण झाला आहे. राज्यपालांची अधिसूचना निघाल्याच्या दुसऱ्याच वर्षी, सन २०१५ साली, एकट्या गडचिरोली जिल्ह्यातील २५ गावांनी बांबूंचा लिलाव केला. यंदा गडचिरोलीतील जवळपास १०० गावे बांबूंचा लिलाव करण्यासाठी सज्ज झाली आहेत.

मात्र अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभांना गौण वनौपजांची मालकी देऊन भागणार नाही तर त्यांना उत्पादनांचे पॅकेजिंग, ब्रँडिंग करून उत्पादनांचे मूल्यवर्धन करण्याच्या दृष्टीने मदत करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने त्यांनी संबंधितांशी विचारविमर्श केला.

गेल्या वर्षी राज्यपालांनी महाबळेश्वर येथे एका मध निर्मिती केंद्राला भेट दिली. मधाची एक बॉटल तेथे साधारण २०० रुपयांना मिळते तीच बॉटल दुबई येथील मॉलमध्ये अंदाजे दीड हजार रुपयांना मिळते हे त्यांना कळले. या दृष्टीने सर्व संबंधित विभागांनी आदिवासी बांधवांना मदत केल्यास त्यांचे उत्पन्न वाढू शकेल याबाबत त्यांची खात्री झाली.

## गौण जलाशयांचे हस्तांतरण

पेसा कायद्यातील तरतुदीनुसार अनुसूचित क्षेत्रातील सर्व गौण जलाशयांचे अधिकार ग्रामपंचायतींना हस्तांतरित करण्यात आले आहेत. ग्रामपंचायतींना या जलाशयांमध्ये मत्स्योत्पादन घेण्यासाठी व त्यातून उत्पन्न मिळवण्यासाठी मदत करण्यात येत आहे. या निर्णयामुळे अनुसूचित क्षेत्रामध्ये मत्स्य उत्पादनाला निश्चितपणे चालना मिळणार आहे.

## ग्राम पंचायतींना निधीचे थेट वाटप

पेसा कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अधिकारांचे विकेंद्रीकरण व अधिकाधिक निधीचे वितरण अभिप्रेत आहे. आदिवासी उपयोजनेच्या एकूण उपलब्ध निधीपैकी किमान ५ टक्के निधी, राज्याच्या अनुसूचित क्षेत्रातील २८३५ ग्रामपंचायतींना दरवर्षी थेट सुपुर्द करण्यात यावा या संदर्भात; ऑक्टोबर २०१४ मध्ये एक महत्त्वपूर्ण अधिसूचना जारी करण्यात आली. ग्रामपंचायतींना अशाप्रकारे थेट रक्कम मिळाल्याने लोकशाहीच्या विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेला निश्चितपणे चालना मिळाली आहे. या निर्णयामुळे अनुसूचित क्षेत्रातील ग्राम पंचायतींना लक्षणीय निधी मिळाला असून या निधीतून ठरवून दिलेल्या सूचीतील अनेक लोकोपयोगी कामे घेण्याचे अधिकार ग्राम पंचायतींना देण्यात आले आहे. यावर्षी फेब्रुवारी महिन्यात राष्ट्रपती भवन येथे झालेल्या राज्यपालांच्या परिषदेत संबोधन करताना राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या या निर्णयाचा विशेषत्वाने उल्लेख केला होता.

## सामूहिक वनहक्क

महाराष्ट्रामधे वनहक्क कायद्यांतर्गत वैयक्तिक वनहक्क अधिकार प्रदान करण्या बाबत चांगले काम झाले असले तरी सामुदायिक वनहक्क प्रदान करण्याबाबत, काही जिल्ह्यांचा अपवाद वगळता, विशेष प्रगती झाली नव्हती.

राज्यपालांच्या सुचनेनुसार राजभवन येथे स्थापन करण्यात आलेल्या आदिवासी कक्षाने सामुदायिक वनहक्क प्रदान करण्यासंदर्भात पाठपुरावा केल्यामुळे राज्यातील सर्वच अनुसूचित क्षेत्रांमद्धे या संदर्भात बरीच प्रगती झाली आहे.

आदिवासी विकास विभाग

आदिवासी जनहिताय

महाराष्ट्र शासन

## दळी जमिनीचे हस्तांतरण

इंग्रजांच्या राजवटीत कातकरी व इतर अनुसूचित जमातीतील लोकांना रायगड जिल्ह्यात दळी जमिनी दीर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्यावर देण्यात आल्या होत्या. या सर्व जमिनी संबधित दळीधारकाच्या नावे हस्तांतरित करण्याची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित होती. राज्यपालांच्या कार्यालयाच्या पाठपुराव्याने आजवर जवळजवळ ७००० अनुसूचित जमातीतील लोकांना एकंदर १०,००० एकर क्षेत्र असलेल्या दळी जमिनींचे वाटप करण्यात आले आहे.

## मुलांना पोषक आहार

महाराष्ट्रात काही आदिवासीबहुल भागांमध्ये कुपोषणाची समस्या आहे. या संदर्भात राज्यपालांच्या कार्यालयाने आदिवासी विकास विभाग तसेच महिला व बालकल्याण विभागांशी विस्तृत चर्चा करून आदिवासी उपयोजनेच्या निधीतून अनुसूचित क्षेत्रातील गर्भवती महिला, स्तनदा मातांना तसेच आंगणवाडीतील मुलांना पोषक आहार उपलब्ध करून देण्याबाबत खातरजमा करण्याचे सूचित केले आहे.

## आदिवासींच्या जमिनीचे रक्षण

आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासींना हस्तांतरित करणे हा चिंतेचा विषय आहे. या संदर्भात पेसा कायद्याच्या आधारे, राज्यपालांनी एक अधिसूचना जारी करून ग्रामसभेच्या अनुमतीशिवाय अनुसूचित क्षेत्रातील आदिवासी जमीन बिगर आदिवासींना हस्तांतरित करता येणार नाही, हे स्पष्ट केले आहे. आदिवासींच्या जमिनींच्या रक्षणासाठी हे महत्त्वपूर्ण पाऊल ठरले आहे.

**गेल्या दोन वर्षात राज्यपाल विद्यासागर राव यांनी राज्याच्या अतिदुर्गम अनुसूचित भागांना भेटी देऊन आदिवासी - वनवासींचे प्रश्न समजून घेण्याचा प्रयत्न केला. पेसा व वनहक्क कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने संबंधितांना सूचना दिल्या. अनेक आश्रमशाळांनादेखील त्यांनी भेटी दिल्या आहेत.**
**या प्रत्येक भेटीमध्ये त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या इच्छा - आकांक्षा जाणून घेतल्या.**

(लेखक हे राज्यपालांचे जनसंपर्क अधिकारी आहेत.)

# नवी दिशा विकासाची...

**आदिवासी बांधवांच्या कल्याणासाठी राज्य शासनातर्फे विविध कल्याणकारी योजना राबवण्यात येत आहेत. या योजनांचा समग्र आढावा घेणारा विशेषांक लोकराज्य प्रकाशित करीत आहे. यानिमित्त आदिवासी विकास मंत्री विष्णू सवरा यांनी व्यक्त केलेले मनोगत...**



आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीसंदर्भात उर्वी अशोक पिरामल फाऊंडेशनसोबत राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागाचा सामंजस्य करार झाला. यावेळी आदिवासी विकास मंत्री विष्णू सवरा, सचिव राजगोपाल देवरा आणि उर्वी अशोक पिरामल फाऊंडेशनच्या उर्वी पिरामल उपस्थित होत्या.

**विष्णू सवरा**
आदिवासी विकास मंत्री

आदिवासी समाजाच्या विकासाला चालना देऊन सर्वांगीण विकास करणे हा संकल्प मी केलेला आहे. समाजबांधवांनी माझ्यावर टाकलेला विश्वास विविध विकास कामांच्या माध्यमातून सार्थ करण्याचा प्रयत्न सुरू आहे. आदिवासी समाजाच्या विकासासाठी शासन कटिबद्ध असून क्षेत्रीय विकास, सामूहिक विकास व वैयक्तिक लाभांच्या योजना आदिवासी विकास विभागांतर्गत आदिवासी विकास आयुक्तालय, आदिवासी विकास महामंडळ आणि आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था यांच्या माध्यमातून विविध योजना हाती घेऊन त्या प्रभावीपणे राबवण्यात येत आहेत.

## 'पेसा' सर्वांगीण विकासाकडे

राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना आदिवासी उपयोजनेंतर्गत ५ टक्के निधी थेट अनुदान देणारे देशात 'महाराष्ट्र' पहिले राज्य आहे. आदिवासी उपयोजनेंतर्गत ५ टक्के निधी दरवर्षी अनुसूचित क्षेत्रातील गावांना थेट उपलब्ध करून दिल्यामुळे, ही गावे स्वावलंबी होतीलच शिवाय अशा गावांचा विकास अधिक पारदर्शी आणि झपाट्याने होईल; हे लक्षात घेऊन या पेसा कायद्याची अंमलबजावणी करण्यात आली. आदिवासी बांधवांना सक्षम करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी यशस्वी झालेल्या पेसा कायद्याच्या अंमलबजावणीस आता एक वर्ष पूर्ण झाले आहे. या योजनेचे शिवधनुष्य पेलणे सोपे नव्हते. सर्वात प्राधान्याने अचूक आणि योग्य माहिती मिळणे महत्त्वाचे होते. त्यासाठी एक स्वतंत्र व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात आला. या माध्यमातून १३ जिल्हा परिषदांशी सातत्याने समन्वय ठेऊन २८७६ ग्रामपंचायती, ५९६९ गावे आणि पाडे यांना प्रत्यक्ष लाभ मिळणार आहे. त्यात कोणत्या पायाभूत विकासकामांवर निधी खर्च करायचा याचे मार्गदर्शन घेण्यासाठी पुणे येथील 'यशदा' या संस्थेची प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आली तर 'टाटा सामाजिक विज्ञान संस्था' या संस्थेची अंमलबजावणी व मूल्यमापनासाठी निवड करण्यात आली आहे.

२०१५-२०१६ च्या आदिवासी विकास विभागाच्या अर्थसंकल्पामध्ये ५ टक्के म्हणजे २५८ कोटी ५० लाख रुपये निधीची तरतूद पेसा या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी करण्यात आली. त्यापैकी १८० कोटी ९५ लाख रूपये आदिवासी गावांना वितरित करण्यात आले. या आर्थिक वर्षी २६७ कोटी ८८ लाख रुपयांची तरतूद करून २१४ कोटी रुपये निधी गावांना देण्यात येत आहे. आदिवासी गावांमध्ये निर्माण झालेले चैतन्य पाहिले तर निश्चितच समाधान मिळते. ही योजना उत्तमरीत्या अंमलबजावणी करणाऱ्या सर्व यंत्रणेचे मी अभिनंदन करतो.

## मोफत आरोग्य तपासणी

शासकीय आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या आरोग्यामध्ये सुधारण होण्यासाठी शासनस्तरावर गांभीर्याने विचार सुरू आहेत. आश्रमशाळांमधील शिक्षण व अन्य

सुविधांबाबत Corporate Social Responsibility अंतर्गत प्रयत्न होण्यासाठी मा. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठकही घेण्यात आली. त्याचाच एक भाग म्हणून प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण याअंतर्गत रायगड जिल्ह्यांमध्ये १४ व रत्नागिरी जिल्ह्यामध्ये २ अशा एकूण १६ शासकीय आश्रमशाळामध्ये उर्वी अशोक पिरॅमल फाउंडेशन यांच्या साहाय्याने मोबाइल हेल्थ युनिटद्वारे शासकीय आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. त्यासाठी शासनाचा आदिवासी विकास विभाग व उर्वी अशोक पिरॅमल फाऊंडेशन यांच्यामध्ये दि.१२ जुलै, २०१६ रोजी सामंजस्य करार करण्यात आला आहे. शासकीय आश्रमशाळामधील विद्यार्थ्यांना सर्वांकष आरोग्य सेवा मोबाइल हेल्थ युनिटद्वारे पुरवणे तसेच सदर आश्रमशाळेतील विद्यार्थी व शिक्षकांमध्ये आरोग्य, पोषण व हायजिन (Hygiene) यासंदर्भात जागृती निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

सदरचा कार्यक्रम १५ ऑगस्ट, २०१६ पासून सुरू होऊन पुढील तीन वर्षासाठी राबविण्यात येणार आहे. या कार्यक्रमांतर्गत पहिल्या सहा महिन्यामध्ये सर्व विद्यार्थ्यांची उंची, वजन, हिमोग्लोबीन स्तर यांची तपासणी करून कमतरता असणाऱ्या विद्यार्थ्यांना आवश्यकतेप्रमाणे आयर्न व फॉलिक ॲसिडच्या गोळ्या देण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांचे जंत, त्वचाविकार आणि युरिनरी इन्फेक्शन बाबत तपासणी करून औषधोपचार करण्यात येणार आहेत. तसेच विद्यार्थ्यांच्या डोळ्यांची तपासणी करून चष्म्यांचे वाटप करण्यात येणार आहे. मोबाइल हेल्थ युनिट प्रत्येक महिन्यातून दोनवेळा आश्रमशाळेस भेट देऊन सर्व मुलांची तपासणी करून औषधोपचार करणार आहे.

### आदि 'प्रमाण' प्रणाली

आदिवासी नागरिकांच्या जात पडताळणीसाठी www.etribevalidity.mahaonline.gov.in ही ऑनलाइन प्रणाली विकसित करण्यात आली आहे. या 'आदि प्रमाण प्रणाली'मुळे बोगस आदिवासी जातप्रमाणपत्रांना आळा बसण्यास मदत होऊन जातप्रमाणपत्र पडताळणीचे काम पारदर्शक, सोपे आणि वेगवान होण्यास मदत होणार आहे.

### मुलांना परदेशात शिक्षणाची संधी

परदेशात जाऊन आदिवासी विद्यार्थी मोठ्या प्रमाणात शिक्षण घेत आहेत. त्यासाठी पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा वार्षिक ४.५ लाख रुपयांवरून आता ६ लाख करण्याचा निर्णय आदिवासी विकास विभागाने घेतला आहे. अशाप्रकारे दुर्गम, अतिदुर्गम भागातील आदिवासींना बांधवांच्या विकासासाठी अनेक कल्याणकारी योजना राबवण्यात येत आहेत. या योजनेच्या माध्यमातून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना अपेक्षित असलेली एक आर्दश ग्रामव्यवस्था उभी राहील, असा मला विश्वास आहे.

### देशातील पहिले 'मध्यवर्ती' स्वयंपाकगृह

दुर्गम व डोंगराळ भागातील आदिवासी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून आदिवासी विभाग सतत कार्यरत आहे. या भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळाल्यामुळे, त्यांना ते समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

शैक्षणिक बदल करताना या विभागाकडून नवनवीन योजना राबवल्या जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणजे नाशिक जिल्ह्यातील मुंढेगाव आणि पालघर जिल्ह्यातील कांबळगाव येथे देशातील पहिले मध्यवर्ती स्वयंपाकगृह उभारण्यात आले आहे. शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना पौष्टिक, संतुलित, ताजा आणि रुचकर आहार वेळेवर उपलब्ध व्हावा, आहार आरोग्यदायी बनवण्यासाठी स्वयंपाकगृह, स्वयंपाकाची भांडी व परिसर स्वच्छ असावा. तसेच मानवी स्पर्श न होता स्वयंचलित यंत्रणेमार्फत तयार व्हावा जेणेकरून; मुलांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होणार नाही या उद्देशाने, आदिवासी विकास विभाग, टाटा ट्रस्ट आणि अक्षयपात्र फाऊंडेशन यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. या प्रकल्पाचे उद्घाटन मा. राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते करण्यात आले आहे.

**शब्दांकन- काशीबाई थोरात**

(लेखिका या विभागीय संपर्क अधिकारी आहेत.)

## अमृत आहार

**कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी गरोदर स्त्रिया आणि स्तनदा मातांच्या आहारातील उष्मांक आणि प्रथिनांमध्ये वाढ करण्याबरोबरच जन्माला येणाऱ्या सुदृढ बालकांचे प्रमाण वाढवण्यासाठी अनुसूचित क्षेत्रातील गरोदर स्त्रिया-स्तनदा मातांच्या आहारासाठी डॉ. ए.पी जी अब्दुल कलाम अमृत आहार योजना सुरू करण्यात आली आहे. अनुसूचित क्षेत्रातील अंगणवाडी कक्षेत येणाऱ्या सर्व गरोदर स्त्रिया आणि स्तनदा मातांना या योजनेतून वर्षभराच्या कालावधीसाठी एकवेळचा चौरस आहार देण्यात येत आहे. या योजनेमुळे उष्मांक व प्रथिनांच्या कमतरतेमुळे कमी वजनाची बालके जन्माला येण्याचे प्रमाण कमी होण्यास नक्कीच मदत होईल. या योजनेचा लाभ प्रारंभी ६ लाख गरोदर स्त्रिया व स्तनदा माता व बालकांना होईल.**



# विकास आणि प्रगती

**आदिवासी भागाचे प्रतिनिधित्व करणारे आदिवासी विकास राज्यमंत्री राजे अम्ब्रीशराव अत्राम यांनी आदिवासी बांधवांच्या विकासासाठी आणि सक्षमीकरणासाठी राज्य शासन करीत असलेल्या उपाययोजनांविषयी व्यक्त केलेले मनोगत..**



**अन्नपूर्णा मध्यवर्ती स्वयंपाकगृहाच्या उभारणीबाबत आदिवासी विकास विभाग आणि टाटा ट्रस्ट यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आदिवासी विकास मंत्री विष्णू सवरा, राज्यमंत्री राजे अम्ब्रीशराव अत्राम, ज्येष्ठ उद्योजक रतन टाटा आणि सचिव राजगोपाल देवरा उपस्थित होते.**

**राजे अम्ब्रीशराव अत्राम**
आदिवासी विकास राज्यमंत्री

मी गडचिरोलीसारख्या आदिवासी विभागातून आलो आहे. तेथील सर्व आदिवासी बांधवांचे जीवन आणि त्यांच्या गरजा या जवळून अनुभवल्या आहेत. त्यामुळे आदिवासी विकास विभागाचा राज्यमंत्री या खात्याचा कारभार हाती घेताना मी एक ध्येय निश्चित केले होते. समाजातील वंचितांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी आदिवासी विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढवणे, त्यांचा सर्वांगीण विकास करणे आणि त्यातून त्यांचे सक्षमीकरण करणे. त्या दृष्टीने माझी वाटचाल सुरू आहे. ज्या सामाजिक कार्याच्या संस्काराचा वसा आणि वारसा घेऊन मी इथवर आलो. ते कार्य पूर्ण करण्यासाठी, आदिवासी बांधवांच्या विकासासाठी मी सतत प्रयत्नशील आहे.

सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, आणि सांस्कृतिक विकास व्हावा, यासाठी शासनाने अनेक उपाययोजनांची आखणी आणि अंमलबजावणीसुद्धा केली. क्षेत्र विकासाबरोबरच, व्यक्ती विकासावर लक्ष केंद्रित करून सर्वसमावेशक विकास हे प्रगतीचे सूत्र स्वीकारले गेले. यामध्ये प्रामुख्याने क्षेत्रीय विकास, सामूहिक विकास व वैयक्तिक लाभांच्या योजना राबवण्यात आदिवासी विकास आयुक्तालय, आदिवासी विकास महामंडळ आणि आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था यांच्या माध्यमातून विविध योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत.

अनुसूचित जमातीच्या २५ हजार विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये इयत्ता १ली पासून ते बारावीपर्यंत शिक्षण देण्यास मान्यता देण्यात आली आहे. या विद्यार्थ्यांच्या संख्येत १० पटीने वाढ करण्यात आली आहे. उच्च

शिक्षणाची सोय व्हावी, यासाठी मुलामुलींसाठी शासकीय वसतिगृह, इंग्रजी माध्यमाच्या शाळा, भारत सरकार शिष्यवृती, सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती, सैनिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन, अनुसूचित जमातीच्या मुलामुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, आदिवासी मुलामुलींकरिता शासकीय वसतिगृह यासारख्या योजना राबवण्यात येत आहेत. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती प्रक्रिया ही पूर्णपणे ऑनलाइन केली आहे. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना पौष्टिक, संतुलित, ताजा व रुचकर आहार वेळेवर उपलब्ध व्हावा, यासाठी नाशिक जिल्ह्यातील मुंढेगाव येथे देशातील पहिले मध्यवर्ती स्वयंपाकगृह उभारण्यात आले आहे.

स्वच्छ भारताचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आदिवासी विभागामार्फत चालवण्यात येणाऱ्या आश्रमशाळांध्ये (WASH-water sanitation and Hygiens) 'स्वच्छ भारत स्वच्छ शाळा' हा कार्यक्रम सुरू केला आहे. नाशिक येथे तात्पुरत्या स्वरूपात एकलव्य क्रीडा व उद्योजकता प्रबोधनी स्थापना करण्यात आली असून विभागीय क्रीडासंकुलामध्ये जून २०१५ पासून १२५ आदिवासी विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहे. सुरुवातीला धनुर्विद्या, ॲथलेटिक्स, कुस्ती, कबड्डी, नेमबाजी या पाच क्रीडा प्रकारांचे प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहे.

### डॉ. अब्दुल कलाम अमृत आहार योजना

कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी शासन प्रयत्नशील असून, गरोदर स्त्रिया आणि स्तनदा मातांच्या आहारातील उष्मांक आणि प्रथिनांमध्ये वाढ करण्याबरोबरच जन्माला येणाऱ्या सुदृढ बालकांचे प्रमाण वाढवण्यासाठी, आदिवासी क्षेत्रातील गरोदर स्त्रिया-स्तनदा मातांच्या आहारासाठी डॉ. अब्दुल कलाम अमृत आहार योजना सुरू करण्यात आली आहे.

### पेसा अंमलबजावणीस एक वर्ष पूर्ण

अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना आदिवासी उपयोजनेंतर्गत ५ टक्के निधी थेट अनुदान म्हणून देणारे 'महाराष्ट्र' हे देशातील पहिले राज्य आहे.

पेसा कायद्याच्या अंमलबजावणीस एक वर्ष पूर्ण झाले आहे. महाराष्ट्रातील आदिवासी संस्कृतीची ओळख करून देण्यासाठी दिल्ली हाटच्या धर्तीवर पालघर जिल्ह्यात 'वारली आदिवासी हाट' हा प्रकल्प उभारण्यात येणार आहे.

आदिवासींची केवळ उपजीविकाच नव्हे तर, त्यांची सर्वंकष जीनवशैली वनवैभवाशी अतूटपणे जोडलेली आहे. त्याच एक भाग म्हणजे अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियमानुसार वैयक्तिक दावे व सामूहिक दाव्यांमध्ये जवळपास ३,५५,६०६ प्रकरणे प्राप्त झाली होती. त्यापैकी वैयक्तिक व सामूहिक प्रकरणांची एकूण संख्या १.४८.३६१ आहे. वाटप केलेल्या टायटलमधील जमीन एकूण १,६८,४,२२१,२१ एकर आहे. ती आदिवासी बांधवांना देण्यात आली आहे.

प्रधानमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय स्तरावरील कौशल्य विकासासंदर्भातील धोरण निश्चित करण्यासाठी राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेची स्थापना केंद्र शासनाने केली आहे. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजीमधून शिक्षण मिळावे, याकरिता इ. ५ वी ते १० वीपर्यंत इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळा सुरू करण्यात आल्या आहेत. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेश, आंथरूण, पांघरूण, पुस्तके व इतर लेखन साहित्य इ. सुविधा शासनाकडून मोफत पुरवण्यात येतात.

२१ वे शतक हे ज्ञानाचे शतक आहे. ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञान ज्यांच्या हाती असेल तेच राज्य आणि राष्ट्र जगावर आपला प्रभाव पाडू शकते. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन आदिवासी बांधव मागे राहू नयेत अनुसूचित जाती जमातीच्या घटकांचा सर्वांगीण विकास व्हावा व त्यांना प्रगतीच्या संधी मिळाव्यात म्हणून अथक प्रयत्न केले जात आहेत. शैक्षणिक व आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक हितसंबंध जपून त्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शासन विविध उपाययोजना करत आहे.

**शब्दांकन : काशीबाई थोरात**

## आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी

**रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यामधील आदिवासी विभागांतर्गत असलेल्या शासकीय आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या मोफत आरोग्य तपासणीसाठी मोबाइल हेल्थ युनिट सुरू करण्यासंदर्भात आदिवासी विकास विभाग आणि उर्वी अशोक पिरॅमल फाऊंडेशन यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. मोबाइल हेल्थ युनिटच्या माध्यमातून आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात येईल. प्रत्येक विद्यार्थ्याची तपासणी झाल्यानंतर त्यांचे आरोग्यविषयक डिजिटल माहिती कार्ड तयार करण्यात येणार आहे. शिक्षणाची ज्ञानगंगा दऱ्याखोऱ्यात पोहोचवण्यात आली आहे. दुर्गम पाड्यात आणि अतिदुर्गम भागातील आदिवासींच्या विकासासाठी अनेक कल्याणकारी योजना राबवण्यात येत आहेत.**

# माझी पहिली पोस्टिंग

**लोकाभिमुख, पारदर्शक प्रशासनासाठी राज्याचे मुख्य सचिव नेहमीच सहकारी अधिकाऱ्यांशी संवाद साधून त्यांना मार्गदर्शन करीत असतात. क्षेत्रीय पातळीवरील प्रश्न जाणून घेण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दुर्गम भागांचे दौरे केले पाहिजे, असे सांगत अधिकाऱ्यांनी आपल्या पहिल्या पोस्टिंगच्या ठिकाणाला आवर्जून भेट द्यावी, यावर त्यांचा विशेष कटाक्ष असतो.**



विद्यार्थ्यांशी संवाद साधताना मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय

सरकारी सेवेत पहिल्या पोस्टिंगला अतिशय महत्त्व असते. करिअरचे महत्त्वाचे टप्पे पार पाडत असताना आपण उंचीवर येऊन पोहोचतो. अशा वेळेस आपल्या पहिल्या पोस्टिंगच्या ठिकाणी काय परिस्थिती आहे. याची उत्सुकता बऱ्याच जणांना असते. तशी मलाही होती. याच उत्सुकतेपोटी मी ३३ वर्षानंतर वाशिमला, जिथे माझे पहिले पोस्टिंग झाली होती. त्या ठिकाणी भेट दिली. तिथली परिस्थिती पाहिली. जुने सहकारी भेटले. त्यांच्याशी संवाद साधला एवढेच काय मी त्या काळी दौरे करण्यासाठी वापरत असलेली जुनी जीपही शोधून काढली. काळाच्या ओघात अनेक स्थित्यंतरे होतात. आपणही बदलाच्या प्रवाहात सामील होतो. परंतु जिथून करिअरची सुरुवात झाली. त्या ठिकाणी भेट दिल्यावर मात्र आठवणींचा काहूर दाटतो. मन भूतकाळात रमते.

## लोकाभिमुख प्रशासन

काही महिन्यांपूर्वी केंद्र शासनाच्या कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाचे सचिव संजय कोठारी मंत्रालयात आले, त्यांनी सर्व अतिरिक्त मुख्य सचिव, प्रधान सचिव आणि सचिवांशी संवाद साधताना प्रशासकीय सुधारणा, गतिमानता, अर्जांचे सुलभीकरण आणि लोकाभिमुख प्रशासनावर भर द्यावा असे सांगितले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांनी आपल्या पहिल्या पोस्टिंगच्या ठिकाणी आवर्जून भेट देऊन झालेल्या बदलांची माहिती करून घेतली पाहिजे या आवाहनाकडे सर्वांचे लक्ष वेधले होते.

**स्वाधीन क्षत्रिय**
मुख्य सचिव

मी माझ्या सर्व सहकारी अधिकाऱ्यांना त्यांच्या पहिल्या पोस्टिंगच्या ठिकाणी भेट देण्याविषयी सांगितले. त्यानुसारच मी माझ्या पहिल्या पोस्टिंगला म्हणजेच वाशिमला जाऊन आलो. १९८३-८४ मध्ये माझी पहिली पोस्टिंग साहाय्यक जिल्हाधिकारी (उपविभागीय अधिकारी) म्हणून पुसद आणि त्यानंतर वाशिम येथे होती. मी माझ्या पहिल्या पोस्टिंगच्या ठिकाणी भेट द्यायला उत्सुक होतो. डिसेंबर २०१५ च्या नागपूर हिवाळी अधिवेशनादरम्यान मला वाशिमला जायची संधी मिळाली. शिक्षण विभागाच्या एका कार्यक्रमानंतर मी वाशिमच्या साहाय्यक जिल्हाधिकारी कार्यालयाला भेट दिली.

## विद्यार्थ्यांशी संवाद

मी नुकताच पुणे जिल्हा दौऱ्यावर जाऊन आलो. आश्रमशाळांच्या स्थितीविषयी अनेकदा नकारात्मक बातम्या येत असतात. मी सर्व सहकाऱ्यांना आवाहन केले आहे की, ते जेव्हा जेव्हा विविध जिल्ह्यांचे दौरे करतील. त्यावेळी त्यांनी त्या-त्या भागातील आश्रमशाळांना आवर्जून भेट दिली पाहिजे. तिथल्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला पाहिजे. पुणे दौऱ्यावर असताना मी आंबेगाव तालुक्यातील राजपूर शासकीय आश्रमशाळेला

## पहिली पोस्टिंग: वाशिम

**निझामाच्या काळातील जुन्या दगडी इमारतीत वाशिमचे कार्यालय भक्कमपणे उभे आहे. या ठिकाणी मी अतिरिक्त जिल्हाधिकारी म्हणून काम करून कारकिर्दीची सुरुवात केली. तेथे दिलेल्या भेटीमुळे माझ्या जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. माझ्या सोबत काम केलेल्या कर्मचाऱ्यांपैकी बरेच जण सेवानिवृत्त झाले तर काहींची बदली झाली. निवृत्त झालेले अनेकजण भेटायला आले. त्यांच्याशी मन मोकळे करताना मी भूतकाळात रमलो. त्या काळी हाताळलेली जातीय दंगल याविषयी, माझ्या त्या काळच्या सहकाऱ्यांनी भरभरून आठवणी करून दिल्या.**

भेट दिली. गेल्या वर्षी या आश्रमशाळेचा ७८ टक्के निकाल लागला आहे. मी तेथील मुलांशी संवाद साधला. तुम्हाला मोठेपणी काय व्हायचेय? यावर त्या मुलांनी डॉक्टर, इंजिनिअर, पोलीस व लष्करी अधिकारी व्हायचेय असे सांगितले. पण काहींनी चित्रकार आणि लेखक बनायचे असे वेगळ्या धाटणीचे उत्तर दिले. शहरी भागातील मुलांप्रमाणेच त्यांच्यातही महत्त्वाकांक्षा दिसून आली. या भेटीत एका वर्गातील विद्यार्थ्यांनी गणवेश घातले नसल्याचे दिसून आले, माहिती घेतली असता समजले की, त्यांना अद्याप गणवेशच मिळाले नव्हते. तातडीने या मुलांना गणवेश उपलब्ध करून देण्याचे आदेश आदिवासी विभागाच्या सचिवांना दिले.

काही अपूर्णावस्थेतील प्रकल्प कसे मार्गी लागतात, याचे उदाहरण मी आपणास सांगतो. बारा ज्योर्तिलिंगापैकी एक असलेल्या पुणे जिल्ह्यातील भीमाशंकर येथे मी भेट दिली. येथे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ११८ खोल्यांचे भक्तनिवासाचे काम सुरू असून ते अपूर्णावस्थेत आहे. मी वित्त विभागाशी चर्चा केली आणि या भक्त निवासाच्या बांधकामांसाठी २ कोटी रुपये उपलब्ध करून देण्याची सूचना केली. दोन वर्षांपूर्वी मुसळधार पावसामुळे जमीन खचल्याने पुणे जिल्ह्यातील माळीण गाव जमीनदोस्त झाले होते. मी तातडीने या गावाला भेट दिली होती. सध्या पुणे जिल्हाधिकारी सौरभ राव यांच्या मार्गदर्शनाखाली माळीण येथे पुनर्वसनाचे काम योग्य रीतीने सुरू आहे. नुकतीच या गावाला भेट देऊन मी पुनर्वसनाची माहिती घेतली. पुण्याच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाने सुचवलेल्या आधुनिक तंत्रज्ञानानुसार, येथे बांधकाम सुरू आहे. बांधकामात विटांचा वापर टाळला तरी हे बांधकाम मजबूत आणि अधिक भक्कम होत आहे. नोव्हेंबर २०१६ पर्यंत ही बांधकामे पूर्ण होतील, असे आश्वासन जिल्हाधिकारी पुणे यांनी मला दिले आहे.

### लाभार्थ्यांच्या हितासाठी

माळीण येथील घरे लाभार्थ्यांना हस्तांतरित करण्यापूर्वी तेथे पिण्याचे पाणी आणि वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याच्या सूचना मी जिल्हा प्रशासनाला केल्या. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केलेल्या क्षेत्रीय भेटीदरम्यान गाव, तालुका पातळीवर कार्यरत असणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो. अशा भेटींमुळे रखडलेली कामे, प्रकल्प मार्गी लागतात त्यामुळे सामान्यांमध्ये प्रशासनाविषयी आस्था, विश्वास वाढीस लागतो. यानिमित्ताने पुन्हा एकदा माझ्या सर्व सहकाऱ्यांना आवाहन करतो की त्यांनी दुर्गम भागांचे दौरे करावेत.

**शब्दांकन: अजय जाधव**

(लेखक हे विभागीय संपर्क अधिकारी आहेत.)



## मुख्य सचिवांनी घेतला वर्ग

**इंग्रजीतील छोट्यामोठ्या अक्षरांमधील फरक मुलांना विचारात मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय यांनी राजपूर (गाडेवाडी) येथील शासकीय आश्रमशाळेतील मुलांचा वर्ग घेतला. त्यांनी फक्त शाळेला भेटच नाही तर वर्गशिक्षकांच्या खुर्चीवर बसून सुमारे तासभर मुलांशी संवाद साधला. आश्रमशाळेला दिलेल्या भेटीमध्ये, मुलांना पुढे काय बनायचे आहे; हे जाणून घेतले. या वेळी काही मुलांनी मी डॉक्टर होईन, इंजिनिअर होईन, पोलिस होईन, शिक्षक होईन अशी उत्तरे दिली. एका मुलीने मी चित्रकार होणार असे उत्तर दिल्यानंतर मुख्य सचिवांनी तिचे विशेष अभिनंदन केले.**

# वाटा समृद्धीच्या

**महाराष्ट्रात मूलनिवासी असलेल्या आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्य शासन विविध उपाययोजनांच्या माध्यमातून प्रयत्नशील आहे. आदिवासी समाजाचा शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक विकास व्हावा, यासाठी केंद्र शासन व राज्यशासनाच्या विविध योजना प्रभावीपणे राबवण्यात येत आहेत.**


**राजगोपाल देवरा**
सचिव, आदिवासी विकास


### शासकीय आश्रमशाळा समूह योजना

राज्यात डोंगराळ व दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी बांधवांच्या सामाजिक व शैक्षणिक प्रगतीसाठी आदिवासी विभागांतर्गत शासकीय आश्रमशाळा समूह योजना सुरू करण्यात आली.

यात आदिवासी मुलांची १० वी पर्यंतच्या शिक्षणाची सोय, विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेश, आंथरूण, पांघरूण, पुस्तके व इतर लेखन साहित्य मोफत पुरवण्यात येते २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात एकूण १,९१,८१८ विद्यार्थी या योजनेचा लाभ घेत आहेत. त्यामध्ये ९७,३२७ विद्यार्थी व ९४,४९१ विद्यार्थिनींचा समावेश आहे.

### अनुदानित आश्रमशाळा

आदिवासीच्या शैक्षणिक विकासासाठी खासगी संस्थांना अनुदान तत्त्वावर आश्रमशाळा चालवण्यासाठी देण्यात आल्या आहेत. या विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेश, आंथरूण, पांघरूण, पुस्तके व इतर लेखन साहित्य इ. सुविधा पुरवण्यासाठी शासनाकडून एका विद्यार्थीला महिन्याला ६३० रुपयांप्रमाणे अनुदान देण्यात येते.

कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्त्याचा खर्च शासनामार्फत देण्यात येतो. २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात एकूण २,५६,३९८ विद्यार्थी या योजनेचा लाभ घेत आहेत. त्यामध्ये १,४८,५०४ विद्यार्थी व १,०७,८९४ विद्यार्थिनींचा समावेश आहे.

### एकलव्य रेसिडेशियल (केंद्रपुरस्कृत पब्लिक स्कूल)

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजीमधून शिक्षण मिळावे, त्यासाठी ६ वी ते १२ वी पर्यंत सीबीएसई अभ्यासक्रमाच्या इंग्रजी माध्यमाच्या १४ निवासी शाळा सुरू करण्यात आल्या आहेत. या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेश, आंथरूण, पांघरूण, पुस्तके व इतर लेखन साहित्य या सुविधा मोफत पुरवण्यात येतात.

### शासकीय वसतिगृह

अनुसूचित जमातीच्या मुलामुलींना उच्च शिक्षणाची सोय व्हावी व त्यांची शैक्षणिक उन्नती व्हावी या उद्देशाने ही योजना सुरू करण्यात आली आहे. यात गुणवत्तेनुसार प्रवेश देऊन त्यांना निवास, भोजन, आंथरूण, पांघरूण, पाठ्यपुस्तके, शैक्षणिक व इतर आवश्यक साहित्य मोफत पुरवण्यात येते. यानुसार राज्यात ४९१ वसतिगृहे सुरू असून त्यामध्ये सुमारे ५८ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.



### संलग्न व्यवसाय प्रशिक्षण केंद्र

आदिवासी युवकांकरिता स्थानिक गरजांवर आधारित लहान प्रशिक्षण अभ्यासक्रम राबवून त्यांना स्वयंरोजगाराची संधी देणे, तसेच अत्यंत गरजेची यंत्रे व अवजारे स्थानिकरीत्या दुरुस्त करून घेण्याच्या दृष्टीने कुशल कारागीर उपलब्ध करून देणे; हा योजनेचा मुख्य उद्देश आहे. राज्यात १५ व्यवसाय प्रशिक्षण केंद्रे असून यात इलेक्ट्रिशियन, ऑईल इंजिन/इलेक्ट्रिक मोटार दुरुस्ती, मोटार मॅकेनिक, वायरमन, सुतारकाम, गवंडीकाम या ट्रेडस्‌चा समावेश असून या प्रशिक्षणाचा कालावधी ४ महिन्यांचे आहे. एका सत्रात ५० विद्यार्थी आहेत. त्यांना महिन्याला ७०० रुपये विद्यावेतन दिले जाते.

### सुवर्णमहोत्सवी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना

अनुसूचित जमातीच्या १ ली ते १० वी मध्ये आश्रमशाळेव्यतिरिक्त शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहित करणे, तसेच शैक्षणिक व इतर किरकोळ खर्च भागवण्यासाठी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती देण्यात येते. विद्यार्थ्यांना १ ली ते ४ थी पर्यंत १ हजार रुपये आणि ५ वी ते ७ वी पर्यंत दीड हजार रुपये ८वी ते १० वी पर्यंत रुपये २ हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जाते. या शिष्यवृत्तीचा लाभ सुमारे १४ लाख ५० हजार विद्यार्थ्यांना होत आहे.

### विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता

आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्यामुळे इतर आर्थिक सवलतीशिवाय व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना लागणाऱ्या अधिकच्या खर्चाची मदत व्हावी, यासाठी निर्वाहभत्ता देण्यात येतो. ४ ते ५ वर्षांच्या अभ्यासक्रमासाठी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना महिन्याला ७०० रुपये आणि वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना १,००० रुपये देण्यात येतात. २ ते ३ वर्षांच्या अभ्यासक्रमासाठी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना ५०० रुपये, वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना ७०० रुपये आणि २ वर्ष किंवा त्यापेक्षा कमी कालावधीच्या अभ्यासक्रमासाठी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना ५०० रूपये व वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना महिन्याला ५०० रूपये दरमहा निर्वाह भत्ता दिला जातो.

### विशेष प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांसाठी बक्षीस योजना

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा व त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळून, गुणवत्तेबाबत आवड निर्माण व्हावी; यासाठी शालांत व उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत विशेष प्रावीण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी बक्षीस योजना सुरू करण्यात आली आहे. त्यासाठी शासकीय/ अनुदानित आश्रमशाळांमधील १० वी १२ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या, गुणवत्ता यादीत प्राविण्यासह गुण मिळवून; राज्यात प्रथम येणाऱ्या ३ मुले व ३ मुली तसेच ८ विभागीय शिक्षण मंडळामध्ये प्रत्येक विभागीय शिक्षण मंडळात, प्रथम तीन येणाऱ्या मुलामुलींना प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात येते. दरमहा १,००० रुपये प्रावीण्य अनुदान देण्यात येते. राज्यपातळीवर प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांककरिता अनुक्रमे. ३५ हजार, २५ हजार आणि १५ हजार रुपये विभागीय पातळीवर अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाकरिता रुपये २५ हजार, १५ हजार रुपये आणि १० हजार रुपये बक्षीस देण्यात येते. राज्यस्तरावर १२ व विभागीय पातळीवर ४२ विद्यार्थ्यांना बक्षीस आणि १ हजार रुपये प्रावीण्य अनुदान देण्यात येते.

### भारत सरकार शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना


भारत सरकार शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत कला, विज्ञान, वाणिज्य या शाखेतील पदवीपूर्व, पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण किंवा अनुत्तीर्ण झाल्यावर मान्यताप्राप्त व्यावसायिक किंवा तांत्रिक प्रमाणपत्र, पदविका, पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती देण्यात येते. ज्या पालकांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाखापेक्षा जास्त असेल अशा विद्यार्थ्यांना या योंजनेंतर्गत निर्वाह भत्ता दिला जात नाही. मात्र, अशा विद्यार्थ्यांना शिक्षण फी व परीक्षा फी देण्यात येते. यात विज्ञान, अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना महिन्याला १२०० रुपये आणि वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना ५५० रूपये देण्यात येते. तांत्रिक, आयुर्वेदिक, आभियांत्रिकी प्रमाणपत्र, वास्तुकला, उपयोगिता शास्त्रप्रमाणपत्र या अभ्यासक्रमांसाठी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना महिन्याला ८२० रुपये आणि वसतिगृहात न राहणाऱ्या

आदिवासी विकास विभाग
आदिवासी जनहिताय
महाराष्ट्र शासन

## केंद्रीय शिष्यवृत्ती

आदिवासी विद्यार्थ्यांचा उच्च शिक्षणाचा खर्च भागवता यावा म्हणून केंद्र शासनाकडून ही योजना राबवली जाते.

- वैद्यकीय व अभियांत्रिक अभ्यासक्रमातील निवासी विद्यार्थ्यांना ७४० रुपये आणि अनिवासी विद्यार्थ्यांना ३३० रुपये दरमहा दिले जातात.
- तांत्रिक, आयुर्वेदिक, होमिओपथिक




इ.शास्त्र अभ्यासक्रमातील निवासी विद्यार्थ्यासाठी ५१० रुपये व अनिवासी विद्यार्थ्यांसाठी ३३० रुपये दरमहा दिले जातात.
- पदवीचे सामान्य अभ्यासक्रम, अभियांत्रिकी पदविका प्रमाणपत्र वास्तुकला अभ्यासक्रमासाठी निवासी ३५५ रुपये, अनिवासी विद्यार्थ्यांना १८५ रुपये एवढी रक्कम दिली जाते आणि ११ वी, १२ वी आणि पदवीच्या पहिल्या वर्षातील निवासी विद्यार्थ्यासाठी दरमहा २३५ रुपये, अनिवासी विद्यार्थ्यांना १४० रुपये एवढा निर्वाहभत्ता देण्यात येतो.

विद्यार्थ्यांना ५३० रुपये, पदवीचे सामान्य अभ्यासक्रम द्वितीय वर्षापासून पुढे वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना महिन्याला ५७० वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना महिन्याला ३०० रुपये, आणि ११ वी १२ पदवीच्या प्रथम वर्षासाठी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना महिन्याला ३८० रुपये आणि वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना २३० रुपये दरमहिना निर्वाहभत्ता दिला जातो.

### परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

परदेशातील उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या १० विद्यार्थ्यांना पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्याची योजना २००५-२००६ या वर्षापासून मंजूर करण्यात आली आहे. शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबांची वार्षिक उत्पन्न मर्यादा जास्तीत जास्त रुपये ६ लाखांपर्यंत ठेवलेली आहे. या योजनेंतर्गत एम.बी.ए, वैद्यकीय अभ्यासक्रम, बी.टेक (इंजिनिअरिंग), विज्ञान, कृषी व इतर विषयांच्या अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते.

### सैनिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन

आदिवासी विद्यार्थ्यांना सैनिकी शाळांमध्ये शिक्षण मिळावे आणि त्यांना राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये प्रवेश मिळावा, या हेतूने या योजनेंतर्गत विद्यावेतन दिले जाते. सैनिक



## औद्योगिक प्रशिक्षण केंद्र

**राज्यात एकूण ३४७ औद्योगिक प्रशिक्षण संस्था असून त्यामधील प्रवेश क्षमता ६३९१६ अशी आहे. त्यापैकी ५६ आदिवासी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये नवीन व्यवसाय अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. कमी मागणीचे व्यवसाय अभ्यासक्रम बंद करून त्याजागी जादा मागणीचे व्यवसाय अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. आदिवासी**



**आश्रमशाळेचे रूपांतर व्यावसायिक शिक्षण आश्रमशाळांमध्ये करण्यात आले आहेत. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या नजीकच्या परिसरातील आश्रमशाळेमधील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये ८ वी ते १० वी स्तरावर पूर्व व्यावसायिक शिक्षण देण्यात येते. १० वी नंतर या विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय प्रशिक्षणांच्या संधी निर्माण केल्या जातात. औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील वसतिगृहात राहणाऱ्या व वसतिगृहाबाहेर राहणाऱ्या आदिवासी उमेदवारांना निर्वाह भत्ता दिला जातो. आदिवासी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये वसतिगृहाची सोय केली जाते. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी पुस्तकपेढी विकसित केली जाते. व्यवसाय प्रशिक्षणाद्वारे आदिवासी महिलांचे सक्षमीकरण केले जाते. आदिवासी शिकाऊ उमेदवारांना निर्वाह भत्ता दिला जातो. बेरोजगार आदिवासी उमेदवारांसाठी मागेल त्याला व्यवसाय प्रशिक्षण दिले जाते.**

## पोलीस व सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र

**आदिवासी युवकांना राज्य पोलीस दल व लष्कर तथा तत्सम विविध सुरक्षा दलात संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्यात ९ ठिकाणी पोलीस तथा सैन्यदल भरतीपूर्व केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. यामध्ये जव्हार, घोडेगाव, नाशिक, नंदुरबार, धारणी, राजूर, किनवट, चंद्रपुर, गडचिरोली या केंद्रांचा समावेश आहे. यात आदिवासी प्रशिक्षणार्थींना जेवण, राहणे, गणवेश, खेळाचे साहित्य, बूट मोजे, अंथरूण, पांघरूण इत्यादी सुविधा मोफत दिल्या जातात.**



## मोटार वाहन चालक प्रशिक्षण केंद्र

**आदिवासी युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, या उद्देशाने राज्यात परिवहन महामंडळ व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने पांढरकवडा व गडचिरोली येथे वाहन चालक प्रशिक्षण देण्यात येते. मोटार वाहन चालक प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थींना तांत्रिक, अतांत्रिक चालकविषयक बाबींवर सखोल प्रशिक्षण देण्यात येते.**

शाळेत शिकणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न भारत सरकार शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्तीकरिता निर्धारित केलेल्या उत्पन्न मर्यादेत असल्यास अशा विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा संपूर्ण खर्च सरकारतर्फे केला जातो.

शालेय शिक्षण विभागाने निर्धारित केल्यानुसार वार्षिक शुल्क रुपये १५,०००/- मंजूर करण्यात येते. ही योजना समाजकल्याण विभागाकडून राबवण्यात येते. या अंतर्गत आदिवासी मुलांच्या शिक्षणावरील खर्चाची रक्कम समाज कल्याण विभागाकडे हस्तांतरीत करण्यात येते.

### सेवायोजन नावनोंदणी

अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची नावनोंदणी सेवायोजन कार्यालयात करण्यात येत होती. परंतु या उमेदवारांना संधी मिळण्यास फार विलंब होतो हे लक्षात घेऊन, शासनाने आदिवासी प्रकल्प कार्यालयात नावनोंदणीचे काम सुरू केले आहे. यात गरजू, सुशिक्षित अनु. जमातीच्या उमेदवारांची नावे नोंदवून ती विविध भरतीसाठी अधिकाऱ्यांकडे शिफारस करून पाठवले जाते. त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध केल्या जातात.

### कौशल्य विकास कार्यक्रम

प्रधानमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय स्तरावरील कौशल्य विकास संदर्भातील धोरण निश्चित करण्यासाठी राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेची स्थापना केंद्र शासनाने केली आहे. कौशल्य विकास धोरणानुसार उत्पादन व प्रक्रिया, टेक्सटाइल्स, प्रोसेसिंग, ऑटोमोबाइल्स, रिटेल मार्केटिंग, माहिती तंत्रज्ञान (आय.टी), हॉस्पिटॅलिटी, मनुष्यबळ विकास, आरोग्य संवर्धन या क्षेत्रात स्थानिक गरजेनुसार प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातात. आदिवासी उमेदवार यांच्यात असलेले कौशल्य विकसित करणे व त्यांना रोजगार व स्वयंरोजगारास सक्षम करणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे.

### शेतकऱ्यांना पी.व्ही.सी. पाइप

आदिवासी शेतकऱ्यांचा आर्थिक दर्जा उंचावण्याकरिता १०० टक्के अनुदानावर वीजपंप व तेलपंप योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना पी.व्ही.सी./एच.डी.पी.ई. पाइप पुरवठा करण्यात येतो. त्यामुळे या शेतकऱ्यांचे सिंचनाखालील क्षेत्र वाढण्यास मदत होते. दारिद्र्यरेषेखालील आदिवासी लाभार्थ्यांस १५,००० रुपये मर्यादेत पी.व्ही.सी./एच.डी.पी.ई पाईप १०० टक्के अनुदानावर दिली जातात.

### वीजपंप / तेलपंप पुरवठा

जास्तीत जास्त जमीन ओलिताखाली आणून आदिवासींचा आर्थिक विकास साधण्यासाठी १०० टक्के अनुदानावर वीजपंप/तेलपंप पुरवण्यात येतात. या योजनेखाली सर्वसाधारणपणे ३ किंवा ५ अश्वशक्तीचे वीजपंप/तेलपंप देण्यात येतात.

### कन्यादान योजना

लग्नसमारंभाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर होणारा खर्च कमी करण्यासाठी आणि विवाह सोहळ्यातील अनुचित प्रथांना आळा घालण्यासाठी सामूहिक विवाह सोहळ्यांना प्रोत्साहन देण्यात येते. त्यानुसार एका जोडप्यास १०,००० रुपयांचा (क्रॉस) धनादेश पती अथवा पत्नीच्या नावे देण्यात येतो.

### संपर्क क्रमांक

**आदिवासी विकास विभागाच्या योजनासंदर्भात अधिक माहिती मिळवण्यासाठी कृपया खालील संकेतस्थळांना भेट द्यावी.**

- **आदिवासी विकास विभागाचे अधिकृत संकेतस्थळ :** tribalmaharashtra.gov.in
- **आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे** trti.maharashtra.gov.in
- **शिष्यवृती, वसतिगृहे प्रवेश इ. करिता संकेतस्थळ :** etribal.maharashtra.gov.in
- **आदि 'प्रमाण' प्रणाली** etribevalidity.mahaonline.gov.in **आश्रमशाळा व वसतिगृहातील विद्यार्थी/ विद्यार्थिनींकरिता टोल फ्री क्रमांक : १८०० २६७० ००७**

## सबळीकरण व स्वाभिमान योजना

**दारिद्र्यरेषेखालील भूमिहीन कुटुंबांना उदरनिर्वाहाचे साधन नसल्यामुळे रोजगार हमी योजना किंवा खाजगी व्यक्तीकडे मजुरी करावी लागते. रोजगारनिमित्त त्यांचे स्थलांतर टाळण्यासाठी भूमिहीन कुटुंबास ४ एकर कोरडवाहू किंवा २ एकर ओलिताखालील जमीन देण्याची तरतूद आहे.**



## ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा

ग्रामीण नागरी भागातील अनुसुचित आदिवासी क्षेत्र, अतिरिक्त आदिवासी क्षेत्र, पाडा, मिनीपाडा क्षेत्र तसेच आदिवासी उपयोजना बाह्य क्षेत्रातील ५० टक्क्यांपेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्या असलेल्या वसत्या, पाडे, वाड्या, गावांमध्ये, महानगरपालिका, नगरपरिषदेचे प्रभाग येथील विकासासाठी आवश्यक असलेल्या सुधारणा करण्यात येतात त्यात १) मुख्य वस्तीपर्यंत जोडरस्ते, अंतर्गत रस्ते.२) पिण्याच्या शुद्ध पाण्याची सोय, फिल्टर प्लँट उभारणे, पाणीपुरवठा योजना करणे, बोअर करणे, हातपंप, सबमर्सिबल पंप बसवणे, सार्वजनिक हौद बांधणे ३) जुन्या विहिरींची दुरुस्ती, विहिरींचे खोलीकरण, गाळ काढणे, बोअरची दुरुस्ती, विंधन विहीर पाईप वाढवणे ४) बंद गटार बांधणे, नाल्या-मोऱ्या बांधणे ५) आदिवासी वस्त्यांचे विद्युतीकरण, मार्गदीप बसवणे, अपारंपरिक ऊर्जाद्वारे मार्गदीप बसवणे ६) समाजमंदिर बांधणे, वाचनालय व्यायामशाळांची स्थापना ७) सार्वजनिक शौचकूप व मुतार्‍यांचे बांधकाम ८) स्मशानभूमी बांधकाम ९) नदीकाठची संरक्षण भिंत, घाट बांधणे ९) तीर्थक्षेत्र व पर्यटन विकास, १०) ग्रामपंचायत कार्यालय/ग्रामसचिवालय अशा सामूहिक विकासाच्या सोयीसुविधा राबवण्यात येतात.

## केंद्रवर्ती अर्थसंकल्प/न्युक्लिअस बजेट

ज्या योजनांचा समावेश अर्थसंकल्पात नाही अशा अभिनव स्वरूपाच्या स्थानिक महत्त्वाच्या कर्जविरहित योजना तातडीने व प्रभावीपणे कार्यान्वित करून गरजू आदिवासींना प्रत्यक्ष लाभ मिळवून देणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे. यात उत्पन्न निर्मितीच्या किंवा उत्पन्न वाढीच्या योजना, प्रशिक्षणाच्या योजना / कौशल्य विकास कार्यक्रम, मानव साधन संपत्ती विकासाच्या व आदिवासी कल्याणात्मक योजनेचा समावेश आहे.

## पारधी जमाती विकास

आदिवासी समाजासाठी असलेल्या सर्व योजना पारधी समाजासाठी लागू आहेत. मात्र राज्यात पारधी जमात शैक्षणिक, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या अत्यंत मागासलेली आहे. त्यांचे शिक्षण व साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प असून अत्यंत मागासलेला व दुर्लक्षित अशा पारधी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष पारधी विकास आराखडा २०११-१२ पासून दरवर्षी तयार करण्यात येतो. यामध्ये प्रामुख्याने घरकूल, व्यवसायासाठी अर्थसाहाय्य आणि प्रशिक्षणाच्या योजना घेण्यात आल्या आहेत. यामुळे पारधी जमातीच्या विकासासाठी मदत होते.

## सांस्कृतिक संकुल

आदिवासी समाजातील लोककला, सामुहिक लग्न, परंपरागत सण, उत्सव आणि त्यांच्यातील उपजत कलागुणांना व सांस्कृतिक कार्यक्रमांना चालना देण्याच्या दृष्टीने सांस्कृतिक संकुल बांधून देण्यात येणार आहे. आदिवासी सांस्कृतिक भवनाचा आराखडा मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, मुंबई यांनी तयार केला आहे. सांस्कृतिक संकुलाची कमाल आर्थिक मर्यादा रु.२५ लाख होती ती आता १ कोटी रुपये करण्यात आलेली आहे.

## वारली चित्रकला स्पर्धा

**वारली जमातीच्या पारंपरिक वारली चित्रसंस्कृतीचे जतन व संवर्धन करणे, यासाठी वारली चित्रकला स्पर्धा सुरू करण्यात येते. ही स्पर्धा आदिवासीबहुल भागात आश्रमशाळेत आयोजित केली जाते. त्यामध्ये अनुभवी कलाकार आणि शालेय विद्यार्थी यांना एकत्र करून चित्र काढून घेतली जातात. त्या माध्यमातून अनेक कलाकारांचे मार्गदर्शन पुढील पिढीला मिळते. चित्रांना बक्षीस देण्यात येते.**

## आपला महाराष्ट्र सुवर्णजयंती योजना

गडचिरोली व गोंदिया या नक्षलग्रस्त जिल्ह्यांतील किशोरवयीन मुलामुलींना राज्य व इतर राज्यातील ठिकाणी झालेली औद्योगिक, आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक प्रगती, राज्यातील इतर भागातील रूढी, परंपरा, कला, संस्कृती, शैक्षणिक, तांत्रिक शिक्षण, कुटीर व लघुउद्योग व शेती इत्यादींचे दर्शन घडवण्यात येते.

घडवण्यासाठी महाराष्ट्र दर्शन योजना राबवण्यात येते. ही मुले नक्षलग्रस्त क्षेत्रात बदल घडवतील आणि सर्वांगीण विकासाकडे अग्रेसर होतील, यासाठी ही योजना आखण्यात आली आहे. या योजनेंतर्गत एका वर्षात एकूण ४०० विद्यार्थ्यांना महाराष्ट्र दर्शन



## विशेष केंद्रीय साहाय्य

अतिदुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी बांधवांचे जीवनमान सुधारावे त्यांच्यासाठी रोजगार निर्मिती व्हावी. त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढावे, यासाठी विशेष केंद्रीय साहाय्य निधीमधून क्षेत्रविकास, सिंचन, प्रशिक्षण, उत्पन्नवाढीच्या योजना राबवण्यात येतात.

# सांस्कृतिक संवर्धन

आदिवासी भागात २० प्रकल्प कार्यालयामार्फ़त आदिवासींच्या पारंपरिक नृत्यस्पर्धा व हस्तकला प्रदर्शन यांचे आयोजन करण्यात येते.

आदिवासी सांस्कृतिक महोत्सवांतर्गत एका सांस्कृतिक महोत्सवामध्ये पाच दिवसांचे आदिवासी हस्तकला प्रदर्शन व विक्री तसेच एक दिवस आदिवासी पारंपरिक नृत्यस्पर्धा एकत्रितपणे आयोजित करण्यात येतात. यात आदिवासीं जीवन, संस्कृती कला व राहणीमान यावर या कार्यालयामार्फत तयार करण्यात आलेल्या लघुपटांचा महोत्सव शहरी भागात आयोजित करण्यात येतो. अशाप्रकारे एका आर्थिक वर्षात महाराष्ट्रातील चार प्रमुख शहरात या सांस्कृतिक महोत्सवाचे दरवर्षी आयोजन करण्यात येते.



## अनुबोधपट / लघुपट निर्मिती

आदिवासी संस्कृतीची ओळख नागरी भागातील लोकांना होणे सहज शक्य होत नाही. आदिवासी कला, संस्कृती, जीवन तसेच विविध कार्यालयांमार्फत राबवण्यात येणाऱ्या अनेक योजनांवर आधारित वर्ष २०१३-१४ पर्यंत एकूण ९० लघुपटांची निर्मिती आदिवासी विकास संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत करण्यात आली आहे. या लघुपटांमुळे आदिवासी संस्कृतीची कल्पना येते. त्याच्याबद्दल कुतूहल तयार होते. आदिवासी संस्कृती कशी आहे याचा पूर्ण अनुभव येतो. असे साहित्य कुठेही उपलब्ध नसल्याने लघुपट दर्शन ही पर्यटकांना एक पर्वणीच असते. हे लघुपट एल.सी.डी. प्रोजेक्टरद्वारे संग्रहालयास भेट देणारे पर्यटक, विद्यार्थी यांना दाखवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. या संस्थेमार्फत बनवण्यात आलेल्या 'देवराई' या लघुपटाला दादासाहेब फाळके पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे.

## ग्रंथालय

संस्थेचे सुसज्ज ग्रंथालय असून हे ग्रंथालय १९७९ मध्ये राज्यातील विविध आदिवासी जमाती तसेच देशातील अन्य राज्यांमध्ये असणाऱ्या अनुसूचित जमातीसंबंधाने व त्यांच्या संस्कृतीच्या अनुषंगाने संशोधन व संदर्भात्मक अभ्यासकरिता सुरू करण्यात आले आहे.

या ग्रंथालयामुळे संशोधन व अभ्यास इ. करणाऱ्या व्यक्तींना संशोधन अहवाल, मूल्यांकन अहवाल, मानववंश शास्त्रीय अभ्यास अशा कामकाजासाठी मदत होते. या ग्रंथालयामध्ये राजपत्रित ग्रंथ, जनगणना निर्देश ग्रंथ, सखोल संशोधनात्मक विविध विषयांवरील संस्थेचे व इतरही संशोधन अहवाल, ज्ञानकोश, विश्वकोश, संस्कृतिकोश, इ. दुर्मीळ संदर्भग्रंथ उपलब्ध आहेत. मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, आदिवासी जीवनाशी निगडित असलेला समृद्ध ग्रंथसंग्रह आहे.

आदिवासी प्रमाणपत्रांची पडताळणी व त्या अनुषंगाने तयार करावयाचा अहवाल व परंपरा, रूढी, चालीरितीचा अभ्यास व इतर संशोधन प्रकल्पांसाठी संस्थेच्या ग्रंथालयाचा उपयोग होतो. संस्थेद्वारा चालवण्यात येणाऱ्या विविध प्रशिक्षणांसाठी येणारे प्रशिक्षणार्थी, त्यांचे अध्यापक तसेच पीएच.डी.साठी संशोधन करणारे प्रशिक्षणार्थी, परदेशी संशोधक या ग्रंथालयाचा फायदा घेतात. ग्रंथालयाद्वारे अभ्यासकांना आवश्यक पुस्तकांतील संदर्भाची झेरॉक्स सेवा उपलब्ध करून दिली जाते. सध्या ग्रंथालयात जवळपास २१००० पुस्तके आहेत. ई-ग्रंथालय या सॉफ्टवेअर मध्ये ग्रंथालयातील १६,५०० पुस्तकांची नोंद घेण्यात आली आहेत.

## संस्थेची प्रकाशने

१९७९ सालापासून संस्था दरवर्षी वर्षातून दोनदा आदिवासी संशोधनपत्रिका (मार्च व सप्टेंबर) प्रकाशित करते. संस्थेने तयार केलेली विक्री प्रकाशने १) आदिवासी संशोधनपत्रिका : मार्च- सप्टेंबर २) An overview of Tribal Research Studies ३) Development of Primitive Tribes in Maharashtra Status, Continuity Change. ४) Tribal Handicrafts of Maharashtra, Cultural Transitional Perepective. ५) नागरिकांची सनद ६) बृहन्मुंबई महानगरातील व मुंबई उपनगर जिल्हामधील पाड्यांचे सर्वेक्षण अहवाल ७) Strategies for Promotion Propogation of Tribal Art Handicrafts. याशिवाय संस्थेने आतापर्यंत ७ बोलीभाषा शब्दकोश मराठी व इंग्रजी या भाषेत प्रकाशित केले आहेत. वरील सर्व पुस्तके शासकीय ग्रंथागार, पुणे, मुंबई, औरंगाबाद व नागपूर येथे विक्रीस उपलब्ध आहेत.

# हक्कांचे संरक्षण

**महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० व त्याअंतर्गत महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३ मधील तरतुदींनुसार अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्या जमातीच्या प्रमाणपत्रांची तपासणी करतात.**

अनुसूचित जमातीच्या नामसदृष्याचा फायदा घेऊन बिगर आदिवासी अनुसूचित जमातीची प्रमाणपत्रे घेतात ही बाब शासनाच्या निदर्शनास आली. त्या प्रमाणपत्रांच्या आधारे बिगर आदिवासींनी अनुसूचित जमातींसाठी राखीव असलेल्या जागांवर प्रवेश/नियुक्ती मिळवून खऱ्या अनुसूचित जमातींच्या व्यक्तींना त्यांच्या हक्कापासून वंचित करू नये ही बाब विचारात घेऊन शासनाने १९८१ मध्ये संचालक, समाजकल्याण पुणे यांच्या अध्यक्षतेखाली जाती/जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती १९८५ मध्ये फक्त अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राची तपासणी करण्यासाठी संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली अनुसूचित

**ल. गो. ढोके**

जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती नेमली. सद्य:स्थितीत ठाणे, नाशिक, नंदुरबार, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर, गडचिरोली येथे अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्या कार्यरत आहेत.

तपासणी समित्यांकडून अनुसूचित जमातीच्या जातप्रमाणपत्र पडताळणीसाठी यापूर्वी ऑनलाइन अर्ज स्वीकारण्यात येत. मात्र त्यापुढील कार्यवाही ही मॅन्युअल पद्धतीने करण्यात येत होती. त्यामुळे प्रकरणे निकाली काढण्यास प्रत्येक टप्प्यावर विलंब लागत असल्याने मोठ्या प्रमाणावर प्रकरणे प्रलंबित राहतात. वैधता प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्जदारास समितीच्या कार्यालयामध्ये अनेक वेळा भेटी द्याव्या लागतात. अर्जाची सद्य:स्थिती कळून येत नाही. या पूर्ण प्रक्रियेमध्ये अर्जदाराचा वेळ व पैसा खर्च होतो. ही बाब लक्षात घेऊन माहिती तंत्रज्ञानाच्या अत्याधुनिक पद्धतीचा वापर करून जमात प्रमाणपत्राच्या पडताळणीची प्रक्रिया सोपी, वेगवान, पारदर्शी व्हावी, तसेच बोगस व बनावट कागदपत्राच्या आधारे वैधता प्रमाणपत्र मिळण्यास प्रतिबंध व्हावी, यासाठी जमातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी संपूर्णपणे ऑनलाइन करण्याचा आदिवासी विकास विभागाने निर्णय घेतला.



**अनुसूचित जमाती पडताळणी प्रमाणपत्र देण्याची संपूर्ण संगणकीकृत व ऑनलाइन आदी 'प्रमाण' प्रणालीचे लोकार्पण करताना राज्यपाल सी. विद्यासागर राव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आदिवासी विकास मंत्री विष्णू सवरा, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव प्रवीण परदेशी आणि सचिव राजगोपाल देवरा.**

६ एप्रिल, २०१६ रोजी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जनजाती सल्लागार परिषदेच्या बैठकीमध्ये या प्रणालीचे नामकरण आदि 'प्रमाण' प्रणाली असे करण्याचा निर्णय घेण्यात आला. या प्रणालीचा वापर १ मे

२०१६ पासून सुरू करण्यात आला आहे. ही प्रणाली www.etribevalidity.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**आदि 'प्रमाण' प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी करण्यात आलेली कार्यवाही :-**

- आदि 'प्रमाण' प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या कार्यालयाकरिता तसेच सर्व अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांकरिता संगणक, प्रिंटर्स इ. हार्डवेअर उपलब्ध करून देण्यात आले आहेत.
- या प्रणालीच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्या आणि आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या कार्यालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.
- या प्रणालीच्या देखभालीसाठी व तांत्रिक साहाय्य करण्यासाठी प्रत्येक अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती आणि आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या कार्यालयाकरिता प्रत्येकी एक माहिती तंत्रज्ञाची प्रमाण असिस्टंट म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
- ही प्रणाली नव्याने सुरू करण्यात येत असल्याने राज्यातील सर्व जनतेला त्याची माहिती होण्याकरिता वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन इ. दृक्श्राव्य माध्यमांतून या बाबीस तयार केलेल्या मिडीया प्लाननुसार पुरेशी प्रसिद्धी देण्यात येत आहे.



- सदर प्रणालीची अंमलबजावणी १ मे २०१६ पासून सुरू झाली असून अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांकडून सर्व अर्ज हे केवळ ऑनलाइन स्वीकारण्यात येत आहेत.
- जात पडताळणी प्रमाणपत्रावर फोटो व बारकोड लावणे याकरिता महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३ मध्ये आवश्यक ती सुधारणा करण्याकरिता १ जुलै २०१६ रोजी राजपत्रामध्ये अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.
- आदी 'प्रमाण' प्रणालीची अंमलबजावणी प्रभावीरीतीने व लोकाभिमुख करण्याकरिता टोकन मॅनेजमेंट सिस्टिम, बायोमॅट्रिक ऑथेंटिकेशन सिस्टिम बसवण्यात येत आहे.

त्याशिवाय नोकरी, शिक्षण इ. करिता अनुसूचित जमातीच्या उमेदवारांनी नियुक्ती प्राधिकारी/शैक्षणिक संस्थांकडे अर्ज केल्यानंतर, त्यांच्या जात पडताळणी प्रमाणपत्राची सत्यता; आदि 'प्रमाण' प्रणालीमधून ऑनलाइन पडताळणे नियुक्ती प्राधिकारी, शैक्षणिक संस्था यांना शक्य होणार आहे.

(लेखक हे आदिवासी विकास विभागात उपसचिव आहेत.)

## आदि 'प्रमाण' प्रणालीचे फायदे

- **सेवा, शिक्षण, निवडणूक आणि इतर कारणासाठी अनुसूचित जमाती वैधता प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी ऑनलाइन अर्ज करण्याची सुविधा, पडताळणी देखील ऑनलाइन**
- **अर्जदार ऑनलाइन पद्धतीने त्यांच्या अर्जाच्या सद्य:स्थितीची खातरजमा करू शकतात. प्रत्येक टप्प्यावर प्रकरणाची स्थिती ई-मेल व एसएमएसद्वारे समजण्याची व अर्जदारास ऑनलाइन पोहोच मिळण्याची सुविधा**
- **वैधता प्रमाणपत्राच्या ओळख निश्चितीसाठी फोटो व युनिक बारकोड क्रमांकाची सुविधा**
- **नागरिकांना प्रत्यक्षरीत्या समिती कार्यालयांना भेट देण्याची आवश्यकता कमी होणार असून त्यांचा वेळ व पैशाची बचत होणार आहे.**
- **अन्य समित्यांकडून करण्यात येत असलेली जात पडताळणीबाबतची कार्यवाही, दिलेला निर्णय सर्व समित्यांना उपलब्ध असेल.**
- **टोकन मॅनेजमेंट सिस्टिममुळे मुलाखतींमध्ये सुसूत्रता येईल तर बायोमेट्रिक ऑथेंटिकेशनमुळे प्रणालीची विश्वासार्हता वाढणार आहे.**

**औरंगाबाद महसुली विभागात नामसाधर्म्याचा फायदा घेऊन अनुसूचित जमातीची बोगस जात प्रमाणपत्रे, पडताळणी समितीची बनावट वैधता प्रमाणपत्र, न्यायालयाचे बनावटी आदेश तयार करणे इत्यादींची सखोल तपासणी करण्यासाठी शासनाने १ जुलै २०१६च्या शासन निर्णयान्वये विशेष तपासणी समिती गठित केली आहे.**

# कौशल्यातून रोजगाराकडे

**महाराष्ट्रातील आदिवासी समाज हा डोंगराळ प्रदेशात दुर्गम, अतिदुर्गम अशा भागात वास्तव्य करीत असून त्याचे उदरनिर्वाहाचे मुख्य साधन शेती आहे. मोठ्या संख्येने आदिवासी हा शेतमजुरीवर अवलंबून आहे. त्यात आदिवासी शेतकरी हा अल्पभूधारक व भूमिहीन असल्याने त्याच्या रोजगाराची मोठी समस्या निर्माण झाली आहे. त्यासाठी किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम व त्यातून मिळणारा रोजगार यावर राज्य सरकारने लक्ष केंद्रीत केले आहे. यामुळे खाजगी क्षेत्रातही ही मुले स्पर्धेत टिकतील, अशी सरकारला आशा आहे.**





आयटीआयमधील तांत्रिक कौशल्य अभ्यासक्रमाचे प्रात्यक्षिक करताना आदिवासी विद्यार्थी.

शासनाच्या वतीने विशेषत: आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासींच्या विकासासाठी अनेक योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. प्रामुख्याने आदिवासींच्या शिक्षणावर भर देण्यात येत आहे. त्याकरिता विभागामार्फत शासकीय, अनुदानित आश्रमशाळा चालवण्यात येत असून त्यात सुमारे ४,५०,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षण, तांत्रिक शिक्षण व व्यावसायिक शिक्षणासाठी तालुका, जिल्हा, विभागीय स्तरावर मुलामुलींसाठी एकूण ४९१ शासकीय वसतिगृहे कार्यरत असून त्यात सुमारे ५८,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आश्रमशाळा, वसतिगृहे, जिल्हा परिषद, खाजगी शाळा मिळून सुमारे २०,००,००० विद्यार्थी-विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. आदिवासींमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढत असून त्यांच्यामध्ये नोकरीसाठी स्पर्धा निर्माण झाली आहे. शासकीय व निमशासकीय नोकऱ्यांचे प्रमाण कमी झाले असून आदिवासी युवकयुवतींमध्ये बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे.

**मधुकर गायकवाड**

### रोजगार आणि स्वयंरोजगारांच्या संधी

आदिवासी युवक-युवतींना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या, स्वयंरोजगारांच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्यात कौशल्य विकास कार्यक्रम योजना राबवणे सुरू केले आहे. यामध्ये प्रामुख्याने उत्पादन व प्रक्रिया, टेक्सटाइल्स, ॲग्रो प्रोसेसिंग, ऑटोमोबाइल्स, रिटेल मार्केटिंग, माहिती तंत्रज्ञान (आय.टी.), हॉस्पिटॅलिटी, मनुष्यबळ विकास, आरोग्य संवर्धन इत्यादी सेक्टर अंतर्गत आदिवासी उमेदवारांना प्रशिक्षण देऊन; त्यांच्यातील कौशल्य विकसित करून रोजगार उपलब्ध व्हावा, या उद्देशाने अंमलबजावणी करण्यात येत आहे. विविध योजनेंतर्गत कौशल्य विकास प्रशिक्षणासाठी प्रवेश प्रक्रिया, प्रशिक्षणार्थींची निवड, प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांची निवड, प्रशिक्षणाचा कालावधी, प्रशिक्षण कालावधीतील संनियंत्रण, शुल्क, निरीक्षण

अहवाल, लेखा परीक्षण, प्रशिक्षणात उमेदवारांची नावनोंदणी, कॅम्पस मुलाखती, कार्यान्वयन यंत्रणांचा आढावा इत्यादीद्वारे अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमध्ये असलेले कौशल्य विकसित करून त्यांना रोजगाराच्या / स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात.

### सिपेट (CIPET)

इयत्ता १० वी / १२ वी पर्यंत शिक्षण घेतलेले बेरोजगार युवक-युवतींसाठी आदिवासी विकास विभागाने २०१०-११ व त्यापुढे विद्यार्थ्यांना उच्च प्रतीचे कौशल्य प्रशिक्षण मिळण्यासाठी औरंगाबाद स्थित सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ प्लास्टिक इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी (सिपेट) या केंद्र शासनाच्या संस्थेत आदिवासी युवक/ युवतींना प्रशिक्षण दिले जात आहे.

सिपेट ही संस्था औरंगाबाद येथे सन २००६ साली स्थापन करण्यात आली असून येथे प्लास्टिक इंजिनिअरिंग प्रशिक्षण संदर्भात अत्याधुनिक यंत्रसामग्री, टूल रूम, प्लास्टिक प्रोसेसिंग डिव्हिजन, प्लास्टिक टेस्टिंग प्रयोगशाळा, सीडीएम / सीएएम/ सीएई सेंटर्स् सर्व सुविधांनिशी ग्रंथालय, डिजिटल लायब्ररी, अद्ययावत क्लासरूम, व्हिडीओ कॉन्फरन्स हॉल, तसेच प्रशिक्षणार्थी युवक/युवतींसाठी स्वतंत्र निवासस्थानाची सोय उपलब्ध आहे. ही एक केंद्र शासनाची प्रशिक्षण संस्था असून देशात नामांकित प्रशिक्षण संस्था म्हणून गणली जाते.

### प्रशिक्षण

या संस्थेत आदिवासी विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी ३ महिने, ६ महिने कालावधीचे प्रशिक्षण राबवले जाते. असून प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना मोफत नाष्टा/भोजन व राहण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. तसेच युनिफॉर्म, सेफ्टी शूज, प्रशिक्षणाचे साहित्य, वैद्यकीय सुविधा व वसतिगृहापासून संस्थेपर्यंत जाण्या-येण्यासाठी वाहनाची व्यवस्था इ. सुविधा सिपेटमार्फत विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या जातात. प्रशिक्षणासाठी येणारा खर्च आदिवासी विकास विभागामार्फत प्रशिक्षणनिहाय व विद्यार्थी संख्येनुसार संस्थेस अदा केला जातो. सिपेटमार्फत आजतागायत २,३८५ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले असून, त्यापैकी १,६६६ युवक-युवतींना वेगवेगळ्या कंपनीमध्ये नोकरी उपलब्ध करून दिली आहे; हे कौशल्य विकास योजनेचे मोठे यश आहे.



*(लेखक हे नाशिक येथे आदिवासी विकास आयुक्तालयात उपायुक्त आहेत.)*

## इंडो जर्मन टूल रूम, औरंगाबाद

**ही एक भारत सरकारची नामांकित प्रशिक्षण देणारी संस्था असून औरंगाबाद या ठिकाणी सन १९९३ पासून कार्यरत आहे. उद्योजकतेचा भाग म्हणून टुलिंगच्या तंत्रज्ञाना बरोबर कुशल मनुष्यबळ पुरवण्यासाठी इंडो जर्मन टूल रुमचा अत्यंत मोलाचा सहभाग आहे. महाराष्ट्रातील आदिवासी युवक-युवतींकरिता विविध कौशल्य विकास प्रशिक्षण माध्यमातून प्रशिक्षत मनुष्य बळाची मागणी पूर्ण करण्यासाठी ही संस्था आदिवासी युवक-युवतींसाठी नावीन्यपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करीत असते. त्यामध्ये ६ महिने, १२ महिने कालावधीचे प्रशिक्षण कोर्सेस असून प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या युवक-युवतींना नामांकित कंपनीमध्ये रोजगारही उपलब्ध करून दिला जातो. राज्यातील सर्व भागांमधील युवक-युवतींना प्रशिक्षण देण्यासाठी आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांच्यामार्फत संस्थेस उद्दिष्ट देण्यात येते. त्यानुसार विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना कौशल्य विकास प्रशिक्षणातून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात.**

**या संस्थेत अत्याधुनिक यंत्रसामग्री, कुशल प्रशिक्षक वर्ग, कार्यशाळा, तसेच निवास-भोजन व्यवस्थेसाठी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. येथे प्रशिक्षण घेतलेल्या सर्वच युवक-युवतींना उद्योगक्षेत्रात रोजगारांच्या संधी उपलब्ध आहेत. इंडो जर्मन टूलमध्ये आजतागायत एकूण १,३४७ आदिवासी युवक-युवतींनी प्रशिक्षण घेतले असून त्यातील प्रशिक्षणार्थींना संस्थेने चांगल्या कंपनीमध्ये रोजगार उपलब्ध करून दिला आहे. या संस्थेत शिक्षण घेणाऱ्या आदिवासी युवक-युवतींचा प्रशिक्षणाचा संपूर्ण खर्च (निवास, नाष्टा, दोन वेळचे भोजन, युनिफॉर्म व शैक्षणिक साहित्य) शासनामार्फत केला जातो.**

# शाश्वत विकासासाठी ‘पेसा’

**आदिवासींच्या विकासासाठी शासनाने स्वतंत्र आदिवासी उपयोजना लागू केली आहे. या उपयोजनेमार्फत आदिवासी क्षेत्रासाठी विशेष निधीची तरतूद करण्यात येते. ज्याचा विनियोग केवळ आदिवासींच्या विकासाकरिता करणे बंधनकारक आहे. आदिवासी उपयोजनेमार्फत विविध योजना राबविण्यात येतात. त्यामुळे आदिवासी समाजाचे उत्थान होण्यास मदत झाली आहे.**

**रणजितसिंह राजपूत**

राज्यातील आदिवासी जमातीचे सांस्कृतिक वैविध्य तसेच त्यांचे वास्तव्य असलेल्या क्षेत्रातील नैसर्गिक, सामाजिक, आर्थिक परिस्थिती यामुळे आदिवासींच्या विकासातील समस्या व गरजा अत्यंत वैविध्यपूर्ण ठरतात. प्रत्येक गावातील स्थानिक समस्या व गरजांनुसार विकासाचे कार्यक्रम जर ग्रामसभेलाच ठरवता आले तर गावाचा विकास वेगाने व नेमकेपणाने होऊ शकेल. याकरिता आता आदिवासी उपाययोजनेंतर्गत ५ टक्के निधी दरवर्षी थेट ग्रामपंचायतींना देण्याचा ऐतिहासिक निर्णय शासनाने घेतला आहे. देशात प्रथमच महाराष्ट्र राज्याने असे प्रगतिशील पाऊल उचलले आहे. आपल्या देशाला खूप प्राचीन आणि वैविध्यपूर्ण परंपरांनी नटलेली आदिवासी संस्कृती लाभली आहे.

भारतात सुमारे ७०० आदिवासी जमाती आहेत. ज्यापैकी ४५ जमाती आपल्या राज्यात आढळतात. प्रत्येक आदिवासी जमातीची परंपरा आणि जीवन जगण्याची पद्धती अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहे. आदिवासींना त्यांची संस्कृती, परंपरा आणि भोवतालचा नैसर्गिक परिसर यांचे जतन करता यावे, यासाठी पंचायत अधिनियम तसेच वनहक्क अधिनियम अशा कायद्यांद्वारे आदिवासी ग्रामसभांना विशेष अधिकार देण्यात आले आहेत.

आदिवासी जमातींचे सांस्कृतिक वैविध्य आणि विकासाच्या वैशिष्ट्यपूर्ण गरजा लक्षात घेता प्रत्येक गावामध्ये ग्रामसभेच्या विकासाचे उपक्रम ठरवणे आवश्यक आहे. तरच आदिवासी खऱ्या अर्थाने स्वावलंबी होऊ शकतील. त्यादृष्टीने आता आदिवासी उपाययोजनेतून काही निधी थेट गावालाच देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यामुळे आता आपल्या गावाचा विकास आपल्याला साधायचा आहे.

## अशी आहे योजना

गावाच्या लोकसंख्येनुसार ग्रामपंचायतीला निधी मिळेल, यासाठी ग्रामपंचायतीचे एक वेगळे बँक खाते उघडावे लागेल. प्रत्येक वर्षी शासनाकडून ग्रामपंचायतीच्या खात्यावर निधी बँकेमार्फत थेट पोहोचेल. यामुळे वर्षांच्या सुरुवातीलाच निधी जमा होईल आणि वर्षभरात तो गावाच्या विकासासाठी चांगल्या प्रकारे उपयोगात आणता येईल. हा निधी ग्रामपंचायतीमध्ये येणाऱ्या सर्व महसुली गावांसाठी आणि पाड्यांसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात वापरायचा आहे. ज्यामुळे सर्वांना त्याचा लाभ मिळेल आणि विकासापासून कोणीही वंचित राहणार नाही.

## निधीच्या खर्चाला ग्रामसभा देणार मान्यता!

ग्रामपंचयातीला मिळालेल्या निधीतून कोणती कामे करायची हे आता ग्रामसभा ठरवेल! यामुळे गावाच्या विकासाचे निर्णय आता आपल्याला झटकन घेता येतील आणि त्यांची अंमलबजावणीदेखील तितकीच पटकन होऊ शकेल. ग्रामसभेच्या मान्यतेने आणि ग्रामपंचायतीच्या सल्ल्याने गावाची ग्रामसंसाधन नियोजन व व्यवस्थापन समिती निधी खर्च करेल. ३ लाख रुपयांपेक्षा जास्त




**जिल्हा परिषद गडचिरोली अंतर्गत येणाऱ्या अहेरी तालुक्यातील ग्रामसभा कोष खमनपेठला १३ लाख ५१ हजार रुपयांचा धनादेश देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आदिवासी विकास मंत्री विष्णू सवरा आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री गिरीश बापट**

खर्चाचे काम असेल तरच पंचायत समितीला प्रस्ताव पाठवून मान्यता घ्यावी लागेल.

### करू या विकास सर्वांचा

या निधीतून आपल्या गावाचा संपूर्ण विकास करण्यासाठी आपल्याला चार प्रकारची कामे करायची आहेत. हे चार विषय आहेत. १)ग्रामपंचायतीमध्ये प्रत्येक गाव आणि पाड्यावर पायाभूत सुविधा निर्माण करणे. २)स्वच्छता, आरोग्य आणि शिक्षणाचा लाभ गावातल्या प्रत्येकापर्यंत पोहोचवणे. ३)गावाचे जंगल, निसर्ग, जलस्रोत यांचे संवर्धन करणे आणि ४) वन्यजीव संवर्धन, जलसंधारण, वनतळी, वन्यजीव पर्यटन व वन उपजीविका, दरवर्षी ग्रामसभेमध्ये या चारपैकी एका विषयाची निवड करून ती कामे वर्षभरात पूर्ण करायची आहेत. पुढच्या वर्षी उरलेल्या तीनपैकी एका विषयांची निवड करायची आहे. त्यामुळे गावाचा विकास सगळ्या बाजूंनी होईल आणि गावाच्या गरजा गावातच पूर्ण होतील.

### आराखडा शाश्वत विकासाचा!

गावाच्या निधीचा वापर ठरवण्याचे स्वातंत्र्य ग्रामसभेला मिळणार आहे. पण त्या निधीचा योग्यप्रकारे वापर करण्याची मोठी जबाबदारीसुद्धा ग्रामसभेवर येणार आहे. यासाठी ग्रामसभेने गावाचा पद्धतशीर नियोजन आराखडा तयार करणे आवश्यक आहे. आराखडा दोन प्रकारे करायचा आहे. पुढल्या पाच वर्षात ग्रामपंचायतींचा विकास कसा व्हावा, याचा दृष्टिक्षेप आराखडा आणि प्रत्येक वर्षी करायच्या कामाचा वार्षिक आराखडा. दरवर्षी १ मे रोजी ग्रामसभेमध्ये वार्षिक आराखड्याला मान्यता द्यायची आहे. आराखडा तयार करताना गावातील/पाड्यावरील लोकांचा विचार घेणे आवश्यक आहे. त्यानंतर ग्रामसभेमध्ये सर्वांच्या ग्रामपंचायतींचा आराखडा एकत्र करायचा आहे.

गावविकासाचा आराखडा तयार करून त्याप्रमाणे उत्तम दर्जाची कामे राबवण्यासाठी ग्रामसभेला चांगल्या संस्थांची मदत घेता येईल.गरजेनुसार ग्रामपंचायतींच्या कामात मदतीसाठी कंत्राटी कर्मचारी नेमता येतील. गावातील विविध समित्या गावाच्या विकासात साहाय्य करतील. ग्रामसभेच्या मागणीनुसार प्रशासकीय विभागांचे अभियंता, तांत्रिक व्यक्ती हेदेखील गावाला तांत्रिक मार्गदर्शन करतील.

ग्रामसभा, ग्रामपंचायत व ग्रामसमित्या यांना सक्षम बनवण्यासाठी विविध प्रकारचे प्रशिक्षणदेखील आपल्याला मिळेल. या सर्व मदतीचा वापर करून गावाला मिळणाऱ्या निधीचा सर्वाधिक चांगला वापर ग्रामसभेने करावयाचा आहे.

### विकासात अविचार नको!

गावाला मिळणाऱ्या थेट निधीतून, इतर योजनाखाली होऊ शकणारी नेहमीची कामे सोडून; काही वेगळी आणि विशेष स्वरूपाची कामे करायची आहेत. ज्यामुळे गावाचा समतोल विकास होऊन गाव स्वावलंबी बनू शकेल. ग्रामसभा पुढीलप्रमाणे खर्च करू शकते.

**या बाबींवर खर्च करता येईल.**

१) कौशल्यवृद्धी, रोजगार व उत्पन्न वाढ, २) सार्वजनिक सुविधा जसे भातगिरणी, धान्य बँक, ३) शिक्षण, आरोग्य, पोषण इत्यादी सेवांचे बळकटीकरण. दूरसंचार व दळणवळण सुविधांचे बळकटीकरण, सामुदायिक संसाधनांचे जतन व व्यवस्थापन. ४) दुर्गम क्षेत्रामध्ये अतिरिक्त सुविधा/कर्मचारी देणे. ५) छोटे तलाव, गौण खनिजे इत्यादींचे व्यवस्थापन. ६) सार्वजनिक वनहक्कांचे उपक्रम, गौण व वन उपजावर प्रक्रिया व विक्रीच्या सुविधा. ७) पर्यटन विकासाचे उपक्रम. ८) नादुरुस्त सुविधांची दुरुस्ती व पुनरुज्जीवन. ९) ग्रामपंचायत व ग्रामसक्षमीकरण.

**या बाबींवर खर्च करू नये**

१) वैयक्तिक लाभ. २)इतर योजनांखाली सहज मिळणारा लाभ. ३) ४० टक्क्यांपेक्षा अधिक बांधकाम. ४) घरांना जोडणारे अंतर्गत रस्ते. ५) गावाचे प्रवेशद्वार/कमान, सुशोभीकरण. ६)गावाचे कर संकलन उद्दिष्ट पूर्ण करणे. ७)ग्रामपंचायतीचे वीज बिल/देयके भरणे. ८)लाभार्थी हिश्शाची रक्कम. ९) धार्मिक सण, समारंभ, उत्सव. १०) आदिवासी विकासाखेरीज इतर विषय.

**(लेखक हे नंदुरबारचे जिल्हा माहिती अधिकारी आहेत.) संपर्क : ०९४२२७८५५५५**

आदिवासी विकास विभाग
आदिवासी जनहिताय
महाराष्ट्र शासन

## प्रोत्साहन निधी!




**ज्या ग्रामपंचायती उत्कृष्ट काम करतील त्यांना काही निधी बक्षीस रुपानेदेखील मिळू शकेल. त्यामुळे संपूर्ण गावाने पुढाकार घेऊन, या योजनेत चांगले काम करून दाखवायचे आहे. अशाप्रकारे गावाच्या विकासातील अनेक उपक्रम आता गावालाच राबवता येणार आहेत. त्यासाठी प्रत्येक वर्षी निधी थेट ग्रामपंचायतीला मिळणार आहे. गावाच्या विकासाचा आराखडा आता ग्रामसभाच मंजूर करेल. आराखडा राबवण्याची जबाबदारीदेखील गावाचीच राहील. त्यामुळे आदिवासी गावांना आपली संस्कृती संसाधने, परिसर, स्थानिक वैशिष्ट्ये हे सर्व विचारात घेऊन विकासाची दिशा व वाटचाल ठरवता येईल.**

# सुसंधी उभारणीची...

**गडचिरोली जिल्हा हा आदिवासीबहुल जिल्हा आहे. गडचिरोली म्हणजे नक्षलग्रस्त अशी असणारी ओळख पुसण्यात पोलिसांना यश प्राप्त झाले आहे. पोलीस दलाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे नक्षली कारवाया आता मोडीत निघत असून ८० ते ८५ टक्के जिल्हा सुरक्षित झाला आहे. वनसंपत्तीने संपन्न असा हा जिल्हा आता वनसंपदेसोबत खनिजसमृद्ध जिल्हा असून तो या भागात उद्योगाच्या नव्या सुसंधीचा जिल्हा म्हणून ओळखला जाऊ लागला आहे.**




**राज्यपाल सी. विद्यासागर राव गोदावरी पुलाची पाहणी करताना.**

गडचिरोलीच्या विस्ताराला वेग सर्वच बाजूने होताना दिसतो. यात सर्वात महत्त्वाचा वाटा दळणवळणाचा असणार आहे. जिल्हा केवळ दोनच मार्गांनी राज्याशी आतापर्यंत जोडला आहे. रेल्वेमार्ग जिल्ह्यात केवळ १८ किलोमीटर आहे. देसाईगंज (वडसा) येथे ही रेल्वे गडचिरोलीच्या एका टोकाला स्पर्श करून जाते. मात्र राज्यात सत्तासूत्रे घेतल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोलीच्या विकासाचा मुद्दा प्राधान्याने हाती घेतला. अल्पावधीत चित्र बदलायला प्रारंभ झाला आहे.

राज्यातून आलेल्या प्रस्तावांना केंद्रात राज्याचे प्रतिनिधित्व करणारे रस्तेवाहतूक मंत्री नितीन गडकरी आणि रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांनीही योग्य प्रतिसाद दिला आहे. राज्याच्या सीमावर्ती भागातला हा जिल्हा उत्तर-दक्षिण ४६५ किलोमीटर लांबीचा आहे. दक्षिण टोकाला असणाऱ्या सिरोंचा तालुक्याची नाळ तेलंगणाशी अधिक आहे. या तालुक्यात राहणाऱ्यांमध्ये बहुसंख्य तेलुगू भाषिक आहेत. त्यांचा रोटी-बेटी व्यवहार तेलंगणाशी अधिक आहे.

सिरोंचाला तेलंगाणाशी जोडणारा महत्त्वाकांक्षी अशा गोदावरी नदीवरील पुलाचे काम पूर्ण होऊन आता यावरून वाहतूक सुरू झाली आहे. या पुलाच्या उभारणीचा खर्च २९२.२२ कोटी रुपये आहे. तेलंगणाच्या बाजूने केवळ अर्धा किलोमीटर रस्ता बाकी असून त्याच्या बांधणीनंतर याचे अधिकृत उद्घाटन अपेक्षित आहे. मात्र सध्या या पुलामुळे दक्षिण गडचिरोलीचा थेट हैदराबादशी संपर्क प्रस्थापित झाला आहे.

**जिल्ह्याच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जाणारा साकोली-लाखांदूर-वडसा-गडचिरोली-चामोर्शी-आलापल्ली- रेपनपल्ली ते सिरोंचा हा मार्ग राष्ट्रीय महामार्गात रूपांतरित होत आहे. याचा २६४.५ किमी भाग गडचिरोली जिल्ह्यातून जातो. त्याबरोबरच नागपूर-उमरेड-नागभीड-ब्रम्हपुरी ते आरमोरी मार्गही राष्ट्रीय महामार्गापर्यंत दर्जा उन्नत होत आहे. तीन राज्यांना जोडणारा मंचेरिअल-सिरोंचा-जगदलपूर हा मार्ग राज्याला एकाचवेळी छत्तीसगड आणि तेलंगणाशी जोडणारा आहे. अशाप्रकारे ३६२ किलोमीटर राष्ट्रीय महामार्ग झाल्यानंतर दळणवळण सुविधा गतिमान होईल.**

यासोबतच राष्ट्रीय महामार्ग ६९ वर प्राणहिता नदीवर पुलाचे काम सुरू आहे. यामुळे तेलंगणाशी दुहेरी रस्तेसंपर्क शक्य होणार आहे. जिल्ह्यात गोंदियावरून येणारा दक्षिण भारताकडे जाणारा रेल्वेमार्ग केवळ देसाईगंज वडसापर्यंत येतो.

देसाईगंज ते गडचिरोली हा ६४ किलोमीटरचा रेल्वेमार्ग येत्या ३ वर्षात पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. असे झाल्यास दक्षिण भारतात चेन्नई, पश्चिमेस मुंबई आणि वर्धा मार्ग, उत्तरेस दिल्ली अशी थेट रेल्वे संपर्क व्यवस्था शक्य होईल. झपाट्याने विकसित होणाऱ्या दळणवळणाच्या वाटा जिल्ह्याच्या विकासाला नवे वळण देणार आहे.

**प्रशांत दैठणकर**
(लेखक हे गडचिरोली येथे जिल्हा माहिती अधिकारी आहेत.) संपर्क : ०९८२३१९९४६६

# हसत-खेळत ज्ञानार्जन

**महाराष्ट्र शासन आदिवासी समूहासाठी अनेक योजना राबवत आहे. दुर्गम आदिवासी भागात शालेय शिक्षण विभागाकडून शैक्षणिक सुधारणा केल्या जात आहेत. दुर्गम भागात ज्ञानरचना अध्यापन पद्धतींतर्गत हसत-खेळत शिक्षण हा त्याचाच एक भाग आहे.**

मेळघाटातील अतिदुर्गम भागातील डोमी व मोझरी ही संपूर्ण आदिवासी लोकसंख्या असलेली गावे. या दोन्ही गावांतील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये हसतखेळत शिक्षणावर आधारित असलेल्या ज्ञानरचनावाद या अध्यापन पद्धतीचा अवलंब करून आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे धडे दिले जात आहेत. यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास झपाट्याने व्हावी यासाठी विविध प्रयोग केले. याची फलश्रुती विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात झाली. दोन्ही शाळेतील विद्यार्थ्यांनी सर्वच विषयांत उत्तम गुण प्राप्त करून तालुक्यातील इतर शाळांच्या तुलनेत शाळेला प्रथम क्रमांक मिळवून दिला.

शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण व्हावी, यासाठी ज्ञानरचनावाद अध्यापन पद्धतीचा वापर शाळांमध्ये या अध्यापन पद्धतीचा अवलंब केला गेला आहे. डोमी व मोझरी येथील प्राथमिक शाळेने नवा आदर्श घालून दिला आहे. नावीन्यपूर्ण प्रयोगांतून शिक्षण देण्याचे काम या शाळा करत आहेत.

शाळेच्या पहिल्या दिवशी शालेय शिक्षण मंत्री विनोद तावडे यांनी या अतिदुर्गम आदिवासीबहुल शाळांची व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे शैक्षणिक गुणवत्ता व सुविधा



**ज्ञानरचनावाद या अध्यापन पद्धतीअंतर्गत हसत-खेळत ज्ञानार्जन करताना आदिवासी विद्यार्थी.**

होत आहे. अमरावती शहरापासून सुमारे दोनशे कि.मी. अंतरावरील डोमी व मोझरी या शंभर टक्के आदिवासी लोकसंख्येच्या गावात दळणवळणाची किंवा संदेशवहनाची कुठलेही प्रभावी साधने नसताना येथील जि. प. प्राथमिक शाळेच्या शिक्षकांनी आदिवासी विद्यार्थ्यांना घडवण्याचा ध्यास घेतला. त्यांच्यामध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण केला. विविध प्रयोग केले. शालेय शैक्षणिक साहित्याच्या साहाय्याने विद्यार्थ्यांकडून

**विजय राऊत**

प्रत्यक्ष कृती करून घेतली जाते. यामुळे कृतीतून विद्यार्थी शिकतात. चिखलदरा तालुक्यातील १६८ शाळांपैकी १५२ याबाबत माहिती जाणून घेतली. शिवाय प्रत्यक्षात त्या त्या शाळेतील विद्यार्थ्यांशी प्रश्नोत्तराच्या माध्यमातून संवाद साधला. दरम्यान त्यांच्या व शाळांच्या प्रगतीबाबत श्री. तावडे यांनी समाधान व्यक्त केले.

**(लेखक हे अमरावती येथे विभागीय माहिती कार्यालयात माहिती साहाय्यक आहेत.) संपर्क : ०९९७५४१२८२०**

# वनहक्क म्हणजे काय?

**आदिवासींच्या न्याय्य सामाजिक हक्कांचे रक्षण करण्यासोबतच त्यांच्या उपजीविकेसाठी पूरक असणाऱ्या वन, जल, जमीन हक्कांचे संरक्षण करणे गरजेचे आहे. पर्यावरणासोबतच परंपरा जोपासण्यासाठी ही बाब आवश्यक ठरते. राज्य शासनाने आदिवासींच्या या नैसर्गिक हक्काला जपण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वाचे पालन करत अनेक धोरणात्मक निर्णय घेतले आहेत.**

## उद्देश

- वनांमध्ये पिढ्यान्‌पिढ्या वास्तव्य असलेल्या परंतु ज्यांच्या हक्कांची नोंद होऊ शकत नाही अशा वनात राहणाऱ्या अनुसूचित जमातींच्या व अन्य परंपरागत वनवासींच्या वनांवरील हक्क व वहिवाटीला मान्यता देणे.
- वनांत राहणाऱ्या अनुसूचित जमातींच्या व अन्य परंपरागत जंगलवासींच्या मान्यता प्राप्त हक्कांमध्ये वनांचा शाश्वत वापर, जैवविविधतेचे जतन आणि पर्यावरणीय संतुलन राखणे यासाठीच्या जबाबदाऱ्या व हक्कांचा समावेश आहे. त्यायोगे वनात राहणाऱ्या अनुसूचित जमातीच्या व अन्य परंपरागत जंगलनिवासींच्या उपजीविका व अन्न सुरक्षेची निश्चिती करताना वनसंवर्धन करणाऱ्या यंत्रणाही सशक्त होतात.
- वनामधील पर्यावरणीय व्यवस्थापनाचे अस्तित्व टिकवण्यासाठी व त्याच्या शाश्वतींसाठी वनात राहणारे अनुसूचित जमातीचे व अन्य परंपरागत जंगलनिवासी अंतर्भूत आहेत, त्यांच्या वडिलोपार्जित जमिनीवर व त्यांच्या वसतिस्थानावरील वनहक्कांना वसाहत काळात तसेच स्वतंत्र भारतात शासकीय वनाचे एकत्रीकरण करताना पुरेशी मान्यता न मिळाल्याने त्यांच्यावर का अन्याय झालेला आहे.
- वनात राहणाऱ्या व शासकीय विकास कामाच्या हस्तक्षेपामुळे ज्यांना आपले निवासस्थान इतरत्र हलवणे भाग पडले अशा अनुसूचित जमातीच्या व अन्य परंपरागत जंगलनिवासींच्या वनातील निवासीच्या प्रवेशाच्या व उपभोगाच्या दीर्घकालीन असुरक्षितेवर उपयोजना करणे शक्य झालेले आहे.

अशा कारणांसाठी हा कायदा अस्तित्वात आलेला आहे.

या कायद्याचा अंमलबजावणीसाठी आदिवासी विकास विभागाला समन्वय विभाग म्हणून घोषित केले आहे.

या कायद्याच्या अंमलबजाणीसाठी प्रत्येक गावात वनहक्क समिती नेमण्यात आली आहे. वनहक्क समितीमार्फत दावे पात्र करून उपविभाग समितीकडे पुढील कार्यवाहीसाठी शिफारस करून पाठवण्यात येतात. उपविभाग समितीकडून जिल्हाधिकारी कार्यालयात अंतिम निर्णयासाठी पाठवले जातात.

वनहक्क कायद्यांतर्गत दावेदाराने केलेल्या दाव्यांना योग्य तो न्याय देण्यासाठी तालुकास्तरावर जाऊन अपील घेण्यात आली आहेत. अपिलांवर योग्य ती कार्यवाही करून दावेदारांचा दावा पात्र करण्यात आला असून दावेदारांना त्याबाबत सनद (पट्टा) देण्यात आली आहे.

ज्या दावेदारांना पट्टा देण्यात आला अशा दावेदारांची नोंद ७/१२ त घेण्यात आले असून त्यांना आदिवासी विभागाच्या योजनांचा लाभ मिळणार आहे.



गोत्रेश जोशी

वैयक्तिक हक्कांबरोबरच दावेदारांचे जीवनमान उंचावण्यासाठी सामुहिक हक्कसुद्धा देण्यात आले आहेत. प्रत्येक गाव/ वाडा/ पाडा यांनी एक सामुहिक दावा केल्यास त्या जागेवर वृक्षलागवड, गौण वनोपज, मत्स्यव्यवसाय इत्यादी उत्पन्न वाढीसाठी एक चांगला पर्याय या कायद्याने उपलब्ध करून देण्यात आला आहे. या हक्कांचा वापर केल्यास गावांचा विकास निश्चित होणार आहे.

**संकलन : आदिवासी विकास विभाग**

आदिवासी विकास विभाग

आदिवासी जनहिताय

महाराष्ट्र शासन

# दर्जेदार इंग्रजी शिक्षण

**अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इतर सर्वसाधारण विद्यार्थ्याप्रमाणे व त्यांच्यासोबत शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये इयत्ता १ ली पासून इयत्ता १२ पर्यंत शिक्षण देण्याची योजना राबवण्यात येत आहे.**



अहमदनगर जिल्ह्यात आत्मामलीक या संस्थेची कोकमठाण येथील शाळेमध्ये दाखल झालेले आदिवासी विद्यार्थी

आदिवासी विभागाच्या २१ एप्रिल, २०१५ च्या शासन निर्णयानुसार इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये दरवर्षी पाठवण्यात येत असलेल्या २५०० विद्यार्थ्यांच्या संख्येत १० पटीने वाढ करण्यात आली असून सदर लक्षांक आता दरवर्षी २५००० विद्यार्थी इतका वाढवण्यात आला आहे. यापूर्वी मागील पाच वर्षांमध्ये सुमारे १०००० विद्यार्थी या शाळांमध्ये शिक्षण घेत होते. सन २०१५-१६या शैक्षणिक वर्षामध्ये एकूण ११४ नामांकित शाळांची निवड करण्यात आली आहे, तर २०१६-१७ या शैक्षणिक वर्षामध्ये आत्तापर्यंत एकूण ११७ नामांकित शाळांची निवड करण्यात आलेली असून; त्यामध्ये भोसला मिलिटरी स्कूल, पोदार स्कूल, नॅशनल पब्लिक स्कूल, विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट यांचा समावेश आहे. यासाठी प्रतिविद्यार्थी ५०,००० ते ७०,००० शासन खर्च करीत आहे.

नामांकित शाळेची अद्ययावत माहिती, प्रवेश, विद्यार्थी उपस्थिती, विहित निकषांच्या आधारे नामांकित शाळांना थेट शुल्क वितरणासाठी संगणकीय प्रणाली विकसित करण्यात येत आहे.

# क्रीडा विकास



आदिवासी विभागाच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांचे बक्षीस वितरण करताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, आदिवासी विकास मंत्री विष्णू सवरा, ऊर्जा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि सचिव राजगोपाल देवरा.

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या अंगभूत क्षमता काही खेळांकरिता उपयोगी ठरू शकतात. त्यामुळे या विद्यार्थ्यांना क्रीडाविषयक सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्यास हे विद्यार्थी अनेक खेळांमध्ये राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रावीण्य संपादन करू शकतात. या बाबींचा विचार करून क्रीडा विभागाच्या धर्तीवर अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी आदिवासी विकास विभागामार्फत क्रीडा प्रबोधिनी मंजूर करण्यात आली आहे. या क्रीडा प्रबोधिनीचे कामकाज तात्पुरत्या स्वरूपात नाशिक येथील विभागीय क्रीडासंकुलामध्ये सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात आले आहे. शासकीय व अनुदानित आश्रमशाळा तसेच एकलव्य शाळांमधील राज्यस्तरीय, राष्ट्रीयस्तर किंवा आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदके अथवा नैपुण्य मिळविलेल्या व स्पोर्ट्स स्पेसिफिक टेस्टमध्ये पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना विभागीय क्रीडा संकुल, नाशिक येथे प्रवेश देण्यात आला आहे. सदर क्रीडा प्रबोधिनीत दरवर्षी राज्यातील अनुसूचित जमातीच्या १०० मुलांना प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट आहे.

# मेळघाटात कुपोषणमुक्ती

**योग्य उपाययोजनांमुळे मागील दीड-दोन वर्षांत राज्यातील कुपोषण या समस्येवर सकारात्मक बदल बघायला मिळत आहे. मेळघाटात मोठ्या प्रमाणात बालमृत्यूचे प्रमाण घटले आहे. कुपोषणामुळे होणाऱ्या अघटित घटनांना आळा बसला आहे.**

कुपोषणामुळे मेळघाटकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलण्याकरिता आदिवासी बांधवांना विकास प्रक्रियेत सहभागी करून घेण्यात येत आहे. त्यांच्यात सकारात्मक बदल घडवून आणण्याकरिता जिल्हाधिकारी



अमरावती यांच्या नेतृत्वात जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, आरोग्य विभाग, एकात्मिक आदिवासी विकास विभागांतर्गत नियोजनाचा आराखडा करण्यात आला. डिसेंबर २०१५ पासून मेळघाटात अमृत आहार योजनेची अंमलबजावणी होत आहे.

## केवळ मेळघाट

महाराष्ट्रात केवळ मेळघाटातच ग्राम बाल विकास केंद्राची सुरुवात करण्यात आली. यात जिल्हाधिकाऱ्यांनी स्थानिक पातळीवर १ कोटी ६६ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला असून या अंतर्गत ० ते ६ वर्ष वयोगटातील मुलाला अंगणवाडीतून अंडी दिली जात आहेत. यामुळे मुलांचे अंगणवाडीत येण्याचे प्रमाण वाढले आहे.

## परसबाग

मागील दीड वर्षांपासून मेळघाटात परसबाग योजनेवर भर देण्यात आला आहे. मागील वर्षी जवळपास शंभर परसबागा फुलवण्यात आल्या होत्या. यावर्षी दोनशे अंगणवाड्यांना परसबागा देण्यात आल्या आहेत. परसबागांमुळे गर्भवती महिला व मुलांच्या आहारात सकसता आली.

मेळघाटातील जवळपास २० अंगणवाड्यांनी आयएसओ मानांकनाकरिता तयारी सुरू केली आहे. मेळघाटात जवळपास आठ हजार मुलं मध्यम स्वरूपाच्या श्रेणीत तर तर दोन हजार

**अनिल कडू**

तीव्र स्वरूपाच्या श्रेणीत आहेत. मागील प्रमाणापेक्षा हे प्रमाण ३० टक्क्यांनी कमी झाले. हा आठ हजाराचा आकडा दोन हजारावर आणि दोन हजाराचा एक हजाराच्या आत आणण्याचा संकल्प जिल्हा प्रशासनाने केला आहे. कुपोषणामुळे होणारे बालमृत्यू नगण्य असून मेळघाटची कुपोषणमुक्तीच्या दिशेने वाटचाल सुरू आहे.

(लेखक हे कुपोषण विषयाचे अभ्यासक आहेत.)
संपर्क : ०९९२२९२८१६९

## अंगणवाडी केंद्रात इंग्रजी

सगळ्या प्रश्नांचे मूळ दर्जेदार शिक्षणात असते. त्यामुळे नव्या काळाची गरज ओळखून अंगणवाडी केंद्रात येणाऱ्या मुलांना इंग्रजीची ओळख करून देण्याचे



नियोजन केले आहे. त्याकरिता इंग्रजीमधून प्रार्थना, वस्तूंची नावे, ॲक्शन वर्डस्, रिड ॲण्ड राइट आणि ऱ्हाइम्स या सहा मुद्यांवर अभ्यासक्रम तयार केला आहे. अभ्यासक्रम तयार करताना बालकांच्या मानसिक वयाचा विचार करण्यात आला आहे. सर्व अंगणवाडी पर्यवेक्षिकांना याकरिता प्रशिक्षण देण्यात आले आहे. प्रशिक्षित पर्यवेक्षिका आता अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षित करीत आहेत. मेळघाटात प्रायोगिक तत्त्वावर हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. यातून अंगणवाडीतच मुलांना इंग्रजीची ओळख होण्यास मदत होणार आहे. अंगणवाडीत येणाऱ्या ० ते ६ वयोगटातील मुलांकडे ६ व्या वर्षांनंतर दुर्लक्ष होत असे. पण यावर्षी या मुलांकडे विशेष लक्ष पुरवून शिक्षणाची आवड त्यांच्यात निर्माण करण्यात आली आहे.

# अमृत आहार

**अनुसूचित क्षेत्रातातील गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एकवेळ चौरस आहार देण्यासाठी भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना महाराष्ट्र शासनाने १८ नोव्हेंबर, २०१५ पासुन लागू केली आहे. त्यामुळे मेळघाटातील कुपोषणात लक्षणीय घट झाली असून आदिवासी बालक व माता यांचे शरीर सदृढ होण्यास मदत होत आहे.**

**सुरेश काचावार**

अनुसूचित क्षेत्रात आहारातील उष्मांक व प्रथिनांच्या कमतरतेमुळे स्त्रियांमध्ये कमी वजनांची बालके जन्माला येण्याचे प्रमाण जास्त आहे. आदिवासी समाजामध्ये याचे प्रमाण ३३.१ टक्के एवढे आहे.



अमृत आहार योजनेंतर्गत सकस आहार घेताना आदिवासी महिला.

आदिवासी स्त्रियांमध्ये गरोदरपणाच्या शेवटच्या तिमाहीमध्ये वजनवाढीचे प्रमाण कमी असल्यामुळे त्याचा परिणाम बाळाच्या वजनावर होऊन कमी वजनाची बालके जन्माला येतात, असे संशोधन व अभ्यासावरून सिद्ध झाले आहे. तसेच बालक जन्मल्यानंतर पहिले ३ महिने पूर्णपणे मातेवर अवलंबून असल्यामुळे या कालावधीत मातेचे आरोग्य व पोषण चांगले राहणे आवश्यक आहे. राज्यपालांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये अनुसूचित क्षेत्रातील गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना अतिरिक्त पूरक आहार देण्याबाबत चर्चा झाली. त्यानंतर आणि १८ नोव्हेंबर, २०१५ पासून या योजनेची अंमलबजावणी सुरू झाली.

या योजनेंतर्गत अनुसूचित क्षेत्रांतर्गत अंगणवाडी/मिनी अंगणवाडी क्षेत्रातील सर्व गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना आहारातून उष्मांक व प्रथिनांची उपलब्धता होण्यासाठी एकवेळ चौरस आहार देण्यात येतो.

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी मुलांमध्ये चेतना निर्माण करण्याचे काम केले आहे. त्यांचे हे योगदान लक्षात घेऊन या योजनेचे नामकरण भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना असे करण्यात आले आहे.

(लेखक हे अमरावती येथे जिल्हा माहिती अधिकारी आहेत.) संपर्क : ०९४२२९४५२८५

## अशी आहे अमृत योजना

**राज्यातील १६ आदिवासी जिल्ह्यांतील १०५ एकात्मिक बाल विकास प्रकल्पांतर्गत अमृत योजना राबवण्यात येत आहे. या १६ आदिवासी जिल्ह्यात १३५९३ अंगणवाड्या /मिनी अंगणवाड्या आहेत. या सर्व ठिकाणी आदिवासी लाभार्थ्यांना पोषण आहार देण्यात येतो. यामध्ये चपाती/भाकरी, तांदूळ, कडधान्य-डाळ, दूध साखरेसह सोया (आठवड्यातून एक दिवस), शेंगदाणा लाडू साखर/गुळासह (आठवड्यातून पाच दिवस), अंडी/केळी/नाचणी/हलवा, हिरव्या पालेभाज्या, खाद्यतेल, आयोडिनयुक्त मीठ, मसाला आदी अन्नघटक प्रत्येक लाभार्थ्यांना देण्यात येतो. प्रत्येक लाभार्थ्यांचा चौरस आहाराचा सरासरी खर्च रुपये २५ एवढा आहे.**

**अंगणवाडी सेविका भोजनांच्या घटकांमध्ये आहार समितीच्या सहमतीने स्थानिक घटकांच्या उपलब्धतेनुसार व ऋतुमानानुसार बदल करू शकतात. अंगणवाडी सेविका ए.एन.एम.मार्फत पुरवण्यात आलेल्या आय.एफ.ए. गोळ्या, लाभार्थ्यांना जेवणासोबत देतात. गरोदर स्त्री व स्तनदा मातेची वाढ तसेच नवजात बालकांचे जन्मापासूनचे वजन याबाबत प्रत्येक महिन्याला अंगणवाडीमध्ये नोंद घेण्यात येते. ज्या महिला अंडी खात नाही त्यांना केळी किंवा नाचणीचा हलवा पुरवला जातो. या योजनेमुळे आदिवासी समाजातील गरोदर व स्तनदा मातांचे आरोग्य चांगले राहण्यास मदत झाली आहे.**


# रावलापाणी – गाथा संघर्षाची

**नंदुरबार जिल्ह्यात स्वातंत्र्य संग्रामात दोन वेळा ब्रिटिशांनी अमानुषपणे गोळीबार केला. त्यातील एक घटना बाल शहीद शिरीषकुमार याने खांद्यावर तिरंगा घेतला म्हणून घडलेली. या घटनेचे स्मृतिस्मारक नंदुरबारमध्ये आहे. मात्र दुसरी घटना जालीयनवाला बागेची पुनरावृत्ती करणारी, शेकडोंच्या संख्येने भारतमातेला परदास्यातून मुक्त करण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देऊनही ज्यांची साधी नोंद इतिहासाने घेतलेली नाही. भिल्लांचा उठाव रस्त्यावर चळवळीच्या रूपात येण्याआधी चिरडून टाकणारे, हा उठाव जगाला जणू कळू द्यायचाच नव्हता! हा उठाव सामुदायिक प्रेरणांतून संघटित होऊन केला गेला होता.**

१ जानेवारी २०१२, धडगाव तालुक्यातील अक्राणी या किल्याच्या ठिकाणी जाण्याचा योग आला. ४-५ वर्षांच्या अथक प्रयत्नानंतर प्रशासनाने अक्राणी या गावासाठी १४ कि.मी. अंतरावरील स्वस्त धान्य दुकानाची सोय रद्द करून प्रत्यक्ष गावातच स्वस्त धान्य दुकान मंजूर करून दिल्याचा गावकऱ्यांना मोठा आनंद होता. परंतु माझ्याकडे २ तारखेचा दुपारपर्यंतचा वेळ रिकामा होता. ब्रिटिश काळात झालेल्या गोळीबारात शेकडो आदिवासी मारले गेले, ते ठिकाण येथून जवळच असल्याचे ऐकले होते. ते ठिकाण पाहण्याचे ठरवले. प्रत्यक्ष निझरा नाल्याच्या त्या खोल पात्रात ७० वर्षानंतरही खडकावरील गोळीबाराच्या निशाण्या पाहिल्यावर विचारचक्राने वेग धरला. दगडावरील त्या खुणा अस्वस्थ करून गेल्या, घडलेला इतिहास शोधण्यासाठी प्रेरणा देणाऱ्या ठरल्या.

५ जानेवारी, २०१२ ला धुळ्याचे राजवाडे संशोधन मंडळ गाठले. श्री संत गुलाब महाराज हे श्री. शंकर विनायक ठकार यांनी लिहिलेल्या आणि धुळे व नंदुरबार जिल्ह्याचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान या प्रा.जी.बी. शहा यांनी लिहिलेल्या पुस्तकात या संग्रामाबाबत जेमतेम ४-५ ओळींचा उल्लेख आढळला. नेमका गोळीबार कधी झाला, कोणी केला, कुठे झाला, त्यात किती ठार झालेत, याचाही उल्लेख आढळून येत नाही. मात्र बंदुकीच्या नळीतून निघालेल्या गोळ्यांमुळे घटनेतील क्रौर्य स्वस्थ बसू देत नव्हते.

मोरवड (रंजनपूर) ता. तळोदा जे श्री. संत गुलाब महाराज व संत रामनाथ महाराज यांचे जन्म ठिकाण असून आपधर्म स्थापनेचे व आरती पूजा चळवळीचे मूळस्थान आहे. तेथे रावलापाणी संग्रामाबाबत श्री. संत रामदास महाराजांचे वारस




श्री. चंद्रसेन महाराजांची भेट घेऊन माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. शोधमोहिमेला तेथून दिशा मिळाली.

२३ जानेवारी, २०१२ ला जिल्हाधिकारी



**डॉ. कांतीलाल टाटिया**


कार्यालयावर विशालमोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. ५००० च्यावर सह्यांच्या निवेदनाद्वारे रावलापाणी येथे शहिदांचे स्मारक व्हावे ही प्रमुख मागणी करण्यात आली. घटनेचा मागोवा घेत प्रत्यक्षदर्शींची व इतर



**निझरा नाल्यातील ज्या खोल पात्रात आदिवासींवर ब्रिटिशांनी गोळ्या चालवल्या त्यांच्या खुणा अद्यापही स्पष्टपणे दिसतात.**

माहिती गोळा करण्यासाठी तब्बल ४ महिने मी प्रवास केला. अनेकांच्या भेटी घेतल्या. तेव्हा कुठे विषयाचे गांभीर्य कळले. जुन्या लोकांमध्ये अद्याप घटनेबद्दल थरार असल्याचे जाणवत होते. आवाजाचा कंप आणि चेहऱ्यावर भय जाणवत होते. आजपर्यंत कोणीही याबाबत विचारायला आले नाही. पण आम्ही आलोय त्याबद्दल त्यांच्या मनात आश्चर्य, आदर व अभिमानमिश्रित भाव होते.



ब्रिटिशांसोबत रावलापाणी येथील संघर्षाचे रेखाचित्र.

**१ मार्च, १९४३ ला 'अक्राणी महल' या किल्ल्यावरून निघालेला रामदास महाराजांच्या नेतृत्वातील १५००-२००० लोक कारवा नाला येथे स्थिरावले. महाराज परत आल्याबाबतची खबर वरिष्ठांना आधीच होती. १ मार्च १९४३ ला 'बन' या गावी १ पलटन इंग्रज सैनिक पोहोचवले गेले. महाराजांच्या 'कारव्या'ला नाल्याच्या दोन्ही बाजूने घेरले. २ मार्चला सुर्योदयापूर्वी हा 'कारवा' मार्गस्थ होताना अचानक दोन्ही बाजूंनी नि:शस्त्र जमावावर बेछूट गोळीबार केला गेला. महाराजांना गोळी लागू नये म्हणून त्यांच्या अनुयायांनी ढालीसारखे घेरून ठेवले. सुमारे ४० प्रेते तळोदे येथे शवविच्छेदनासाठी आणण्यात आली होती. या हत्याकांडाची जनरल डायरने केलेल्या जालियनवाला हत्याकांडाशी तुलना केली आहे. आजही २ मार्चला दरवर्षी मोरवडचे आपधर्मी न चुकता रावलापाणीच्या संग्रामस्थळी जाऊन हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करतात.**

स्वातंत्र्यसंग्रामात या अमानवी हत्याकांडाचा इतिहास सुवर्णाक्षरांनी लिहिला जावा, असा होता. मात्र इतिहासाच्या ग्रंथात दोन ओळींचही भाग्य या संग्रामाला लाभले नाही, संग्रामस्थळी स्मारक होण्याबाबत शिफारस, मंडलस्तरावरून मे २०१२ ला करण्यात आली.

जिल्हा प्रशासनानेही आमच्या भावनेची, घटनेच्या गांभीर्याची दखल घेत चौकशी अहवालाची छाननी करत महाराष्ट्र शासनाला संग्रामस्थळी उचित स्मारक व्हावे व हुतात्मा झालेल्या आदिवासी वीरांना स्वातंत्र्यसैनिक म्हणून घोषित करण्यासाठी शिफारस केली. १५ जानेवारी, २०१५ ला नंदुरबार जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीष महाजन यांनी याची नोंद घेतली.

३१ जानेवारी २०१५ रोजी राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी नंदुरबार जिल्ह्यातील दुर्गम सातपुड्यातील पिंपळखुटा या गावाला भेट दिली. त्यांनी माहिती जाणून घेतली. २७ फेब्रुवारी २०१५ ला आदिवासी विकास मंत्री विष्णू सवरा जिल्ह्यात दौऱ्यावर आले असताना नंदुरबार येथे त्यांची आप समाजातर्फे भेट घेतली. त्यांना रावलापाणी संदर्भात माहिती दिली.

५ मार्च, २०१५ ला राजभवनातून रावलापाणी संदर्भात बैठकीसाठी बोलावणे आले. ११ मार्च, २०१५ राज्यपालांनी चर्चेला बोलावले. स्वातंत्र्यसंग्रामात आदिवासींचे योगदान असल्याचा, बलिदानाच्या इतिहासाला उजाळा मिळावा, संग्रामस्थळ हे प्रेरणास्थळ व्हावे, होणारे स्मारक आगळेवेगळे व्हावे, उभारलेली वास्तू पाहिल्याबरोबर नेमका घडलेला प्रसंग डोळ्यासमोर उभा राहावा, असे विचार त्यांनी मांडले. २८ एप्रिल, २०१५ रोजी विशाखापट्टणम येथील वेंकट बोथा या अनुभवी तज्ज्ञास राजभवनातून पाठवण्यात आले. वेंकट बोथा यांनी प्रत्यक्ष रावलापाणी येथे भेट दिली. रावलापाणीचा इतिहास समजून घेतला. स्मारकासाठी जागा वगैरेबाबत प्राथमिक चर्चाही केली.

(लेखक हे नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींच्या चळवळीचे अभ्यासक आहेत.)
संपर्क : ०९४२२७९१४५०

# बचतगट आणि आदिवासी महिला

**बचतगटातून आर्थिक उन्नतीने देशभर महिलांच्या सशक्तीकरणामध्ये मोठे योगदान दिले आहे. बचतगटांपासून आदिवासी समाज दूर राहिला नसून आंबेगाव तालुक्यातील तिरपाड गावात बचतगटातून झालेल्या परिवर्तनाची ही यशोगाथा..**

आंबेगांव तालुक्यात अतिदुर्गम डोंगराळ भागात तिरपाड या ग्रामपंचायतीत तिरपाड हे साधारण साधारण १८०० आदिवासी लोकसंख्येचे गाव वसलेले आहे. या ग्रामपंचायतीत तिरपाड डोण, नानवडे, नाव्हेड ही महसुली गावे आहेत. येथील लोकांचा प्रमुख व्यवसाय केवळ भात, नाचणी शेती व वनामधून हिरडा गोळा करून विकणे; याशिवाय या ठिकाणी अन्य निश्चित रोजगार किंवा पाण्याअभावी रब्बी हंगामात शेती करणे शक्य नाही. अशा परिस्थितीत या ठिकाणी बचतगटाने क्रांती घडवून आणली.

महिलांना एकत्र आणण्यासाठी सुरुवातीच्या काळात महिला सभा घेण्यात आल्या. पहिल्यांदा उपस्थिती कमी होती. परंतु संरपंच व ग्रामसेवक महिला असल्याने त्यांनी घरोघरी जाऊन मार्गदर्शन केले. बचतगटाच्या माध्यमातून त्या कशा सक्षम होऊ शकतात. हे त्यांना पटवून दिले. त्यानुसार महिलांनी बचतगट स्थापन केले.

सुरुवातीला ४ बचत गट स्थापन करण्यात आले. या गटाच्या माध्यमातून गटाच्या सभा घेणे महिलांना विचार मांडण्याची संधी, त्यांच्या कल्पना मांडणे, विविध खेळ गुणदर्शन, विविध स्पर्धा घेऊन महिलांना बोलते करण्याचा प्रयत्न करण्यात आला. हळूहळू या गावातील विविध प्रश्नांमध्ये स्वत:हून भाग घेऊ लागल्या. स्वत:हून एकत्र येऊन बचतगट स्थापन करू लागल्या. गावातील बचतगटाच्या संख्येत वाढ होऊन आता एकूण १५ गट स्थापन झाले आहेत.



मुख्य प्रश्न होता तो महिलांना व्यवसाय प्रशिक्षण देऊन आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा. त्यासाठी स्थानिक परिस्थितीनुसार स्थानिक पातळीवर, वनामध्ये जो कच्चा माल उपलब्ध होईल, त्यावर प्रक्रिया करून जर काही व्यवसाय करता आला तर कमीत कमी भांडवलावर जास्तीत जास्त नफा कमावता येईल याचा विचार करून, तिरपाडच्या जंगलात उपलब्ध वनोउपज जसे करवंद, कैऱ्या इत्यादी रानमेव्याचा उपयोग करून, विविध प्रकारची लोणची बनवण्याचे तसेच नाचणीचे पापड बनवण्याचा व्यवसाय करावा, असे बचत गटातील महिलांनी ठरवले.

याच कल्पनेतून बँक ऑफ महाराष्ट्र व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्या सहकार्याने ग्रामपंचायत तिरपाड येथे व इतर आजूबाजूच्या गावातील एकूण ४० महिलांना लोणची व पापड बनवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. त्याचीच फलश्रुती म्हणून भाग्यलक्ष्मी बचतगटातील महिलांनी लोणचे बनवण्याचा व्यवसाय सुरू केला. बनवलेली लोणची त्यांनी विविध शासकीय संस्था, बँक कर्मचाऱ्यांना विकली. घरगुती पद्धतीची लोणची ग्राहकांच्या पसंतीस उतरली. आता बचतगटाला स्वत:हून ऑर्डर्स मिळू लागल्या आहेत.

कधी घराच्याही बाहेर न पडणाऱ्या महिलांनी, लोणच्याचे उत्पादन सुरू करून उद्योग यशस्वी करून दाखवले. आता विविध कृषी प्रदर्शन बचतगट मेळाव्यामध्ये या लोणच्याची विक्री मोठ्या प्रमाणावर होत आहे. केवळ लोणच्यावर अवलंबून न राहता जैविक विविधतेने संपन्न असलेल्या तिरपाडच्या वनक्षेत्रात उपलब्ध असणाऱ्या हिरड्यावर प्रक्रिया करून त्यांची विक्री करण्याचा; व तसेच शिकेकाई पावडर बनवण्याचा मानस इतर गटांचा आहे. त्यासाठी आदिवासी उपाययोजनेंतर्गत पेसा ग्रामपंचायतींना मिळालेल्या ५ टक्के निधीची जोड देऊन तिरपाड गावात हिरडा फोडण्याचे मशिन खरेदी करून, महिलांना रोजगार प्राप्त करून देण्याचा निर्णय ग्रामसभेने घेतला आहे.

**संकलन : आदिवासी विकास विभाग**

# ‘आकाश’ भरारी

**यवतमाळ जिल्ह्यातील माणिकडोह येथील आकाश टारफे या विद्यार्थ्याने शासनाच्या योजनेंतर्गत मिळालेले जेईई (जॉइन्ट एन्ट्रंस एक्झामिनेशन)चे प्रशिक्षण घेऊन उत्तुंग यश संपादन केले आहे. आई सयाबाई आणि वडील प्रदीप शेतात राबत असताना त्यांच्या मुलाने राष्ट्रीय पातळीवर मिळालेले यश असंख्य विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. आकाशसोबतच भारती चौधरी आणि हेमंत तरम यांनीही या परीक्षेत यश मिळवले आहे.**

माणिकडोह जिल्हा येथील मुंगसाजी आदिवासी आश्रमशाळेतील आकाश टारफे याने केवळ जिद्दीच्या जोरावर भरारी घेत जेईईमध्ये ११८७ रँक प्राप्त केला आणि नागपूरच्या व्हीएनआयटीमध्ये मेकॅनिकल इंजिनिअरिंगला प्रवेश मिळवला. जेमतेम आर्थिक स्थिती असलेल्या कुटुंबातून येऊन त्याने हे यश मिळवले आहे.

पहिली ते बारावी या १२ वर्षांच्या शैक्षणिक प्रवासात आकाशला तब्बल पाच शाळा बदलाव्या लागल्या. पुसद तालुक्यातील हर्षी येथील मूळचा रहिवासी असलेल्या आकाशने पहिली ते तिसरी हर्षी येथील आश्रमशाळा, चौथी आणि पाचवी ठाणे येथील महापालिकेची शाळा, सहावी आणि सातवी हर्षी येथील जिल्हा परिषद शाळा. आठवी ते दहावी हर्षी येथील शिवाजीराव मोघे विद्यालय या विद्यालयातून उत्तीर्ण झाल्यानंतर अकरावीसाठी पुसद येथे शिक्षण घेण्याची इच्छा होती. मात्र इंजिनिअरिंगच्या क्लासेसची फी देण्यास असमर्थ असल्याने आर्थिक विवंचनेतून अकरावी आणि बारावी माणिकडोह येथील मुंगसाजी आदिवासी आश्रमशाळेत शिक्षण घेतले. बारावी विज्ञानची परीक्षा दिल्यानंतर पुसद येथील प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातर्फे अमरावती येथील गाईडन्स पॉईंट सेंटर येथे प्रवेश घेऊन जेईई ॲडव्हान्स परीक्षेत पात्र ठरला. जेईई मेन आणि ॲडव्हान्स परीक्षा देण्याची इच्छा असल्याने पुसद येथील प्रकल्प कार्यालयाने अमरावती येथील प्रशिक्षणासाठी निवड करावी यासाठी त्याने प्रयत्न केले. आदिवासी विकास विभागाच्या वतीने अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी वेगवेगळ्या प्रकारचे प्रशिक्षण देण्यात येते. यावर्षी पुसद येथील प्रकल्प कार्यालयातर्फे जेईई परीक्षेचे प्रशिक्षण देण्यात आले. त्यानुसार ४५ दिवस डॉ. राजेश खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली भरपूर तयारी केली. जेईई मेनमध्ये ६५ मार्क मिळाल्यामुळे जेईई ॲडव्हान्ससाठी पात्र ठरला.



**आकाश टारफे**
(जेईई मेन परीक्षा क्र.८८ ॲडव्हान्स अखिल भारतीय परीक्षा क्र. ५११)



**भारती चौधरी**
(जेईई मेन परीक्षा क्र.७५ ॲडव्हान्स अखिल भारतीय परीक्षा क्र. ९७७)



**हेमंत तरम**
(जेईई मेन परीक्षा क्र.६५ ॲडव्हान्स अखिल भारतीय परीक्षा क्र. ११८७)

**गजानन कोटुरवार**

(लेखक हे यवतमाळ येथे माहिती साहाय्यक आहेत.)
संपर्क: ०९८८११०२०८०

प्रेरणा

## अशी आहे जेईई प्रशिक्षण योजना

- **आदिवासीबहुल भागातील विद्यार्थ्यांसाठी योजना**
- **दुर्गम भागात सोयी नसल्याने प्रशिक्षणाची सोय**
- **अनुसूचित जमातीतील बारावी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण**
- **आर्थिकदृष्ट्या कमकुवत विद्यार्थ्याला प्रशिक्षण देऊन प्रवेशाची संधी**
- **न्युक्लिअस बजेट अंतर्गत केंद्रवर्ती अर्थसंकल्पातून निधी**
- **जेईई, आयआयटी, एनआयटीच्या सर्व प्रवेशपूर्व परीक्षांसाठी प्रशिक्षण**
- **जेईई मेनसाठी प्रत्येक विद्यार्थ्यामागे खर्च १५ हजार रुपये**
- **जेईई ॲडव्हान्ससाठी खासगी क्लासेसकडून मोफत प्रशिक्षण**
- **हुशार आणि होतकरू विद्यार्थ्यांची शाळेतूनच निवड**
- **एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडून दरवर्षी प्रशिक्षण**
- **विद्यार्थ्यांना आयआयटीसाठी आदिवासी विकास विभागाच्या वतीने प्रशिक्षण**
- **विद्यार्थ्यांना योजनेच्या माहितीसाठी वृत्तपत्रांची मदत**

# गुणवत्तेत वाढ

**आदिवासींना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्यास त्यांना मुख्यप्रवाहात आणणे शक्य आहे. दुर्गम अशा भागात आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळांच्या माध्यमातून आदिवासी विद्यार्थ्यांसाठी ही ज्ञानगंगा पोहोचवण्यात येत आहे. त्यांचा लाभ घेत आपण यासाठी पात्र आहोत. ही बाब गडचिरोली जिल्ह्यातील मुलामुलींनी सिद्ध केली आहे.**

यंदाच्या दहावी परीक्षेचा निकाल झाला त्या वेळी आदिवासी विद्यार्थ्यांच्या ७ शाळांचा निकाल १०० टक्के लागला तर ९० टक्क्यांपेक्षा अधिक निकाल असणाऱ्या शाळांची संख्या ७ आहे. गडचिरोली आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत एक इंग्रजी माध्यमांची शाळा चालवण्यात येते. यात १२ विद्यार्थ्यांनी ८० टक्क्यांहून अधिक गुण मिळवत आपण या क्षेत्रात मागे नाही असे दाखवून दिले.



गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थी

आश्रमशाळेतील विद्यार्थिनींमध्ये प्रथम आलेल्या धाटी आश्रमशाळेच्या विद्यार्थिनीला ९१ टक्के गुण आहेत यावरून गुणवत्तेत होत असलेली वाढ दिसते.

बदलत्या तंत्राचा वापर विद्यार्थ्यांना करता यावा यासाठी ८ शाळांमध्ये डिजिटल क्लासरूम सुरू करण्यात आल्या आहेत. यावर्षी शैक्षणिक सत्राच्या पहिल्या दिवशी आमदार डॉ. देवराव होळी, जिल्हाधिकारी ए.एस.आर. नायक आदींनी वेगवेगळ्या आश्रम शाळांमध्ये या क्लासरूमचे उद्घाटन केले. येथे विद्यार्थ्यांना पुण्या - मुंबईच्या विद्यार्थ्यांप्रमाणे इंटरनेटचा वापर अभ्यासासाठी करता येणार आहे. ज्ञानरचनावादानुसार प्रगत शिक्षण ही संकल्पना गडचिरोलीतील सर्व आश्रमशाळांमध्ये राबवण्यात येत आहे. १२ आश्रम शाळांमध्ये या धर्तीवर शिक्षण देणे सुरू आहे. प्रकल्पस्तरावर शिक्षकांच्या विषय समित्या तयार करून एकाच वेळी समन्वयातून सर्व शाळांमधील शैक्षणिक दर्जा सुधारण्यास प्रकल्प अधिकारी कौस्तुभ दिवेगांवकर (भा.प्र.से.) यांनी प्राधान्य दिले आहे. याखेरीज आरोग्य शिबिरे करिअर मार्गदर्शन वृक्षारोपण सारखे उपक्रम नियमितपणे राबवले जातात.


गडचिरोलीसारख्या जिल्ह्यात शिक्षणव्यवस्था हे आव्हान आहे. ते काम यशस्वीपणे करीत असल्याबद्दल खुद्द आदिवासी विकास मंत्री विष्णू सवरा यांनी नुकतेच पत्राद्वारे अभिनंदन केले आहे. शिक्षणाची ज्ञानगंगा आदिवासी पाड्यापर्यंत आणून, त्यांचा शिक्षणाचा टक्का यापुढे वाढताच राहणार आहे.

**प्रशांत दैठणकर**

(लेखक हे गडचिरोली येथे जिल्हा माहिती अधिकारी आहेत.) संपर्क : ०९८२३१९९४६६

## आरोग्यसाठी

खेडोपाड्यात, डोंगराळ आणि दुर्गम भागात ज्या वैद्यकीय सुविधांचे जाळे तसे कमीच. कुपोषण, बालमृत्यू या प्रमुख समस्या. अशा दुर्गम भागातील आदिवासींना मदत करण्याचे काम डॉ. सुदर्शन मालजुरे करीत आहे. पुण्याच्या भोर पंचायत समितीचे तालुका वैद्यकीय अधिकारी असलेले डॉ. मालजुरे हे परिघाबाहेर जाऊन काम करीत आहे. १९८६ पासून शासकीय सेवेत असलेल्या डॉ. मालजुरे यांना शासकीय सेवेत आता ३० वर्ष झाली आहेत. गावातील लोकांसाठी तसेच अतिदुर्गम भागात राहणाऱ्यांसाठी पाण्यातून लाँच नेणे तसेच ही लाँच सर्व औषधांनी अद्ययावत ठेवणे याला त्यांनी प्राधान्य दिले. लाँचवरती सायरन बसवून ही लाँच गावकऱ्यांना आल्याचे कळते. सायरनच्या आवाजाने लोक जमा होतात. गावात लाँच येण्याचा नेमका दिवस आणि वेळ निश्चित करण्यात आली असल्यामुळे त्याचा फायदा गावकऱ्यांना अधिक होतो. साधारणपणे शुक्रवार आणि शनिवार हे दोन दिवस लाँच फिरते. एकाचवेळी १६ गावे आणि ३५ कि.मी. असा प्रवास लाँच पार करते. भाटुंगे-डेरे-भांडोली सागवी कुंबळे बोपे आणि भाटुंगे यावरुन ही लाँच सध्या परत येते. सध्या १०० ते १५० रुग्णांवर लाँच सेवेद्वारे एकाच वेळी उपचार केले जातात. लाँचवर ५ डॉक्टर, नर्स आणि अटेंडंट यांचा त्यात समावेश असतो तर लाँचमध्ये ४ रूम तयार करण्यात आल्या आहेत. एक रूम वैद्यकीय तपासणीसाठी राखून ठेवण्यात आली आहे. एक रूम वैद्यकीय अधिकाऱ्यासाठी, व एक औषधे ठेवण्यासाठी, एक रूम परिचारिकांसाठी आहे. ५ वेगवेगळ्या केबिन्स आहेत. जेथे रुग्णांवर उपचार केले जातात.



डॉ. सुदर्शन मालजुरे

**- वर्षा फडके**

# हक्काचे घर

**शबरी घरकूल योजनेत यावर्षी २ हजार २८६ लाभार्थ्यांना हक्काचे व सर्व सुविधा असलेले घर मिळणार आहे. ही योजना केवळ ग्रामीण भागासाठीच नसून शहरात राहणाऱ्या समाजबांधवांसाठी आहे. शहरात हक्काच्या घरात स्वाभिमानाने राहण्याचा अधिकार या योजनेने मिळवून दिला आहे.**

आदिवासी हा समाज अतिदुर्गम भागात कुड्या-मातीच्या घरात, झोपड्यामध्ये किंवा तात्पुरत्या तयार केलेल्या घरात राहतो त्यांना हक्काचे व कायमस्वरूपी पक्के घर मिळावे यासाठी निवाऱ्याचा प्रश्न सोडवण्याला प्राधान्य दिले. शबरी घरकूल योजनेच्या माध्यमातून सर्व सुविधा व सोयींसह पक्के घरकूल देण्याला प्राधान्य दिले आहे.


ग्रामीण भागातील आदिवासी बांधवांना आपला हिस्सा देण्याची गरज नाही. घरे बांधतांना प्राधान्यक्रम ठरवण्यात आला असून जातीय दंगलीमध्ये आग व इतर तोडफोडीमुळे घरांचे नुकसान झालेली व्यक्ती, ट्रॅासिटी ॲक्टनुसार पीडित झालेल्या अनुसूचित जमातीच्या पात्र व्यक्ती, पूरग्रस्त क्षेत्र, घरात कुणीही कमावत नाही अशा विधवा महिला यांना घरे बांधताना प्राधान्य देण्यात आले आहे. ग्रामीण क्षेत्राकरिता शबरी आदिवासी घरकूल योजनेत दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची अट काढून टाकण्यात आली आहे.

## शबरी आदिवासी घरकुल योजना

**अनुसूचित बांधवांना पक्की स्लॅबची घरे बांधून देऊन त्यांना शौचालय व स्नानगृहाची सुविधा उपलब्ध व्हावी. त्यांच्या राहणीमानात सुधारणा व्हावी, यासाठी शबरी आदिवासी घरकूल योजना सुरू करण्यात आली आहे. घरात विद्युतीकरण करून देऊन यामध्ये पात्र लाभार्थ्यांस २६९.०० चौ.फूट चटई क्षेत्र असलेले पक्के घरकूल बांधून देण्यात येते. ग्रामीण क्षेत्रासाठी एक लाख रूपये नगरपालिका क्षेत्रासाठी दीड लाख, महानगरपालिका व मुंबई महानगरविकास प्राधिकरण क्षेत्रासाठी दोन लाख इतकी घराची किंमत ठरवण्यात आली आहे.**

शबरी घरकूल योजनेमध्ये नागपूर विभागात १ हजार ३३० लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. तसेच पारधी घरकूल योजनेमध्ये १४७ तर आदि जमातीकरिता घरकूल योजनेत १ हजार २५६ आदिवासी समाजातील बांधवांना हक्काचे आणि पक्के घर मिळाले आहे.

आदिवासी योजनेंतर्गत आदिवासी



क्षेत्राअंतर्गत येणाऱ्या अनुसूचित जमातींच्या लाभार्थ्यांसाठीच ही योजना न राहता आदिवासीबाह्य क्षेत्रातील अनुसूचित जमातीच्या पात्र लाभार्थ्यांचा या योजनेत

**अनिल गडेकर**

समावेश करण्यात आला असल्यामुळे घराच्या बांधकामांचा महत्त्वपूर्ण प्रश्न सुटण्यास मदत झाली आहे. २६९ चौरस चटई फूट क्षेत्र असलेले पक्के घरकुल उपलब्ध करून देण्यासाठी पूर्वी ७० हजार रुपये घरकुलाची किंमत होती. परंतु यामध्ये सुधारणा करून इंदिरा आवास योजनेच्या धर्तीवर ग्रामीण भागासाठी १ लक्ष रुपये वाढ केली आहे.

घरांच्या बांधकामासाठी क्षेत्रनिहाय कमाल मर्यादा निश्चित केली.

### मिळाले पक्के घर

नागपूरच्या आदिवासी नगरात पडक्या झोपडीवजा लहानशा घरात वर्षानुवर्षे राहणाऱ्या श्रीमती छाया सुनील मसराम यांचेसह सात लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळाला आहे.

सुरेंद्रगड झोपडपट्टी अंबाझरी, हिलटॉप, संजय नगर, पांढराबोडी इ. भागात राहणाऱ्या आदिवासी बांधवांना झोपडीएवजी हक्काचे पक्के घरकुल मिळाले आहे. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाने नागपूर शहरासह, नागपूर वर्धा जिल्ह्यातील आदिवासी बांधवांना झोपडीऐवजी बांधकामासाठी पुढाकार घेतला आहे.

घरकूल निर्माण समितीतर्फे नागपूर जिल्ह्यात १२३ तर वर्धा जिल्ह्यात १०८ घरांच्या बांधकामाला मंजुरी देऊन आदिवासी बांधवांच्या घरांचा प्रश्न सोडवला आहे.

### आदिम जमातीला घरकूल

चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात आदिम जमातीची लोकसंख्या अधिक असल्यामुळे या समूहाच्या आर्थिक व सामाजिक विकासासोबत वर्षानुवर्षे राहत असलेल्या जागेवर हक्काचे पक्के घर बांधून देण्यात येत आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील १५५ तर गडचिरोली जिल्ह्यात ४६७ घर बांधण्यात येत आहेत. घरकुलाच्या बांधकामासाठी चालू आर्थिक वर्षात ६२२ लक्ष रुपयाचा निधी उपलब्ध करून दिला आहे. या योजनेमुळे या जमातीला पहिल्यांदा पक्के घर मिळणार आहे.

(लेखक हे नागपूर येथे जिल्हा माहिती अधिकारी आहेत.)
संपर्क : ०९८९०१५७७८८

# कंपोस्ट खतातून समृद्धी

**शासकीय यंत्रणा सामान्य जनतेसाठी अनेक योजना तयार करते. त्या योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करते. परंतु एखाद्या सुशिक्षित तरुणीने या शासकीय योजना अवतीभवती असणाऱ्या जनतेला स्वत:च्या भाषेत समजावून सांगितल्यानंतर; त्या योजनांची व्याप्ती वाढते. मला अमूक योजनेतून काय लाभ मिळेल? माझा व्यक्तिगत काय फायदा? अशा व्यक्तिकेंद्रित विचारसरणीचा सर्वत्र प्रभाव असताना सातपुड्याच्या पायथ्याशी असणाऱ्या बोरव्हा येथील एका सुशिक्षित युवतीने आपल्या समाजाचा विचार केला. स्वत:च्या विकासासोबतच परिसरातील जनतेला तिने प्रेरित केले. तिची ही प्रेरणादायी यशोगाथा...**

युवराज पाटील

सातपुडा पर्वत पायथ्याशी बोरव्हा (ता.तेल्हारा, जि. अकोला) नावाचे शंभर उंबऱ्याचे हे आदिवासी गाव आहे. गावात प्रवेश केल्यावर स्वच्छ सारवलेली घरे मन प्रसन्न करतात. आपल्या लोकांना माणूस म्हणून जगता यावे, ते मुख्य प्रवाहात जोडले जावेत, यासाठी धडपडणारी तरुणी 'नासरी चव्हाण' हिला भेटायला आम्ही या गावात गेलो होतो. बोरव्हा गाव फिरून बघितले. नासरीच्या प्रयत्नातून शासनाच्या योजना प्रत्येक घरापर्यंत पोहोचल्या आहेत. कृषी विभागाच्या प्रकल्पांतर्गत हे गाव निवडले गेले आहे. कंपोस्ट खत, रसायनविरहित फवारणीची औषधे या गावात गेल्या तीन वर्षांपासून वापरली जात आहेत. नासरीबद्दल अधिक जाणून घेण्याची इच्छा होती, त्यामुळे तिला बोलते केले.



कंपोस्ट खत आणि नासरी चव्हाण

''माझ्या गावात शिक्षणाची सोय नसल्यामुळे दुसऱ्या गावी जाऊन मी शिक्षण पूर्ण केले. माझ्या गावात १२ वी पर्यंत शिक्षण घेतलेली मी एकटीच मुलगी आहे. गावात आदिवासी विकासाकरिता अनेक सरकारी योजनेमुळे अनेकवेळा अधिकारी येत आणि जात. पण या योजना मात्र आमच्यापर्यंत कधीच पोहोचत नव्हत्या. मी शिक्षण घेत असताना वडलांसोबत योजनाची माहिती घेण्याचा प्रयत्न करीत असे. त्यातूनच मला ही समज आली की, आमच्यासाठी असलेल्या योजना गावात आल्या तरच आमचा विकास होईल. पण त्यासाठी आमच्या लोकांना आमच्याच भाषेत समजावून सांगून तयार करण्याचे काम मी केले. त्यामुळे मागील ४ वर्षांपासून गावामध्ये शेळी पालनासाठी एकूण २३ कुटुंबाला प्रत्येकी ३ शेळ्या अशा ६९ शेळ्या अनुदानातून मिळाल्या. आता शेळ्यांची संख्या वाढली असून गावकऱ्यांना त्यापासून पैसा मिळत आहे, हे पाहूनच पुढे कृषी समृद्धी प्रकल्पामार्फत ४० कुटुंबांना कुक्कुट पालनासाठी ४०० कोंबड्या गावात उपलब्ध झाल्या.

माझ्या गावात सर्वच अशिक्षित आदिवासी शेतकरी आहेत. त्यामुळे आम्हाला शेतीबद्दलचे ज्ञान नव्हते. आम्ही पारंपरिक शेतीच करत होतो. गाव तालुक्यापासून दूर

असल्यामुळे शेतीबाबतची काही माहितीसुद्धा उपलब्ध होत नव्हती. त्यामुळे शेतीतून कर्ज फेडण्याइतकेही उत्पन्न येत नव्हते. मात्र मागील ४ वर्षांपासून शासकीय कृषी विकास प्रकल्पामार्फत सर्ग विकास समितीच्या माध्यमातून मी गावात शेतकऱ्यांची शेती शाळेचे आयोजन करते आहे. त्यांच्यामार्फत बायोडायनॅमिक सेंद्रीय शेती पद्धतीची माहिती शेतकऱ्यांना दिली जात आहे. यातूनच शेतीसाठी लागणाऱ्या वेगवेगळ्या निविष्ठा जसे बायोडायनॅमिक कंपोस्ट कल्चर (एस-९) आम्ही घरीच तयार करायला शिकलो आहोत. आता माझ्या गावात घरोघरी एस-९ कल्चर तयार करण्यात येते. गावात ३० शेतकऱ्यांचे ३० युनिट असून वार्षिक १८०० किलो एस-९ निवीष्ठा तयार केली जाते.

एस-९ कल्चरचा वापर करून शेतकऱ्यांना सर्व पिकांना बीजप्रक्रिया करण्याचे प्रशिक्षण मी दिले आहे व पेरणीच्या दिवशी सर्वांच्या घरी जावून पुन्हा एकदा या गोष्टी सांगते. त्यामुळे पूर्वी कधीही बीजप्रक्रिया न केलेल्या शेतात आता बीजप्रक्रिया केल्यामुळे उगवण जोमदार होऊन रोपांची संख्या टिकते. उत्पादनात मोठ्या प्रमानात वाढ होताना दिसत आहे. दरवर्षी १८०० एकर क्षेत्रावर बीजप्रक्रिया करण्यात येते. गावातील शेतकरी शेणखत ढिगांचे एस-९ वापरून ३०-४० दिवसात बायोडायनॅमिक कंपोस्ट करून ते वापरतात. त्यामुळे आता कोरडवाहू पिकांसाठी रासायनिक खते वापरणे बंद झाले आहे. सर्व शेणखत शेणाने लिपल्यामुळे गावात स्वच्छता आपोआपच होत आहे. यामुळे गाव स्वच्छ व सुंदर झाले आहे. यासोबतच शेतासाठी संपूर्णपणे कुजलेले बायोडायनॅमिक कंपोस्ट तयार होत आहे. याच्या सविस्तर पद्धतीबाबत मी अजूनही घरोघरी जाऊन पाठपुरावा व मार्गदर्शन करते. गावात एकूण ६५-७० कंपोस्ट ढीग तयार करण्यात येतात.

पीक फवारणीसाठी एस-९ व ऊर्जा सोबतच गोमूत्र व झाडपाले वापरून ७ दिवसात पीक संरक्षण व टॉनिक करण्याचे मी प्रशिक्षण घेतले व गावातही शिकवत असते. त्यामुळे तालुक्याच्या दुकानावरून विषारी औषधे आणण्याचे काम पडत नाही. पूर्वी बाजारातील कीटनाशकांची फवारणी करताना अनेक शेतकऱ्यांना विषबाधा झाली. आता मात्र तो धोका नाही. गावातील नदी व नाले यांच्या पाण्यातही विष जात नाही. पूर्वी किटकनाशकाचे रिकामे डबे गावात पाणी घेण्यासाठी व धान्य काढण्यासाठी वापरत असत. या विषारी डब्यामुळे विषबाधा होऊ शकते, आजार होतात, शाळेमध्ये शिकल्यानंतर मी घरोघरी जाऊन असे डबे न वापरण्याबाबत माहिती दिली. मकरसंक्रांतीला पहिल्या वर्षी मी नवीन प्लास्टिक मग/लोट्यांचे वाण वाटले. आता माझ्या गावांत औषधाचे डबे वापरणे मी थांबवले आहे.

आमच्या गावात शेती पूर्णपणे कोरडवाहू आहे. ओलिताची सोय नाही. डोंगरपायथ्याशी असल्यामुळे आमच्या शेतात चढ-उतार आहे. म्हणून विकास समितीच्या रोमण साहेबांसोबत शेतकऱ्यांना उताराला आडव्या मशागतीचे प्रशिक्षण दिले. आता मी सतत पाठपुरावा करत असते. पेरणीअगोदर घरातील महिलांना हे सांगते. आता माझ्या गावात व परीसरात ४० टक्के शेतावर उताराला आडवी पेरणी करण्यात येते. त्यामुळे आमची पिके पावसाची उघाड पडल्यासही सुकत नाहीत. यामुळे उत्पादन कमी होण्याचा धोका राहिला नाही.''

नासरी... बोलत होती आणि आम्ही मंत्रमुग्ध होऊन हे सगळे कानात साठवत होतो. नासरींने आता यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठात बी.ए. साठी प्रवेश घेतला आहे. तिला शिकायचे आहे. आपल्या आदिवासींना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणायचे आहे. आतापर्यंत लोकमत पुरस्कार, डा. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ पुरस्कार, दूरदर्शनचा सह्याद्री पुरस्कार असे २२ विविध पुरस्कार तिच्या कार्याला मिळाले आहेत. स्वतःच्या शेतात कोरडवाहू पद्धतीने संत्रा लावून तिने तो यशस्वी करून दाखवला आहे. आशा या धडपड्या नासरीचे काम पाहण्यासाठी परदेशातील एक शिष्टमंडळ, राज्याचे कृषी आयुक्त विकास देशमुख हेही गावात येऊन गेले. नासरीच्या कामाचा झपाटा मोठा आहे. गारगोटीला माहीत नसते आपल्या एका ठिणगीत ताकद किती आहे. नासरीचे तसेच झाले आहे.

(लेखक हे अकोला येथे जिल्हा माहिती अधिकारी आहेत.) संपर्क : ०८८८८९६४८३४

आदिवासी विकास विभाग
आदिवासी जनहिताय
महाराष्ट्र शासन

**"आदिवासी समाजात शिक्षणाची गोडी नसल्यामुळे मुले/मुली शाळेत जाण्याचे प्रमाण कमी आहे. अनेक मुले शाळा सोडून घरीच असतात. शाळेस न जाणाऱ्या अशा मुलांमुलींना एकत्र करून मी माझ्या घरीच दररोज सायंकाळी शाळा घेते व त्यांना माझ्या पद्धतीने शिक्षण देण्याचा प्रयत्न करते. माझ्या शाळेत २० मुले व १५ मुली दररोज येतात. पुढील शैक्षणिक वर्षात यापैकी काही वर्गात प्रवेश घेतात. त्यांच्या पालकांनाही आपली मुले शिकावी याचे महत्त्व पटत आहे. यावर्षी मी नागपूर येथे जाऊन १० दिवसांचे प्रशिक्षण घेतले आहे.**

**मेळघाटामध्ये कुपोषणामुळे बालमृत्यू होतात. माझ्या गावांत असे होऊ नये यासाठी मी आदिवासी गर्भवतींना त्यांच्या वेळेनुसार भेटून, सकस आहाराचे व जीवनावश्यक औषधे नियमित घेण्याची माहिती देते. आदिवासी महिलांसाठी प्रसूतिपूर्व व प्रसूतिपश्चात काळजी घेण्याच्या सर्वच योजनांचा लाभ त्यांना मिळेल, यासाठी प्रयत्न करते. माझ्या या प्रयत्नाला यश येत असून बालमृत्यू होत नाहीत."**

# चिखलदऱ्यात स्ट्रॉबेरी

**राज्यात महाबळेश्वरबरोबरच मेळघाटातही स्ट्रॉबेरी लागवडीस पोषक वातावरण असल्यामुळे शासनाने १०० टक्के अनुदानावर आदिवासी शेतकऱ्यांना स्ट्रॉबेरी लागवडीस प्रोत्साहन दिले आहे. लागवडीसह संपूर्ण तांत्रिक मार्गदर्शन, विक्री व्यवस्था शासनामार्फत करण्यात येणार असल्यामुळे मेळघाटात स्ट्रॉबेरी लागवडीस गती मिळाली आहे.**





मेळघाटातील चिखलदऱ्यातील थंड वातावरणाच्या परिसरात स्ट्रॉबेरी लागवडीस भरपूर वाव आहे. अशा परिस्थितीत कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अमरावती, श्री शिवाजी उद्यान महाविद्यालय (अमरावती) व तालुका कृषी अधिकारी कार्यालय (चिखलदरा) यांच्या संयुक्त विद्यमाने चिखलदऱ्याजवळ मौजा मोथा येथील शंकर किसनजी निखाडे या शेतकऱ्याची लघुसंशोधन प्रकल्पांतर्गत निवड करण्यात आली व त्याच्या चार आर जमिनीवर स्ट्रॉबेरी लागवड करण्यात आली.

त्याकरिता सर्वप्रथम त्यांच्या शेतातील माती व पाण्याचे परीक्षण करण्यात आली. त्यांच्या शेतात सिंचनाची सोय उपलब्ध असल्यामुळे व वातावरण स्ट्रॉबेरी लागवडीस पोषक असल्यामुळे त्यांनी स्ट्रॉबेरीची लागवड केली. त्यासाठी त्यांनी महाबळेश्वर येथून स्वीट चार्ली, कामारोझा, नोबेला, विंटर डॉन या ४ जातींची निवड करून २००० रोपे आणून १४ ऑक्टोबर, २०१४ ला लागवड केली. त्यानंतर एक महिन्यांनी पॉलिथिन आच्छादन करण्यात आले. लागवडीनंतर ४५ दिवसांनी म्हणजे डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात फळधारणेस सुरुवात झाली. परतवाडा चिखलदरा मार्गावर ते द्रोणमध्ये २५० ग्राम ५० ते ६० रुपये प्रमाणे (२०० प्रती किलो) या दराने विक्री केली व त्यातून त्यांना ४५,०००/- हजाराचे उत्पन्न मिळाले.

चिखलदरा परिसरात स्ट्रॉबेरी लागवडीस भरपूर वाव आहे. तसेच त्यांना उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण झाले आहेत. त्यामुळे मेळघाटातील तरुण शेतकरी स्ट्रॉबेरी लागवडीकडे आकर्षित होत आहे.

**- सुरेश काचावार**

## ५०० हेक्टर जंगल वाचवणारी हिरकणी

जल, जंगल आणि जमीन याबाबतचे प्रेम समाजाने आदिवासी बांधवांकडून घ्यावे, याचा वस्तूपाठ उषा मडावी या महिलेने घालून दिला आहे. गोंदिया जिल्ह्यातील नानव्हा गावालगत असलेल्या जंगलाच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी संयुक्त वन व्यवस्थापन समितीची स्थापना करण्यात आली. समितीच्या सदस्यांनी सर्वानुमते गावातील उषा मडावी या महिलेची अध्यक्षपदी निवड केली. अध्यक्षपदाला शोभेल असे कर्तृत्व सिद्ध करून उषा ५०० हेक्टर जंगलाची रक्षणकर्ती बनली. जंगलातून होणारी अवैध वृक्षतोड आणि गौण खनिजचोरीला आळा घालण्यासाठी उषाबाईंच्या नेतृत्वात समितीने दिवसरात्र परिश्रम घेतले. या जंगलात असणारी बहुमोल वृक्षराजी आणि गौण खनिजाची गावातील तसेच शेजारच्या गावातील लोक चोरी करीत असायचे. अवैध वृक्षतोड व गौण खनीजचोरीला आळा घालण्यासाठी उषाताईने गावात सभा घेतली. या सभेत अवैध वृक्षतोड व गौण खनिजचोरीला आळा घालण्याचा निर्णय घेण्यात आला. उषाताईंनी स्वत:चा जीव धोक्यात घालून जंगलात रात्री गस्त घालून अवैध वृक्षतोड व खनिजचोरीला आळा बसवला. जंगलातील नदीनाल्यातील वाळूच्या तस्करीला आळा बसल्यामुळे नदी-नाले पाण्याने भरून वाहू लागले आहे. १ जुलै २०१६ ला २ कोटी वृक्षलागवड मोहिमेंतर्गत नान्हवा संयुक्त वन व्यवस्थापन समितीने जंगलात २०० विविध वृक्षांची लागवड केली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन २० एप्रिल २०१६ रोजी दूरदर्शनने त्यांना हिरकणी पुरस्काराने सन्मानित केले आहे.



**उषा मडावी**

**- विवेक खडसे**

# दूत सुधारणेच्या

**आश्रमशाळांमधून आधुनिक शिक्षणासोबतच सुदृढ आरोग्य आणि स्वच्छतेचे धडे नव्या पिढीला शासनामार्फत दिले जातात. नवशिक्षित तरुणी या ठिकाणच्या सोयीसवलतींना, अद्ययावत राहणीमानाला घेऊन समाजात येतात आणि सुधारणावादी दूत बनतात.**

जळगाव जिल्ह्यातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यावल अंतर्गत जिल्ह्याभरात १८ शासकीय आश्रमशाळा तसेच ५ मुलींची वसतिगृहे आहेत. मुलींच्या आरोग्यविषयक बऱ्याच समस्या असतात. शासकीय आश्रमशाळेतील मुलींच्या वैयक्तिक आरोग्यविषयक समस्या तसेच अडचणींवर मात करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. या अनुषंगाने अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी पुढाकार घेतला आहे.

सॅनिटरी नॅपकिन वापरानंतर त्यांची विल्हेवाट टॉयलेट तथा बाथरूममध्ये केल्याने टॉयलेट तथा बाथरूम ब्लॉक होण्याचे प्रकार निदर्शनास येत आहेत. शासकीय आश्रमशाळा व मुलींच्या वसतिगृहात सॅनिटरी नॅपकीन्सची विल्हेवाट लावण्यासाठी इन्सिनेटर (अशुद्धिनाशक यंत्र) वापराची सूचना करण्यात आली. या मशीन खरेदीचा खर्च लोकवर्गणीतून करण्याचे सूचित करण्यात आले. त्यानुसार बडोद्याचे 'वात्सल्य फाऊंडेशन' यांनी तयार केलेले वीजरहित, पर्यावरणपुरक इन्सिनेटर शासकीय आश्रमशाळा व मुलींच्या वसतिगृहात लावण्याचे ठरवण्यात आले.

या सूचनेप्रमाणे प्रकल्प अधिकारी, यावल यांनी जळगाव जिल्ह्यातील जनेतला आवाहन केले. शासकीय आश्रमशाळेतील काही मुख्याध्यापक, अधिक्षक, अनुदानित आश्रमशाळेचे संस्थाचालक, लोकसमन्वय प्रतिष्ठान, तळोदा, जिल्हा आरोग्य अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगाव, स्वत: प्रकल्प अधिकारी इत्यादींच्या वर्गणीतून एकूण २३ इन्सिनेटर्स खरेदी करण्यात आले.

इन्सिनेटर्सचा लोकार्पण सोहळा, मुलींच्या आरोग्यविषयक बाबींवर अधीक्षिका, शिक्षिका व महिला गृहपाल यांची कार्यशाळा तसेच चर्चासत्र ८ जुलै, २०१६ रोजी रोटरी भवन, जळगाव येथे आयोजित करण्यात आले. चर्चासत्र कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्ष रुबल अग्रवाल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अस्तिककुमार पांडेय, जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. श्यामसुंदर निमगडे, अपर आयुक्त कार्यालयाचे साहाय्यक आयुक्त निलेश अहिरे, यावलचे प्रकल्प अधिकारी प्रदीप पोळ, युनिसेफच्या आश्रमशाळा वॉश कार्यक्रमाच्या राज्य समन्वयक कौशिका बॅनर्जी इ. मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते अशुद्धिनाशक यंत्र शासकीय आश्रमशाळा तसेच मुलींच्या वसतिगृहास लोकार्पित करण्यात आले.

वात्सल्य फाऊंडेशन, बडोदाचे श्याम बेडेकर यांनी उपस्थितांसह मान्यवरांना अशुद्धिनाशक यंत्र वापराविषयी सखोल माहिती दिली. मान्यवर तसेच उपस्थितांनी यंत्र वापराविषयक माहिती समजून घेतली. कार्यशाळेत श्रीमती कौशिका बॅनर्जी यांनी आश्रमशाळेसंबंधी विद्यार्थ्यांच्या आरोग्य समस्या, पाणी, विद्यार्थी-विद्यार्थिनी यांची वैयक्तिक स्वच्छता, स्वच्छतागृहे, हात धुण्याची जागा, सांडपाण्याचे व्यवस्थापन इ. विषयांवर मुख्याध्यापक, अधीक्षिका, शिक्षिका तसेच महिला गृहपाल यांच्याशी चर्चा करून समस्या जाणून घेतल्या.

**संकलन : आदिवासी विकास विभाग**



**वात्सल्य फाऊंडेशनचे श्याम बेडेकर यांच्याकडून इन्सिनेटरची माहिती समजावून घेताना जळगावच्या जिल्हाधिकारी रुबल अग्रवाल आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अस्तिककुमार पांडेय.**

# क्रीडारत्ने

**आदिवासी तरुणतरुणी क्रीडा क्षेत्रामध्ये झपाट्याने समोर येत आहेत. यातील काहींनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर भारत आणि महाराष्ट्राचा नावलौकिक वाढवला आहे. अशा काही खेळाडूंचा परिचय..**

## सावरपाडा एक्सप्रेस कविता राऊत

कविता राऊत या आदिवासी विकास विभागाच्या शासकीय आश्रमशाळा ठाणापाडा ता. त्र्यंबकेश्वर जि. नाशिक येथे शिकलेली विद्यार्थिनी आहे.

त्यांनी आशियाई क्रीडा स्पर्धेसारख्या आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेऊन महाराष्ट्राचे व भारताचे जागतिक पातळीवर नाव उंचावले आहे. यासाठी त्यांना सन २०११-१२ रोजी अर्जुन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

कविता राऊत नुकत्याच गुवाहाटी (आसाम) येथे संपन्न झालेल्या मॅरेथॉन स्पर्धेमध्ये रिओ (ब्राझील) येथील ऑलिंपिक स्पर्धेसाठी पात्र ठरल्या आहेत.

या खेळाडूचे गुण हेरले ते प्रशिक्षक विजेंद्र सिंग यांनी. त्यांनी कविताच्या आईवडलांची मानसिकता तयार केली. तिला नाशिकच्या भोसला सैनिकी शाळेच्या मैदानावर तंत्रशुद्ध पद्धतीने धावण्याचे धडे देण्यास सुरुवात केली. तद्नंतर ती यशाची उत्तुंग शिखरे गाठत गेली.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ अर्थात बालभारतीने सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून कविता राऊत तथा सावरपाडा एक्स्प्रेस हिच्या खडतर वाटचालीचा प्रवास मांडणारा प्रेरणादायी पाठ (लेख) बालभारतीच्या पाचवीच्या नवीन अभ्यासक्रमात समाविष्ट केला आहे. प्रतिकूलतेवर मात करीत राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा आणि आशियाई क्रीडा स्पर्धेवर मोहोर उमटवणाऱ्या या खेळाडूंच्या संघर्षमय प्रवासावरील हा धडा आता विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरणार आहे.

कविता राऊत हिची २०१६ या वर्षात आयोजित होत असलेल्या ऑलिंपिक क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे. त्या अनुषंगाने ऑलिंपिक पूर्वतयारीचा भाग म्हणून देशाच्या विविध भागातील तसेच आवश्यकता भासल्यास परदेशातील काही निवडक स्पर्धांमध्ये सहभागी होऊन स्वत:च्या कामगिरीचे मूल्यांकन करणे आवश्यक आहे, त्याचबरोबर प्रशिक्षण उपकरणांमध्ये दैनंदिन प्रशिक्षणात उपयोगी पडणाऱ्या हार्ट रेट मॉनिटर, स्टॉप वॉचपासून अनेक अत्याधुनिक स्पोर्ट्स कीट इ. उपकरणांचा वापर करावा लागणार आहे. यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. याचा विचार करून आदिवासी विकास विभागाकडून ऑलिंपिक स्पर्धेच्या पूर्व तयारीसाठी २०१५-१६ साठी रुपये १४,९४,००० ची आर्थिक मदत करण्यात आली आहे.





**कविता राऊत**

## सुवर्णकन्या अंजना ठमके

नाशिकपासून २८ किलोमीटर अंतरावर असलेल्या गणेशवाडीची अंजना ठमके, शाळा - गिरणारे जिल्हा- नाशिक, आईवडील शेतमजूर, शाळेत जायचे म्हणजे एक यज्ञच! रोज पंधरा किमी चालणे, मग काय शाळेत जाण्यासाठी लागायची शर्यत - शर्यत जिंकणार कोण हे वेगळे सांगायची गरज नाही. तेव्हापासून धावण्याची व जिंकण्याची अशी सवय लागली की, आतापर्यंत स्पर्धा राष्ट्रीय असो नाहीतर आंतरराष्ट्रीय ती फक्त सुवर्णपदकच जिंकत आली आहे. घरची परिस्थिती म्हणाल तर एकर दीड एकर शेती! आई नंदा व वडील ढवळू शेतमजुरी करून पोटाची खळगी भरत. त्यात अंजना व तिचा धाकटा भाऊ यांच्या चिमुकल्या हातांचा खारीचा वाटा असायचा.

नाशिकच्या भोसला मिलीटरी स्कूलच्या मैदानावर जिल्हास्तरीय शालेय मैदानी स्पर्धा

सुरू झाली. तेव्हा ६०० मीटरमध्ये अंजना पहिली आली. त्यानंतर रांची येथे झालेल्या राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी होत ६०० मीटरमध्ये वर्षभरापूर्वी नोंदवलेला विक्रम स्वत: मोडित काढला. त्यावेळी ६०० मीटरचे अंतर तिने अवघ्या १ मिनिट ३१.३६ सेकंदात पार केले.



अंजना ठमके

हरिद्वार येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत ती १६ वर्षातील वयोगटातून ८०० मीटर मध्ये धावली. हे अंतर तिने २ मिनिट ८.२५ सेकंदात पार केले. त्याचबरोबर पुण्यात झालेल्या राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेत १००० मीटर प्रकारात नवा विक्रम नोंदवला. हे अंतर तिने ३ मिनिट १.४३ सेकंदात पूर्ण करून राष्ट्रीय स्पर्धेत मजल मारली. अंजनाने पहिले आंतरराष्ट्रीय सुवर्णपदक पटकावले ते चीनच्या नानाजिंग येथे झालेल्या युथ गेम्समध्ये. अंजना तेव्हा ८०० मीटर अंतर २ मिनिट ११ सेकंदात धावली.

## किसन तडवी

नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यातील बर्डी गावचा किसन तडवी हा आदिवासी युवक इच्छाशक्ती आणि प्रचंड मेहनतीच्या जोरावर मैदानी स्पर्धेत आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करत आहे. किसन तडवी यांना आदिवासी विकास विभागाने ५ लाख रुपयांची मदत दिली आहे.

आईवडलांसह अकरा जणाच्या कुटुंबात सगळेच काबाडकष्ट करणारे. घरी कामात थोडी मदत व्हावी म्हणून बकऱ्या चरायला नेणे या नित्यक्रमात बकऱ्यांच्या मागे धावता धावता त्याला धावायची सवय कधी लागली हे त्याचे त्यालाच कळले नाही.

चाचणीत त्याची धाव बघून सगळेच चकित झाले. त्याची ही धाव त्याला बर्डी या आदिवासी गावातून नाशिक येथील भोसला सैनिकी शाळेत घेऊन आली. भोसला सैनिकी शाळेत प्रशिक्षण घेत असताना नाशिकमधील अनुभवी प्रशिक्षक विजेंद्रसिंग यांच्या नजरेतून किसनची धाव सुटली नाही. खेळाडूंची गुणवत्ता हेरण्यात न चुकणारे विजेंदर त्याची धाव बघून प्रेरित झाले होते. शिक्षणाची आस धरलेला किसन अनपेक्षितपणे मैदानी स्पर्धेच्या ट्रॅकवर आला आणि धावू लागला. केवळ धावलाच नाही तर, राष्ट्रीय युवा स्पर्धा तीन हजार मीटर धावण्याच्या स्पर्धांमध्ये त्याने सुवर्णपदक मिळवले.

बँकॉकमध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत तो रौप्यपदकाचा मानकरी ठरला. दोहा-कतारमध्ये आशियाई युवा स्पर्धेत तीन हजार मीटर अंतरामध्ये स्पर्धकांना जवळही फिरकू न देता सुवर्णपदक मिळवले.

**संकलन: आदिवासी विकास विभाग**



किसन तडवी

आदिवासी विकास विभाग
आदिवासी जनहिताय
महाराष्ट्र शासन

## महाराष्ट्राचे तारे ऑलिम्पिकमध्ये

**५ ऑगस्ट, २०१६ पासून सुरू होणाऱ्या रिओ ऑलिम्पिक यामध्ये भारताच्या चमूमध्ये महाराष्ट्राच्या ललीता बाबर (मैदानी ३००० मी धावणे), कविता राऊत, (मैदानी मॅरेथॉन), नरसिंग यादव (कुस्ती ७४ किलोखालील), आयनिका पॉल (शुटींग १० मी), युवराज वाल्मिकी (हॉकी), देविंदर वाल्मिकी (हॉकी), आकाश चिकटे (हॉकी), दत्तू भोकनळ (रोईंग, मेन्स सिंगल्स स्कल्स) या ८ खेळाडूंनी आपली कामगिरी, क्रीडा कौशल्य दाखवून प्रवेश मिळवलेला आहे. या खेळाडूंना स्पर्धापूर्व तयारीसाठी रोख रक्कम प्रत्येकी ५ लाख रुपये असे एकूण ४० लाख रुपये आर्थिक साहाय्य राज्य शासनामार्फत करण्यात आले आहे. कु. प्रार्थना ठोंबरे या खेळाडूची लॉन टेनिस या खेळामध्ये सानिया मिर्झा हिच्यासोबत महिला दुहेरीमध्ये निवड झाली आहे. तिलासुद्धा राज्य शासनामार्फत आर्थिक साहाय्य देण्यात येणार आहे.**

# आदिवासी क्षेत्रातील किल्ले

**महाराष्ट्राच्या पश्चिमेकडील ठाणे, पालघर, तसेच उत्तरेकडील नाशिक, धुळे, नंदुरबार या जिल्ह्यांमध्ये आदिवासीबहुल भाग आहे. अमरावती जिल्ह्याचा उत्तरेकडील भाग आणि गडचिरोली जिल्ह्यातदेखील आदिवासी वसाहती मोठ्या प्रमाणावर दिसून येतात. महाराष्ट्रातील अनेक महत्त्वाचे गडकिल्ले हे या आदिवासीबहुल भागात शिवपूर्व काळापासून वसलेले आहेत.**

शिवाजी महाराजांच्या काळात या सर्व जिल्ह्यांपैकी फक्त नाशिक परिसरावर महाराजांची सत्ता होती. ठाणे, पालघर आणि डहाणू परिसरावर गुजरात सुलतान आणि त्यानंतर पोर्तुगीजांनी राज्य केले होते. जव्हार या आदिवासीबहुल भागात भूपतगड आणि बळवंतगड असे दोन महत्त्वाचे डोंगरी किल्ले आहेत. भूपतगडावर आज तटबंदी तुरळक प्रमाणात शिल्लक असून खडकात खोदलेली पाण्याची टाकी आहेत. किल्ल्यावर बांधकामाचे जास्त अवशेष दिसत नाहीत. नाशिक परिसरातून उत्तर कोंकणात उतरणाऱ्या घाट मार्गावर हा किल्ला बांधलेला आहे. बळवंतगड हा देखील कसारा घाट, थळ घाट या परिसरावर नजर ठेवण्यासाठी बांधला होता. शिवाजी महाराजांनी सुरतेवर दोन वेळा छापा घातला होता. दोनही वेळेला ही लूट घेऊन येताना महाराजांनी जव्हार परिसरातील अशेरी, असावा, काळदुर्ग, गंभीरगड, सेगवा, या किल्ल्यांवर मुक्काम केला होता अशी दंतकथा जवळजवळ प्रत्येक किल्ल्याच्या परिसरात सांगितली जाते. अशेरी हा एकमेव मोठा डोंगरी किल्ला पोर्तुगीजांनी डहाणूजवळ बांधला. खडकवणे किंवा खाड्कोन हे छोट्या

**डॉ. सचिन जोशी**

वस्तीचे गाव किल्ल्याच्या पायथ्याला आहे. गावातून गडाची उंची साधारणतः ३५० मीटर आहे. गावात प्रवेश करतानाच गावाच्या वेशीवर लाकडामध्ये कोरून काढलेला एक खांब दिसतो. या खांबावर वाघाचे आणि चंद्र-सूर्याचे शिल्प कोरलेले आहे. स्थानिक लोकांनी दिलेल्या माहितीप्रमाणे गावाचे पंचमहाभूतांपासून संरक्षण व्हावे म्हणून असा खांब वेशीवर उभा केला जातो. याच स्वरूपाचा लाकडी स्तंभ जव्हारच्या पूर्वेकडील भागात असलेल्या वाघेरा या किल्ल्याच्या पायथ्याला आहे. खैराई हा अजून एक उंच किल्ला त्रिंबकेश्वर ते सिल्वासा या वाटेवरील ठाणपाडा आणि खैराईपाली या गावाजवळील डोंगरावर आहे. गडावर वेताळाचे मंदिर असून पाण्यासाठी तीन टाकी आहेत. गडाचा दरवाजा पडलेला असूनही त्याचे अवशेष दिसतात.

नंदुरबार हा आदिवासीबहुल जिल्हा असून तो गुजरात आणि मध्य प्रदेश या दोन राज्यांच्या सीमेवर वसलेला आहे. गडकिल्ले म्हटले की, डोळ्यासमोर पश्चिम महाराष्ट्र, सह्याद्री पठार आणि कोकण हाच प्रदेश डोळ्यासमोर येतो. पण नंदुरबारसारख्या अत्यंत दुर्गम आणि सोयीसुविधा नसलेल्या भागामध्ये देखील एके काळी सुबत्ता होती हे तेथील गडकिल्ले आणि त्यावरील वास्तू पाहून समजते. नंदुरबार जिल्ह्यातून तापी ही एक मोठी नदी वाहते. तापी नदीमुळे या जिल्ह्याचे उत्तर आणि दक्षिण असे दोन भाग झालेले आहेत. उत्तर नंदुरबारच्या सीमेवरून नर्मदा नदी वाहते. नंदुरबार जिल्ह्यामध्ये डोंगरी किल्ले फारच कमी आहेत. पण विशेषतः भुईकोट किल्ल्यांची संख्या या भागात जास्त आहे. १४ आणि १५ व्या शतकात हा भाग फारुखी राजसत्तेकडे होता. अहमदनगर, परांडा, औसा यासारखे भुईकोट किल्ले नंदुरबार जिल्ह्यात तुलनेने कमी आहेत. धडगाव हा किल्ला उत्तर नंदुरबार जिल्ह्यात येत असून या किल्ल्यावर तटबंदी, जंग्या, दरवाजे यांसारखे अनेक अवशेष दिसून येतात. चौगाव



गंभीरगड



गाविलगड



खैराई



कोहोज गड


नरनाळा गड


वाघेरा

हा एक छोटा पण डोंगरी किल्ला या आदिवासी बहुल भागात आहे. याची उंची साधारणतः ५० मीटर असून किल्ल्याचे सर्व अवशेष हे पायथ्यापासून ते गडमाथ्यापर्यंत बांधलेले दिसतात. सुलतानपूर, फतेहपूर यासारख्या काही गावांनाच तटबंदी बांधलेली आहे. त्याच्या वेशीवर दरवाजे आहेत. चोपडा, शिरपूर या भागात गढी या प्रकारातील बांधकाम अनेक ठिकाणी दिसते.

गडचिरोली हा जिल्हा आदिवासीबहुल असून या भागातील लोकांची स्वतःची विशिष्ट अशी संस्कृती आहे. या लोकांची स्थानिक दैवते आहेत. यामध्ये आपल्याला शिव, विष्णू, महिषासुरमर्दिनी यासारख्या देवतांच्या मूर्ती दिसणार नाहीत. ढोलाच्या तालावर येथील लोक विशिष्ट प्रकारचे नृत्य करताना दिसतात. या परिसरात घनदाट जंगल असल्याने आदिवासी जमातीचे वास्तव्य हे जंगलातच दिसून येते. साधारणतः ६-७ व्या शतकात या भूभागावर राष्ट्रकूट राजांचे राज्य होते. ११-१२ व्या शतकात देवगिरीचे यादव यांनी या प्रदेशावर सत्ता प्रस्थापित झाली. त्यानंतर येथे गोंड राजांनी राज्य केले. बल्लारशाह या राजाने चंद्रपूर जवळ किल्ला बांधून चंद्रपूर ही आपली राजधानी केली. चंद्रपूर आणि गडचिरोली या आदिवासीबहुल भागात मध्ययुगीन कालखंडात साधारणतः २० किल्ले बांधले गेले. वैरागड, सुरजागड, टिपागड, राजोली, इ. किल्ले घनदाट जंगलात वसलेले असल्यामुळे सध्या तेथपर्यंत पोहोचणे सहज शक्य नाही. यापैकी सूरजागड आणि राजोली हे गिरिदुर्ग प्रकारातील किल्ले आहेत. सुरजागडाचा माथा सपाट असून तेथे आजही तटबंदी, दरवाजे, वाडे यांचे अवशेष पाहता येतात. हे सर्व अवशेष आज दाट झाडीमध्ये लपलेले आहेत. सुरजागड किल्ल्यावर स्थानिक लोकांचे ठाकूरदेव हे दैवत आहे. टिपागड हा अजून एक महत्त्वाचा किल्ला गडचिरोली या आदिवासीबहुल भागात येतो. टिपा या शब्दाचा गोंड भाषेत अर्थ द्वीप असा होतो. पूरमशाह नावाचा गोंड राजा येथे राज्य करीत होता आणि त्याने आजच्या छत्तीसगडचा बराच भाग जिंकला होता. विदर्भातील अमरावती या जिल्ह्याच्या उत्तरेला मेळघाट हे वाघांसाठी प्रसिद्ध असलेले जंगल आहे. याच परिसरात गाविलगड आणि नरनाळा हे प्रचंड मोठा विस्तार असलेले किल्ले आहेत. मेळघाट या घनदाट जंगलात कोरकू, गोंड, निहल, बालाई अशा विविध आदिवासी वसाहती आहेत. नरनाळा हा विदर्भातील गिरिदुर्ग अकोला जिल्ह्यातील अकोट शहरापासून १८ किलोमीटर अंतरावर उत्तरेकडील सातपुडा पर्वतरांगेत स्थित आहे. १५ व्या शतकात हा किल्ला बहामनी राजाच्या ताब्यात होता. किल्ल्याच्या तटबंदीस अनेक बुरुज आणि लहानमोठे दरवाजे होते. परंतु आता मोजकीच बांधकामे सुस्थितीत आहेत आणि ती देखील वेगवेगळ्या काळात बांधली गेली आहेत. दिल्ली दरवाजा, आकोट दरवाजा, शिरपूर दरवाजा, शहानुर दरवाजा ही गडाची मुख्य प्रवेशद्वारे आहेत. औरंगजेबाच्या काळातील तोफसुद्धा आहे हे त्यावरील कोरलेल्या लेखातून कळते. किल्ल्यात तलाव बांधून पिण्याच्या पाण्याची अगदी उत्तम व्यवस्था केलेली दिसते. किल्ल्यात अनेक भग्न इमारती आहेत त्यात राणीचा महल हा भव्य व मजबूत अशी वास्तू आहे.




गाविलगड हा अजून एक गिरिदुर्ग अमरावती जिल्ह्यातील मेळघाटच्या घनदाट जंगलात बांधलेला दिसतो. सर्वप्रथम हा दुर्ग गवळी लोकांनी माती आणि दगड याचा वापर करून बांधला होता व त्याला गवळीतट हे नाव दिले होते असे म्हणतात. या किल्ल्याच्या बांधणीचा काळ निश्चित सांगता येत नाही. किल्यात अनेक बांधकामे केलेली होती. पण ती आता भग्न स्वरूपात आहेत. त्यामध्ये मंदिर, तलाव, राणीमहाल, समाध्या, मशिदी आणि इतर छोटी मोठी बांधकामे होती. यामध्ये दिल्ली दरवाजा हे अतिशय भव्य असे प्रवेशद्वार आहे त्यावर एक लेख कोरलेला आहे. किल्ल्यांच्या प्रवेशद्वारावर सिंह व हत्ती असलेले शिल्पांकन कोरलेले दिसतात. गडाची तटबंदी आणि बुरुज अजूनही चांगल्या स्थितीत आहेत.

(लेखक पुणे येथील डेक्कन महाविद्यालयात पुरातत्त्व विभागात संशोधक आहेत.) संपर्क : ०९८२२१०९३६२

# नवा अध्याय सहकार्याचा...

**रशियाशी भारतीयांचा असलेला ऋणानुबंध तसा अतिशय जवळचा. स्वातंत्र्यप्राप्तीपासूनच भारत-रशिया मैत्रीचा अध्याय सुरू झाला. जागतिक पातळीवरच्या तत्कालीन राजकीय समीकरणात तो अधिक दृढही होत गेला. या दोन्ही राष्ट्रांमध्ये मैत्रीला उजाळा मिळाला तो नुकत्याच रशियातील इकेटेरिनबर्ग येथे झालेल्या इनोप्रॉम या उद्योग-व्यापारविषयक आंतरराष्ट्रीय मेळाव्याच्या संयुक्त आयोजनाच्या निमित्ताने. रशियासोबत भारत या उपक्रमाचा संयोजक भागीदार. त्यामुळे 'जिथे राष्ट्र तिथे महाराष्ट्र' या उक्तीला जागून त्यात आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदवताना महाराष्ट्राने विविध आघाड्यांवर भारताच्या या जुन्या मित्राशी नव्याने संबंध प्रस्थापित करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल टाकले !**

गेल्या वर्षभरापासून 'मॅग्नेटिक महाराष्ट्रा'चे जागतिक पातळीवर जोरदार मार्केटिंग करण्यात येत आहे. त्यास मोठा प्रतिसादही मिळत असून मेक इन इंडिया सप्ताहात झालेले अडीच हजाराहून अधिक सामंजस्य करार आणि त्या माध्यमातून राज्यात येऊ घातलेली आठ लाख कोटी रुपयांहून अधिकची गुंतवणूक ही त्याचीच पावती आहे. इकेटेरिनबर्ग येथे आयोजित इनोप्रॉम-२०१६ या उद्योग-व्यापार आणि नावीन्यपूर्ण संशोधनविषयक मेळाव्याच्या निमित्ताने महाराष्ट्राने पुन्हा ही संधी साधली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्याच्या शिष्टमंडळाने केलेला तीन दिवसीय रशिया दौरा अपेक्षेहून अधिक यशस्वी ठरला.

इनोप्रॉम या उपक्रमात जगभरातील औद्योगिक-व्यापारी संस्थांचे प्रतिनिधी, उद्योजक आणि लोकप्रतिनिधी सहभागी झाले होते. त्यात उभारण्यात आलेल्या इंडिया पॅव्हेलियनचे उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत केंद्रीय उद्योग व वाणिज्य राज्यमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांच्या हस्ते झाले. भारतातील गुंतवणुकीला चालना मिळावी या उद्देशाने उभारण्यात आलेले हे पॅव्हेलियन या मेळाव्याचे विशेष आकर्षण ठरले. महाराष्ट्रातील गुंतवणुकीच्या संधींचा शोध घेण्यासाठी रशियन उद्योगसमूहांच्या प्रतिनिधींचे शिष्टमंडळ राज्यात पाठवण्यास रशियन सरकारने सहमती दर्शवल्याबाबत मुख्यमंत्र्यांनी या वेळी समाधान व्यक्त केले.

### स्वेर्डलोव्हेस्क प्रांताशी सामंजस्य करार

या दौऱ्यातील महत्त्वाचे फलित म्हणजे रशियातील स्वेर्डलोव्हेस्क प्रांत आणि महाराष्ट्रादरम्यान विविध क्षेत्रातील सहकार्याबाबत झालेला सामंजस्य करार. या




प्रांताचे गव्हर्नर एडूअर्ड रोसेल आणि श्री. फडणवीस यांच्या उपस्थितीत त्यावर स्वाक्षऱ्या झाल्या. त्यानुसार खनिकर्म, रेल्वे प्रकल्प आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील औद्योगिक गुंतवणुकीला चालना देण्यासह, तांत्रिक विद्यापीठांच्या उभारणीसाठी सहकार्य करण्यासाठी; स्वेर्डलोव्हेस्क आणि महाराष्ट्राकडून संयुक्त कृती गट स्थापन करण्यात येणार आहे. तसेच राज्यातील गुंतवणुकीला चालना देण्यासाठी, ऊरल चेंबर ऑफ कॉमर्सच्या पुढाकाराने पुढील महिन्यात श्री. रोसेल यांच्या नेतृत्वाखालील प्रतिनिधी शिष्टमंडळ महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार आहे. या वेळी ऊरल फेडरल युनिव्हर्सिटी आणि राज्यातील विद्यापीठे यांच्यात सांस्कृतिक देवाणघेवाण अंतर्गत विविध उपक्रम राबवण्याचे ठरवण्यात आले. त्यात मराठी नाटकांचे रशियात प्रयोग आणि भारतीय चित्रपटांचे रशियन भाषेत भाषांतर यासारख्या उपक्रमांचा समावेश आहे.

**हेमराज बागूल**

### रशियन-भारतीय कंपन्यांची संयुक्त परिषद

रशियन फेडरेशनचे उद्योग आणि व्यापार मंत्री डेनिस मँतुरोव्ह यांच्यासोबत झालेल्या भेटीत, रशियन संरक्षण क्षेत्रातील उद्योजकांना महाराष्ट्रात संरक्षण उत्पादन क्षेत्रात गुंतवणूक करण्याचे निमंत्रण मुख्यमंत्र्यांनी दिले. महाराष्ट्र आणि रशियाला संयुक्तपणे काम करणे शक्य असलेल्या क्षेत्राबाबत, या वेळी चर्चाही झाली. रशियन आणि भारतीय कंपन्यांची परस्पर सहकार्यासाठी अशी एक संयुक्त परिषद येत्या

ऑक्टोबर महिन्यात आयोजित करण्याचे उभय नेत्यांनी या भेटीत प्रस्तावित केले.

### राज्यात खनिकर्म विद्यापीठ स्थापणार

राज्यातील खनिकर्म उद्योगाचा विकास होण्यासाठी सेंट पीटर्सबर्ग येथील खनिकर्म विद्यापीठ आणि महाराष्ट्र सरकार दरम्यान सामंजस्य करार करण्यात आला. या करारानुसार नागपूर येथे खनिकर्म विद्यापीठ स्थापन करण्यात येणार आहे. विदर्भातील विपुल आणि वैविध्यपूर्ण खनिज संपत्ती लक्षात घेता खनिकर्म उद्योगाचा विकास होण्यासाठी नागपूर येथे स्थापन होणारे खनिकर्म विद्यापीठ महत्त्वाचे ठरणार आहे. खनिकर्म क्षेत्राच्या विकासाबरोबरच कोळशाद्वारे करावयाच्या विद्युत निर्मितीसाठी महाजेनकोची कार्यपद्धती अधिक आधुनिक करण्याबाबतही हे विद्यापीठ सहकार्य करणार आहे.

### हर्मिटेजसोबत करार

या दौऱ्यात बृहन्मुंबई महापालिका आणि जगातील सर्वात मोठे आणि जुने म्युझिअम म्हणून ख्याती असलेले सेंट पीटर्सबर्ग येथील हर्मिटेज म्युझिअम यांच्यातही महत्त्वपूर्ण करार करण्यात आला. हर्मिटेज म्युझिअम जगातील एक ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय असून त्यात तीस लाखांहून अधिक पुराणवस्तू संग्रहित करण्यात आल्या आहेत. तसेच जगातील काही दुर्मीळ हस्तचित्रेदेखील या संग्रहालयात आहेत.

### केआरईटी राज्यात गुंतवणुकीस उत्सुक

रशियातील कन्सर्न रेडिओ इलेक्ट्रॉनिक टेक्नोलॉजीस (केआरईटी) या प्रसिद्ध कंपनीचे महासंचालक, कान्स्टंटाईन बोछरोव्ह यांच्याशी मुख्यमंत्र्यांनी केलेली चर्चा फलदायी ठरली. लष्करी आणि नागरी उपयोगासाठी आवश्यक असणाऱ्या रेडिओ-इलेक्ट्रॉनिक उत्पादनात कार्यरत असलेल्या, पंचावन्नहून अधिक संस्थांच्या समन्वयातून केआरईटी ही कंपनी निर्माण झाली आहे. भारतीय हवाई वाहतूक क्षेत्रात आवश्यक असणाऱ्या साधनांच्या निर्मितीसाठी या संस्थेला राज्यात येण्याचे निमंत्रण मुख्यमंत्र्यांनी दिले. नागपूर आणि नाशिक येथे निर्मिती प्रकल्प उभारण्याबाबत या कंपनीने अनुकूलता दाखवली.

### पाणी पुरवठा आणि सांडपाणी प्रक्रियेसाठी सहकार्य

पाणी पुरवठा आणि सांडपाणी प्रक्रिया क्षेत्रात सेंट पीटर्सबर्ग प्रांतात लक्षणीय आणि पथदर्शी काम झाले आहे. येथील वोडोकॅनाल संस्थेचे त्यात मोठे योगदान असून या संस्थेकडे पाणी पुरवठ्यासाठी ७१०० कि.मी. लांबीचे स्वत:चे जाळे आहे. सांडपाण्यावरील प्रक्रियेसाठी ९ प्लांट असून प्रतिदिन १६ लक्ष घनमीटर पेयजल या संस्थेकडून पुरवण्यात येते. त्यामुळे या क्षेत्रातील तांत्रिक आणि इतर स्वरूपाच्या सहकार्याबाबत सेंट पीटर्सबर्गसोबत करार करण्यास महाराष्ट्र उत्सुक होता, त्यानुसार मुख्यमंत्री आणि सेंट पीटर्सबर्गचे गव्हर्नर जॉर्जी पोल्तॉवचेंको यांनी; पाणी पुरवठा आणि सांडपाणी प्रक्रियाविषयक महत्त्वाच्या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. मुंबईतील मिठी नदीसह इतर नद्यांच्या शुद्धीकरणासाठीही या संस्थेची मदत होईल. हा रशिया दौरा या दोन संस्कृतींमधील ऋणानुबंधांना उजाळा देण्यासोबतच तो अधिक व्यापक करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरला आहे.

(लेखक हे मा. मुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी आहेत.)



## रशियन पंतप्रधानांना भेट श्रीगणरायाच्या मूर्तीची !

**इनोप्रोम-२०१६ या मेळाव्यातील महाराष्ट्र पॅव्हेलियनला रशियाचे पंतप्रधान दिमित्री मेदवेदेव यांनी भेट देऊन महाराष्ट्रातील गुंतवणुकीच्या संधींबाबतची माहिती जाणून घेतली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री. मेदवेदेव यांना महाराष्ट्रात उद्योगसुलभतेसाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. तसेच राज्यात विविध क्षेत्रात असलेल्या गुंतवणुकीच्या संधींबाबतही त्यांनी रशियन पंतप्रधानांना अवगत केले. श्री. मेदवेदेव यांनी औत्सुक्याने सारी माहिती जाणून घेतली व या उपक्रमातील मुख्यमंत्र्यांच्या सहभागाबद्दल प्रशंसा केली. श्री. फडणवीस यांनी त्यांचे श्रीगणरायाची मूर्ती देऊन स्वागत केले.**



**राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी ६ आमदारांना कॅबिनेट मंत्रिपदाची तर ५ आमदारांना राज्यमंत्री म्हणून पद व गोपनीयतेची शपथ नुकतीच दिली. या वेळी विधानसभेचे अध्यक्ष हरिभाऊ बागडे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्रिमंडळातील सदस्य, आमदार, मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय, वरिष्ठ अधिकारी व नव्याने समावेश झालेल्या मंत्र्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.**

# आपले नवे मंत्री



## पांडुरंग फुंडकर (कृषी, फलोत्पादन मंत्री)



श्री. पांडुरंग पुंडलिक ऊर्फ भाऊसाहेब फुंडकर यांचा जन्म २१ ऑगस्ट १९५० रोजी नारखेड, तालुका-नांदूरा, जिल्हा-बुलढाणा येथे झाला असून एम. ए. (भाग-१) पर्यंत त्यांचे शिक्षण झाले आहे. त्यांना मराठी, हिंदी व इंग्रजी भाषा अवगत आहेत. श्री.फुंडकर हे विवाहित असून त्यांना तीन अपत्ये (दोन मुलगे व एक मुलगी) आहेत.

श्री.फुंडकर १९७८-८५ या काळात विधानसभा सदस्य होते. त्यानंतर अकोला लोकसभा मतदारसंघातून १९८९, १९९१, १९९६ असे सलग तीन वेळा खासदार म्हणून निवडून आले.

११ एप्रिल २००५ ते २४ एप्रिल २००८ विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद; २५ एप्रिल २००८ रोजी महाराष्ट्र विधान परिषदेच्या विरोधी पक्ष नेतेपदी दुसऱ्यांदा बिनविरोध निवड; जून २००९ मध्ये राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते सन २००६-२००७ या कालावधीतील उत्कृष्ट संसदपटू हा पुरस्कार प्राप्त; एप्रिल २०१४ मध्ये विधान परिषदेवर फेरनिवड.




## प्रा.राम शंकर शिंदे (जलसंधारण, राजशिष्टाचार मंत्री)



प्रा.राम शंकर शिंदे यांचा जन्म १ जानेवारी १९६९ रोजी चोंडी (तालुका-जामखेड, जिल्हा-अहमदनगर) येथे झाला. त्यांचे शिक्षण एम.एस्सी (वनस्पतीशास्त्र), बी.एड असे झाले आहे. मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषा त्यांना अवगत आहेत. ते विवाहित असून त्यांना तीन अपत्ये आहेत. त्यांचा व्यवसाय शेती आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे वडील माणकोजी शिंदे यांच्या नवव्या पिढीतील वंशज म्हणून ते परिचित आहेत. २०१३ पासून महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस म्हणून कार्यरत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सहकारी दूध उत्पादक संस्था मर्या. चोंडी या संस्थेचे संस्थापक. २००९-२०१४ महाराष्ट्र विधानसभा सदस्य. लोकलेखा समिती सदस्य. विद्यमान सरकारमध्ये ते गृहराज्यमंत्री म्हणून कार्यरत होते. त्यांना आता कॅबिनेट मंत्री करण्यात आले आहे.

## जयकुमार जितेंद्रसिंह रावल (रोजगार हमी, पर्यटन मंत्री)



श्री.जयकुमार रावल यांचा जन्म १६ जानेवारी १९७५ रोजी दोंडाईचा, (तालुका-शिंदखेडा, जिल्हा-धुळे) येथे झाला. बी. कॉम., एम.बी.ए.(इंग्लंड). पर्यंत त्यांचे शिक्षण झाले आहे. मराठी, हिंदी, इंग्रजी व अहिराणी या भाषा त्यांना अवगत आहेत. श्री. रावल हे विवाहित आहेत. त्यांच्या पत्नीचे नाव श्रीमती कुंवरराणी सुभद्राकुमारी असून त्यांना एकूण २ अपत्ये (एक मुलगा व एक मुलगी) आहेत. शेती व उद्योग हे त्यांचे व्यवसाय आहेत. श्री.रावल हे ८-शिंदखेडा, जिल्हा-धुळे या मतदार संघातून महाराष्ट्र विधानसभेवर निवडून आले आहेत. यापूर्वी २००४-२००९, २००९-२०१४ या कालावधीतही ते महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य होते.

## मंत्री आणि विभाग

**देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री)** :सामान्य प्रशासन, नगर विकास, गृह, विधी व न्याय, बंदरे, माहिती व जनसंपर्क आणि इतर वाटप न झालेले विभाग किंवा विषय
**चंद्रकांत (दादा) पाटील** : महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून).
**सुधीर मुनगंटीवार** : वित्त आणि नियोजन, वने
**विनोद तावडे** : शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास व वक्फ.
**प्रकाश महेता** : गृहनिर्माण
**पंकजा मुंडे** : ग्रामविकास, महिला व बाल विकास.
**विष्णु सवरा** : आदिवासी विकास
**गिरीश बापट** : अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्ये.
**गिरीष महाजन** : वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास.
**दिवाकर रावते** : परिवहन, खारभूमी विकास
**सुभाष देसाई** : उद्योग, खनिकर्म
**पांडुरंग फुंडकर** : कृषी, फलोत्पादन.
**रामदास कदम** : पर्यावरण
**एकनाथ शिंदे** : सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)
**चंद्रशेखर बावनकुळे** : ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क
**बबनराव लोणीकर** : पाणीपुरवठा व स्वच्छता
**डॉ. दीपक सावंत** : सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण
**राजकुमार बडोले** : सामाजिक न्याय आणि विशेष साहाय्य.
**प्रा. राम शिंदे** : जलसंधारण, राजशिष्टाचार
**जयकुमार रावल** : रोजगार हमी, पर्यटन.
**सुभाष देशमुख** : सहकार, पणन व वस्त्रोद्योग
**महादेव जानकर** : पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास
**संभाजीराव पाटील-निलंगेकर** : कामगार, भूकंप पुनर्वसन, कौशल्य विकास, माजी सैनिकांचे कल्याण



## संभाजीराव निलंगेकर-पाटील (कामगार, भूकंप पुनर्वसन, कौशल्य विकास मंत्री)



श्री.संभाजीराव दिलीपराव निलंगेकर-पाटील यांचा जन्म २० जून १९७७ रोजी सोलापूर येथे झाला असून त्यांनी कमर्शिअल पायलटचे शिक्षण घेतले आहे. त्यांना मराठी, हिंदी व इंग्रजी भाषा अवगत आहेत.

श्री.संभाजीराव निलंगेकर-पाटील हे विवाहित असून त्यांना एक अपत्य आहे. विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन, आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन, सामूहिक विवाहांचे आयोजन, गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तुंचे मोफत वाटप आदी सामाजिक सांस्कृतिक कार्यात त्यांचा मोठा सहभाग असतो. सन २००४-२००९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर २०१४ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; मे २०१५ पासून समिती प्रमुख, पंचायत राज समिती.

## सुभाष सुरेशचंद्र देशमुख (सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री)



श्री.सुभाष सुरेशचंद्र देशमुख यांचा जन्म १२ मार्च, १९५७ रोजी वडाळा (तालुका-उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर) येथे झाला. त्यांचे शिक्षण एस.एस.सी. पर्यंत झाले असून मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषा त्यांना अवगत आहेत. श्री.देशमुख विवाहित असून त्यांना तीन अपत्ये आहेत. ते भारतीय जनता पक्षाचे आमदार असून त्यांचा व्यवसाय शेती आहे. श्रमप्रतिष्ठान मंडळ, सोलापूर, पंडित दिनदयाळ दंत महाविद्यालय सोलापूर, लोकमंगल समूह आदी विविध संस्थांच्या माध्यमातून ते सामाजिक कार्य करीत आहेत. १९९८ ते २००३ पर्यंत ते महाराष्ट्र विधानपरिषदेचे सदस्य होते. मे २००४ ते एप्रिल २००९ पर्यंत ते लोकसभा सदस्य होते. ऑक्टोबर २०१४ पासून ते महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य आहेत.

## महादेव जगन्नाथ जानकर (पशूसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय मंत्री)



श्री.महादेव जानकर यांचा जन्म ०२ जून, १९६८ रोजी वाढे (तालुका-सातारा, जिल्हा-सातारा) येथे झाला. एच.एस.सी., डिप्लोमा इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग पर्यंत त्यांचे शिक्षण झाले आहे. त्यांना मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषा अवगत आहेत. श्री. जानकर अविवाहित ३१ मे, २००३ पासून राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक-अध्यक्ष आहेत. ते महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित झालेले विधानपरिषद सदस्य आहेत.

१९९०-९१ साली वालचंद्र इंजिनिअरिंग कॉलेज, सांगली येथे विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून कार्यरत होते. जानेवारी, २०१५ मध्ये त्यांची महाराष्ट्र विधानपरिषदेवर निवड झाली आहे.

### राज्यमंत्री

**दिलीप कांबळे :** सामाजिक न्याय आणि विशेष साहाय्य, मदत व पुनर्वसन, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्यांक विकास व वक्फ.
**विद्या ठाकूर :** महिला व बाल विकास
**विजय देशमुख :** सार्वजनिक आरोग्य, परिवहन, कामगार, राज्य उत्पादन शुल्क
**संजय राठोड :** महसूल
**दादाजी भुसे :** ग्रामविकास
**विजय शिवतारे :** जलसंपदा, जलसंधारण, संसदीय कार्ये
**दीपक केसरकर :** गृह (ग्रामिण), वित्त व नियोजन
**राजे अम्ब्रीशराव आत्राम :** आदिवासी विकास, वने
**रविंद्र वायकर :** गृहनिर्माण, उच्च आणि तंत्रशिक्षण
**डॉ. रणजित पाटील :** गृह (शहरे), नगरविकास, विधी आणि न्याय विभाग, संसदीय कार्ये, कौशल्य विकास आणि उद्योजकता, माजी सैनिक कल्याण
**प्रवीण पोटे-पाटील :** उद्योग आणि खनिकर्म, पर्यावरण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून)
**गुलाबराव पाटील :** सहकार
**अर्जुन खोतकर :** वस्त्रोद्योग, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास
**मदन येरावार :** ऊर्जा, पर्यटन, अन्न व औषध प्रशासन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), सामान्य प्रशासन
**सदाशिव खोत :** कृषि व फलोत्पादन, पणन
**रवींद्र चव्हाण :** बंदरे, वैद्यकीय शिक्षण, माहिती तंत्रज्ञान, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण.

## अर्जुन पंडितराव खोतकर (वस्त्रोद्योग, पशूसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यविकास राज्यमंत्री)



श्री.अर्जुन पंडितराव खोतकर यांचा जन्म १ जानेवारी १९६२ गाढेसावरगांव, (तालुका-घनसावंगी, जिल्हा-जालना) येथे झाला. बी.कॉम.पर्यंत त्यांचे शिक्षण झाले आहे. त्यांना मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषा अवगत आहेत. श्री. खोतकर हे विवाहित असून त्यांच्या पत्नीचे नाव श्रीमती सीमा असून त्यांना एकूण २ अपत्ये (एक मुलगा व एक मुलगी) आहेत. शेती हा त्यांचा व्यवसाय आहे. श्री.खोतकर जालना या मतदार संघातून निवडून आले आहेत. सन १९९०-९५, १९९५-९९, २००४-२००९ या काळात ते महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य होते. मार्च १९९७ ते फेब्रुवारी १९९९ या कालावधीत श्री.खोतकर वस्त्रोद्योग व पर्यटन खात्याचे राज्यमंत्री; तर, फेब्रुवारी १९९९ ते ऑक्टोबर १९९९ पाणी पुरवठा व स्वच्छता, माहिती व जनसंपर्क खात्याचे ते राज्यमंत्री होते.

ऑक्टोबर २०१४ मध्ये त्यांची महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड झाली.

## सदाशिव रामचंद्र खोत (कृषी व फलोत्पादन, पणन राज्यमंत्री)



श्री. सदाशिव रामचंद्र खोत यांचा जन्म १ जून १९६५ रोजी झाला. त्यांचे शिक्षण ७ वी पर्यंत झाले आहे. ते विवाहित असून त्यांना २ अपत्ये आहेत. सन १९८३ पासून श्री.खोत समाजकारणात सक्रिय असून दूध डेअरीची स्थापना, लोकसहभागातून २५ हजार वृक्षांची लागवड, सिमेंट मातीचे बंधारे आदी विविध लोकोपयोगी उपक्रमांचे नेतृत्व. १९८४ पासून शेतकरी चळवळीत सहभाग. १९९२ पासून शेतकरी संघटनेचे सांगली जिल्हाध्यक्ष. २००६ पासून खासदार राजू शेट्टी यांच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेत सक्रीय. २०१४ मध्ये शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी दुष्काळ दिलासा यात्रा. शेतकऱ्यांची मुलूखमैदानी तोफ अशी ओळख. २०१५ मध्ये शेतकरी चळवळीतील अनुभव, समस्या व अडचणी यावर 'बळीचा आक्रोश' हे पुस्तक प्रकाशित. आत्महत्याग्रस्त कुटुंबातील शेतकऱ्यांच्या १३ मुलांना दत्तक घेऊन पालकत्व.

मिळालेले पुरस्कार - २२ वे अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलन यांच्याकडून राजकीय व सामाजिक क्षेत्रातील कार्याबद्दल सन्मानपत्र (मे २०१५ तुळजापूर) क्रांतिवीर नागनाथ आण्णा नायकवडी समाजसेवा पुरस्कार (ऑक्टोबर २०१५ अंबड).

## रवींद्र चव्हाण (बंदरे, वैद्यकीय शिक्षण, माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री)



श्री.रवींद्र दत्तात्रय चव्हाण यांचा जन्म २० सप्टेंबर १९७० रोजी मुंबई येथे झाला. त्यांचे शिक्षण एस.एस.सी. पर्यंत झाले आहे. त्यांना मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषा अवगत आहेत. श्री.चव्हाण विवाहित असून त्यांना २ अपत्ये आहेत.

ते भारतीय जनता पक्षाचे आमदार असून बांधकाम हा त्यांचा व्यवसाय आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत नगरसेवक, स्थायी समिती सभापती आदी विविध पदे त्यांनी भूषवली आहेत.

डोंबिवली रिक्षा चालक-मालक संघटना या संस्थेद्वारे ३६०० रिक्षाचालकांची विमा पॉलिसी योजना त्यांनी यशस्वीपणे राबवली. बीएसयूपी (बेसीक सर्व्हिस फॉर द अर्बन पूअर) या प्रकल्पांतर्गत ८२५० गरीब झोपडपट्टीधारकांना मोफत घरे देण्याची योजना त्यांनी प्रभावीरीत्या राबवली. विद्यार्थी ज्येष्ठ नागरिक आदींच्या हितासाठी विविध योजना त्यांनी राबवल्या आहेत.

कल्याण -डोंबिवली येथील विविध सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा आदी कार्यामध्ये अग्रभागी. २००९-२०१४ महाराष्ट्र विधानसभा सदस्य, २०१४ मध्ये विधानसभेवर फेरनिवड.

## गुलाबराव पाटील (सहकार राज्यमंत्री)



श्री.गुलाबराव रघुनाथ पाटील यांचा जन्म ५ जून १९६७ रोजी बोरखेडा, तालुका-धरणगाव, जिल्हा-जळगाव येथे झाला असून त्यांचे शिक्षण एस.एस.सी. पर्यंत झाले आहे. त्यांना मराठी, हिंदी, इंग्रजी व मारवाडी भाषा अवगत आहेत. श्री.गुलाबराव पाटील हे विवाहित असून त्यांना एकूण तीन अपत्ये आहेत. गरीब व अपंग विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आणि उन्नतीसाठी विविध मदत कार्य; रक्तदान-शिबिरांचे आयोजन; सामाजिक अन्यायाविरुद्धच्या जनआंदोलनात सक्रीय सहभाग; १९९२-९७ सदस्य, पंचायत समिती; १९९७-९८ सदस्य व सभापती, एरंडोल पंचायत समिती; १९९७ सदस्य व सभापती, कृषी समिती जिल्हा परिषद, जळगाव व १९९५-९७ संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, धरणगाव; १९९६-९९ सदस्य, म्हाडा नाशिक विभाग; १९८४-८९ शिवसेना पक्षाचे शाखाप्रमुख, उप तालुका प्रमुख व १९९६ जिल्हा प्रमूख, २००३ उपनेता म्हणून कार्य. सन १९९९-२००४, २००४-२००९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; विधानमंडळाच्या पंचायत राज, रोजगार हमी, अंदाज समिती, आश्वासन समितीचे सदस्य; ऑक्टोबर २०१४ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड.

## मदन मधुकरराव येरावार (ऊर्जा, पर्यटन, अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री)



श्री. मदन येरावार यांचा जन्म दि. २६ जानेवारी १९६३ रोजी यवतमाळ येथे झाला. त्यांचे शिक्षण डी.फार्म. पर्यंत झाले असून त्यांना मराठी, हिंदी व इंग्रजी भाषा अवगत आहेत. श्री. मदन येरावार हे विवाहित असून त्यांना दोन अपत्ये आहेत.

अध्यक्ष, सोशल ग्रुप; रक्तदान शिबिर, वधुवरसूचक मेळावे, सामूहिक विवाह, जातीय सलोखा मेळाव्यांचे आयोजन; १९९१-९४ अध्यक्ष, भारतीय जनता युवा मोर्चा, १९९४-१९९६ जिल्हा सरचिटणीस, भारतीय जनता पार्टी; १९९१-१९९६ नगरसेवक व १९९१-१९९२ सभापती, बांधकाम समिती, नगरपालिका, यवतमाळ; १९९६-१९९९, २००४-२००९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; ऑक्टोबर २०१४ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड. यवतमाळच्या कायमस्वरूपी पाणीपुरवठ्यासंदर्भात केलेले योगदान महत्त्वपूर्ण ठरले. उत्कृष्ट संसदपटू म्हणून त्यांची ओळख आहे.

# नवे केंद्रीय मंत्री



प्रकाश केशव जावडेकर
(मनुष्यबळ विकास)

**जन्म ठिकाण :** पुणे
**शिक्षण :** बी. कॉम.,
**व्यवसाय :** समाजकारण, **पक्ष :** भा.ज.प.
**मतदारसंघ :** मध्य प्रदेशातून राज्यसभा खासदार, यापूर्वी पर्यावरण मंत्री होते.



रामदास आठवले
(सामाजिक न्याय मंत्री)

**जन्म ठिकाण :** आगळगाव, जि. सांगली. **शिक्षण :** पदवीपूर्व.
**व्यवसाय :** समाजकारण, **पक्ष :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) **मतदारसंघ :** महाराष्ट्रातून राज्यसभेवर



डॉ. सुभाष भामरे
(संरक्षण राज्यमंत्री)

**जन्म ठिकाण :** मालपूर (जि. धुळे) **शिक्षण :** एमबीबीएस, एमएस, **व्यवसाय :** वैद्यकीय सेवा, **मतदारसंघ :** धुळे, लोकसभा

## केंद्रीय राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार)

**राव इन्द्रजीत सिंह :** योजना मंत्रालय, नगर विकास
**बंडारू दत्तात्रेय :** श्रम, रोजगार
**राजीव प्रताव रूडी :** कौशल्य विकास
**विजय गोयल :** क्रीडा व युवक कल्याण
**श्रीपाद येस्सो नाईक :** आयुर्वेद योग व प्राकृतिक चिकित्सा
**धर्मेंद्र प्रधान :** पेट्रोलियम व प्राकृतिक गॅस
**पियूष गोयल :** ऊर्जा, कोळसा व खान
**डॉ. जितेन्द्र सिंह :** उत्तरपूर्व राज्य विकास
**निर्मला सीतारमण :** वाणिज्य उद्योग
**डॉ. महेश शर्मा :** सांस्कृतिक व पर्यटन
**मनोज सिन्हा :** दूरसंचार, रेल्वे
**अनिल माधव दवे :** पर्यावरण व वने
**मुख्तार अब्बास नकवी :** अल्पसंख्याक, संसदीय कार्य



**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी**
कर्मिक, सार्वजनिक तक्रारी आणि पेन्शन, अणुऊर्जा विभाग, अंतराळ

## कॅबिनेट मंत्री

**राजनाथसिंह :** गृह
**सुषमा स्वराज :** परराष्ट्र व्यवहार
**अरूण जेटली :** वित्त व उद्योग
**एम. व्यंकय्या नायडू :** नगरविकास, गृहनिर्माण आणि नागरी दारिद्र्य निर्मूलन, माहिती व प्रसारण
**नितीन जयराम गडकरी :** रस्ते वाहतूक आणि महामार्ग, जलवाहतुक,
**मनोहर पर्रीकर :** संरक्षणमंत्री,
**सुरेश प्रभू :** रेल्वे,
**डी. व्ही. सदानंद गौडा :** सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी
**उमा भारती :** जलस्रोत, नदी विकास आणि गंगा पुनरूज्जीवन
**रामविलास पासवान :** ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण
**कलराज मिश्र :** सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग
**मनेका गांधी :** महिला आणि बालकल्याण
**अनंत कुमार :** रसायने व खते, संसदीय कामकाज
**रविशंकर प्रसाद :** विधी आणि न्याय, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती व तंत्रज्ञान
**जे.पी . नड्डा :** आरोग्य व कुटुंबकल्याण
**पी. अशोक गजपती राजू :** नागरी उड्डयण
**अनंत गिते :** अवजड व सार्वजनिक उद्योग
**हरसिमरत कौर बादल :** अन्नप्रक्रिया
**नरेंद्रसिंह तोमर :** ग्रामविकास, पंचायत राज, पेयजल आणि स्वच्छता
**चौधरी बिरेंद्रसिंग :** पोलाद
**जुएल ओराम :** आदिवासी व्यवहार
**राधामोहनसिंह :** कृषी, शेतकरी कल्याण
**थावरचंद गहलोत :** सामाजिक न्याय व सबलीकरण
**स्मृती इराणी :** वस्त्रोद्योग
**हर्षवर्धन :** विज्ञान आणि तंत्रज्ञान
**प्रकाश जावडेकर :** मनुष्यबळ विकास

## केंद्रीय राज्यमंत्री

**जनरल व्ही. के. सिंग :** परराष्ट्र व्यवहार
**संतोकुमार गंगवाल :** वित्त
**फग्गनसिंग कुलस्ते/अनुप्रिया पटेल :** आरोग्य आणि कुटुंब कल्याण
**एस. एस. अहलुवालिया :** कृषी आणि सांसदीय कार्य
**रामदास आठवले :** सामाजिक न्याय व सबलीकरण
**रामकृपाल यादव :** ग्रामविकास
**हरीभाई चौधरी, गिरीराज सिंह :** सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योग
**हंसराज अहीर/किरेन रिजिजू :** गृह
**रमेश जिगाजिनागी :** पाणीपुरवठा व स्वच्छता
**राजेश गोहन :** रेल्वे
**पुरुषोत्तम रूपाला :** कृषी, पंचायती राज
**एम. जे. अकबर :** परराष्ट्र व्यवहार
**उपेंद्र कुशवाह/महेंद्रनाथ पांडे :** मनुष्यबळ विकास
**पी. राधाकृष्णन :** भूपृष्ठ आणि जहाज वाहतूक
**कृष्णन पाल :** सामाजिक न्याय आणि सबलीकरण
**जसवंतसिंह भाबोर :** आदिवासी विकास
**संजीवकुमार बलियान :** जलसंपदा
**सुदर्शन भगत :** कृषी
**विष्णु साई :** पोलाद
**वाय. एस. चौधरी :** विज्ञान व तंत्रज्ञान
**जयंत सिन्हा :** नागरी विमान वाहतूक
**राजवर्धन राठोड :** माहिती आणि प्रसारण
**बाबूल सुप्रियो :** अवजड उद्योग
**साध्वी निरंजन ज्योती :** अन्न प्रक्रिया उद्योग
**विजय सांपला :** सामाजिक न्याय व सबलीकरण
**अर्जुन राम मेघवाल :** वित्त व कंपनी व्यवहार/**अजय टम्टा :** वस्त्रोद्योग
**कृष्णा राज :** महिला व बालकल्याण
**मनसुख मांडविया :** भूपृष्ठ व जहाज वाहतूक
**सी. आर. चौधरी :** ग्राहक कल्याण आणि अन्न व नागरी पुरवठा
**पी. पी. चौधरी :** विधी व न्याय, माहिती तंत्रज्ञान
**डॉ. सुभाष भामरे :** संरक्षण

# चक्रावतीला नवसंजीवनी

**यवतमाळपासून अवघ्या २० किलोमीटर अंतरावरील समृद्ध पौराणिक वारसा लाभलेल्या कळंब शहराने जलयुक्त शिवारच्या दिशेने टाकलेले यशस्वी पाऊल उल्लेखनीय आहे. १७ हजार लोकसंख्येचे हे तालुक्याचे ठिकाण. या शहराच्या मध्यभागातून खळाळत वाहणारी शहराची जीवनदायिनी चक्रावती नदीच्या पुनरुज्जीवनाचा ध्यास आमदार प्रा. डॉ. अशोक उईके व नागरिकांनी घेतला आणि बघता-बघता नदीचे रुंदीकरण व खोलीकरण पूर्ण होऊन नदीला गतवैभव प्राप्त झाले.**

शहरातून वाहणाऱ्या चक्रावती नदीचे गेल्या काही दशकांपासून समृद्ध वैभव लयास गेले होते. राज्यामधील दुष्काळासदृश्य स्थितीमुळे कळंबला पाणी टंचाईच्या तीव्र झळा सहन कराव्या लागल्या. मात्र लोकप्रतिनिधीने मनात आणले तर दुष्काळसदृश्य परिस्थितीत खूप मोठा कायापालट करता येतो हे येथे झालेल्या जलयुक्त शिवारच्या कामावरून दिसून येते. शहराची जीवनदायिनी असलेल्या चक्रावतीचे रुंदीकरण व खोलीकरण केल्यास शहर व परिसराला मोठ्या प्रमाणावर फायदा होईल. भूगर्भातील पाणी पातळी वाढण्यास मदत होईल हे लक्षात घेऊन कळंब राळेगांव मतदार संघाचे आमदार प्रा. डॉ. अशोक उईके यांनी पुढाकार घेऊन नागरिकांना साद घातली. आपल्या संघटन कौशल्याचा वापर करत नागरिकांसोबतच मतदार संघातील सर्वपक्षीय नेते व कार्यकर्त्यांचा विकास संघ तयार करून पाणीटंचाईवर कायमस्वरूपी मार्ग काढण्याचा संकल्प केला. त्याप्रमाणे आराखडा तयार केला. कायमस्वरुपी दुष्काळमुक्ती हा आपला संकल्प असल्याची प्रत्येकाला जाणीव करून दिली. त्यामुळे नागरिकांचा या कामी सक्रिय सहभाग लाभला. या सहभागातून जनसहकार्यासह या महत्त्वाकांक्षी कार्याचा श्रीगणेशा झाला.

### निश्चय

चक्रावतीच्या पुनरुज्जीवनासाठी नदीप्रवाहाचे रुंदीकरण आणि खोलीकरणाच्या कामाला वेग आला. हा आता केवळ संकल्प न राहता ती लोकचळवळ झाली. हा प्रकल्प या छोट्याशा शहराच्या दृष्टीने मोठाच. त्यामुळे सर्वांनी त्यांच्या अडीअडचणी, हेवेदावे बाजूला ठेवून चक्रावती मिशन अंतर्गत मिशन मोडवर काम केले. नदी रुंदीकरण आणि खोलीकरणासाठी ४-५ किलोमीटर लांबीचा नदीपात्र प्रवाह निश्चित करण्यात आला. दरम्यान या कार्यासाठी विविध समस्या व अडचणींचा सामना करावा लागला. मोठ्या प्रमाणावर साधन सामग्री लागणार असल्याने आर्थिक समस्या मोठी समस्या होती. निधी उभारणी, लोकसहभाग, प्रशासन सहभाग त्याचप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्था, नगरपंचायत आदींच्या सहभागातून या अडचणीवर मात केली गेली

### उद्दिष्टपूर्ती

नदी पुनरुज्जीवनासाठी आर्थिक निधी उभारणीसाठी आमदार उईके यांनी पुढाकार घेऊन एक महिन्याचे वेतन दिले. तर उपविभागीय अधिकारी श्री. अपार, तहसीलदार श्री. काकडे, नगरपंचायत सदस्य श्री. मांडवकर यांनी भरीव मदत केली. २ लाख ४५ हजार एवढा निधी उभा राहिला. नागरिकांनीदेखील शक्य होईल. तेवढा आपला आर्थिक सहभाग दिला. कुणी आपल्याकडील जेसीपी तर कुणी ट्रॅक्टरमोफत उपलब्ध करून दिले. नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर श्रमदान केले. या कार्याची तांत्रिक जबाबदारी जिल्हा परिषद उपअभियंता श्री. शहारे यांनी उत्स्फूर्तपणे आणि मेहनत घेऊन यशस्वीपणे सांभाळली. स्थानिक स्वराज्य संस्था, लोकप्रतिनिधींसोबतच अबालवृद्धांनी काम केल्यामुळे अवघ्या तीन आठवड्याच्या कालावधीत २ किलोमीटर एवढ्या लांबीच्या नदी प्रवाहाचे रुंदीकरण व



खोलीकरणाचे उद्दिष्ट साध्य झाले. नदीला पुन्हा तिचे गतवैभव प्राप्त झाले. हे अभियान तीन टप्प्यामध्ये यशस्वीपणे पूर्ण झाले. नदीच्या तीरावरील अनेक पुरातन मंदिरांवरून नदीचे पौराणिक धार्मिक महत्त्व लक्षात येते. एकीच्या बळात किती मोठी शक्ती आहे हे यावरून पटते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कार्याचे अवलोकन करून कौतुक केले. राज्यभरात जलयुक्त शिवार योजनेची असंख्य कामे स्वयंस्फूर्तीतून होत आहेत. त्यामुळे नागरिकांनी अशी कामे केल्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वप्नातील दुष्काळमुक्त महाराष्ट्र लवकरच आपल्याला बघायला मिळेल, असा विश्वास आमदार प्रा. डॉ. अशोक उईके यांनी व्यक्त केला आहे.

**डॉ. गिरीश कांबळे**

## आयटीआयमध्ये व्हर्च्युअल आणि डिजिटल क्लासरूम

**राज्यातील** सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) व्हर्च्युअल आणि डिजिटल क्लासरूमची सुविधा टप्प्याटप्प्याने उपलब्ध करण्यात येणार असून त्यामुळे विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षणाची नवीन दालने खुली होण्यासह ग्रामीण आणि शहरी भागातील शैक्षणिक दरी कमी होणार आहे.

जागतिक युवा कौशल्य विकास दिनानिमित्ताने राज्यातील ३२ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये व्हर्च्युअज क्लासरुम प्रकल्पाचा शुभारंभ टाटा ट्रस्टच्या अंधेरी येथील स्टुडिओमध्ये मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते नुकताच करण्यात आला. या कार्यक्रमास कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री संभाजी पाटील-निलंगेकर, विभागाचे प्रधान सचिव दीपक कपूर आदी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री म्हणाले, ‘कौशल्य प्रशिक्षणातून सर्वांना समान संधी मिळणार आहे. या उपक्रमामुळे मुंबईच्या आयटीआयमध्ये मिळणारे शिक्षण गडचिरोलीसारख्या दुर्गम भागात उपलब्ध होईल. या माध्यमातून अभ्यासक्रमात समानता आणून ग्रामीण आणि शहरी यातील अंतर कमी करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.



**कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री संभाजी पाटील-निलंगेकर, प्रधान सचिव दीपक कपूर, राज्य कौशल्य विकास सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी विजय वाघमारे, टाटा ट्रस्टचे बर्जिस तारापोरवाला आदी.**

कौशल्य प्रशिक्षणातून निर्माण होणाऱ्या मनुष्यबळामुळे बेरोजगारीची समस्या संपविण्यासाठी मोठा हातभार लागणार आहे. विविध उद्योगांसह कृषी क्षेत्रात मनुष्यबळाचा पुरवठा करणे शक्य होणार आहे. सध्या ४० हजार विद्यार्थी कौशल्य प्रशिक्षण घेत असून त्यामध्ये २५ हजार मुलींचा समावेश आहे. महाराष्ट्राने मुद्रा योजनेत पुढाकार घेतला असून १० लाख रूपयांपर्यंतचे अर्थसाहाय्य कोणत्याही हमीविना दिले जाते.’

## प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र – सामंजस्य करार

**प्रगत** शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागातील विशेष लक्षकेंद्रित जिल्ह्यातील निवडक शाळांमध्ये सर्व मुलांच्या शिक्षणासाठी शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव नंदकुमार आणि एडलवाईज ग्रुप अंतर्गत कार्यरत एडलगिव्ह फाउंडेशन, मुंबईच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती विद्या शहा यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. या करारान्वये केंद्र सरकारने जाहीर केलेल्या विशेष लक्षकेंद्रित जिल्ह्यातील कठीण परिस्थितीतील परभणी (मानवत), गडचिरोली (भामरागड), अमरावती (चिखलदरा) व नंदुरबार (नंदुरबार) या जिल्ह्यातील नमूद तालुक्यातील प्रत्येकी एक शैक्षणिक बीट व त्या अंतर्गत समाविष्ट सर्व शासकीय शाळांची निवड करून व क्षेत्रातील १०० टक्के मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण तसेच सर्व प्रकारच्या शैक्षणिक व भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. यामध्ये शासन, स्थानिक प्राधिकरण, पर्यवेक्षीय यंत्रणा, शाळा, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती व समाज यांचे सहकार्य घेण्यात येणार आहे. यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे.



## मराठीच्या संगणकीय प्रमाणीकरणासाठी राज्य ‘युनिकोड कन्सॉर्शियम’चे सदस्य

**युनिकोड** कन्सॉर्शियम या लिपिचिन्हांचे प्रमाणीकरण करणाऱ्या आंतरराष्ट्रीय संस्थेचे सदस्यत्व मराठी भाषा विभागाच्या अंतर्गत कार्यरत राज्य मराठी विकास संस्थेने प्राप्त केले आहे. परिणामी, महाराष्ट्राने गुगल, फेसबूक, आयबीएम, मायक्रोसॉफ्ट, ओरॅकल, सॅप, सीमॅन्टेक अशा युनिकोडच्या सदस्यांच्या रांगेत स्थान प्राप्त केले आहे. असे सदस्यत्व प्राप्त करणारे महाराष्ट्र हे भारतातील दुसरे राज्य आहे. मराठी भाषा, युनिकोड पद्धत, संगणक व मोबाईल तंत्रज्ञान आणि देवनागरी लिपी यांच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील समन्वयासाठी आणि प्रमाणीकरणासाठी हे महत्त्वाचे पाऊल आहे.

मराठी भाषा आणि देवनागरी लिपी याबद्दलच्या तंत्रज्ञानात्मक गरजा कन्सॉर्शियमच्या सदस्य कंपन्यांना कळवणे, आता शासनाला सहज शक्य होणार आहे. त्याचबरोबर, सदस्य-कंपन्यांच्या सॉफ्टवेअर्समध्ये युनिकोड-मराठी परिपूर्णतेने चालत नसेल, तर तशा सूचना शासन सदस्य-कंपन्यांना देऊ शकते. ह्या सदस्यत्वामुळे जागतिक स्तरावर, राज्य शासनाला या संदर्भात मताधिकारही प्राप्त झाला आहे.

मराठी भाषा व संस्कृतीशी जोडलेल्या विविध चिन्हांना आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रमाणित मान्यता मिळविण्यासाठी जनतेने या प्रक्रियेत सहभाग नोंदवावा आणि निवडक लिपिचिन्हे व भावचिन्हे mumbaiyahoo.com या पत्त्यावर पाठवावीत, असे आवाहन मराठी भाषा मंत्री श्री. विनोद तावडे यांनी केले आहे.

## सेवाग्राम विकास नियंत्रण आराखड्यास मंजुरी



**महात्मा** गांधी यांच्या जयंतीस २ ऑक्टोबर, २०१९ रोजी दीडशे वर्षे पूर्ण होत आहे. त्यानिमित्त तयार करण्यात आलेल्या २६६.५३ कोटी रुपयांच्या सेवाग्राम विकास आराखड्यास राज्यस्तरीय शिखर समितीच्या बैठकीत तत्त्वतः मंजुरी देण्यात आली आहे.

सेवाग्राम विकास आराखड्याचे चार टप्पे करण्यात आले आहे. प्रथम टप्प्यात सेवाग्राम आश्रम व परिसराचा विकास करण्यात येणार असून यासाठी ४२.७९ कोटींचा प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे. दुसऱ्या टप्प्यात 'गांधी फॉर टुमॉरो' अंतर्गत गांधी संसाधन व प्रशिक्षण केंद्र तयार करण्यात येणार आहे. तिसऱ्या टप्प्यात सेवाग्राम, वर्धा आणि पवनार परिसरातील वारसा पर्यटन : हेरिटेज ट्रेल अंतर्गत विविध वारसास्थळांना जोडणारे मार्ग, शहर आराखड्यात सुधारणा, स्थानिक व पर्यटकांसाठी करमणुकीच्या सुविधेसह सार्वजनिक केंद्र तयार करण्याबाबत ३५.६१ कोटी रुपयांचा प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे. चौथ्या व अंतिम टप्प्यात पर्यावरणीय प्रकल्पात पवनार येथील धाम नदीचे पुनरुज्जीवन व पवनार आश्रम येथील नदी घाटांचा विकास करण्यात येणार असून यासाठी ४२.६५ कोटी रुपयांचा प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे.

## नागपूर-मुंबई दरम्यान महाराष्ट्र समृद्धी महामार्ग

**राज्याच्या** परिवहनात क्रांती घडवणारा नागपूर-मुंबई शीघ्रसंचार द्रुतगती मार्ग, त्याचे जोडरस्ते व त्यावरील प्रस्तावित नवनगरांच्या उभारणीसाठी आवश्यक असणाऱ्या जमिनी शेतकऱ्यांकडून लँड पुलिंग योजनेद्वारे पूर्वसंमती घेऊन भागीदारी पद्धतीने प्राप्त करून घेण्याच्या निर्णयास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या मार्गाचे नामकरण महाराष्ट्र समृद्धी महामार्ग असे करण्यासह मान्यता देण्यात आली. या मार्गावर उभारण्यात येणारी २४ प्रस्तावित नवनगरे ही कृषी समृद्धी केंद्रे म्हणून ओळखली जाणार आहेत.

हा महामार्ग राज्यातील नागपूर, अमरावती, औरंगाबाद व नाशिक व कोकण या पाच महसूल विभागातील नागपूर, वर्धा, अमरावती, वाशिम, बुलढाणा, जालना, औरंगाबाद, अहमदनगर, नाशिक व ठाणे या दहा जिल्ह्यातील २७ तालुक्यांच्या ३५० गावांमधून जाणार आहे. नागपूर ते भिवंडीपर्यंतच्या ७१० किलोमीटर अंतरापर्यंतच्या या नियोजित मार्गाची आखणी प्रामुख्याने जास्त लोकवस्ती, बागायती जमीन, मोठी धरणे, वनजमिनी, जलाशये आणि जंगले टाळून करण्यात आलेली आहे. या मार्गाची रुंदी १२० मीटर एवढी प्रशस्त असल्याने निव्वळ रस्त्यांसाठी नऊ हजार हेक्टर आणि त्याच्या जोडरस्त्यांसाठी एक हजार हेक्टर याप्रमाणे एकूण १० हजार हेक्टर जमीन आवश्यक आहे.


मंत्रिमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीने या द्रुतगती मार्गाची ग्रीन फिल्ड अलाईनमेंट करण्यासह या प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास अंमलबजावणी यंत्रणा म्हणून नियुक्त करण्यास मान्यता दिली आहे. या द्रुतगती मार्गाच्या विकास व बांधणीसाठी लँड पूल मॉडेलचा अवलंब करण्यात येणार आहे. ही जमीन शेतकऱ्यांकडून भागीदारी पद्धतीने मिळविताना संबंधितांना जमिनीच्या मोबदल्यात यामार्गावर विविध पायाभूत सुविधांसह निर्माण करण्यात येणाऱ्या २४ नवनगरांमध्ये रहिवासी व वाणिज्यिक वापरासाठी तसेच विविध उद्योग, सेवा या क्षेत्रात भविष्यात होणाऱ्या विकासासाठी उपयुक्त ठरू शकणाऱ्या क्षेत्रात बिनशेती भूखंड देणे प्रस्तावित आहे. अशा नवनगरांसाठी प्रत्येकी ५०० हेक्टर याप्रमाणे २४ नवनगरांसाठी एकूण १२ हजार हेक्टर जमीन आवश्यक आहे. त्यामुळे आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला.

नियोजित द्रुतगती मार्ग प्रकल्पामध्ये लँड पुलिंग योजनेंतर्गत भूधारकांना संपादित जमिनीच्या मोबदल्यात बिनशेती विकसित जमीन किंवा भूखंड देण्यात येणार आहेत. या लँड पुलिंग योजनेंतर्गत ही जमीन शासनामार्फत विकसित होणार असून या जमिनीस अपेक्षित बाजारमूल्य न मिळाल्यास ती शासनाकडून बाजारमूल्याने खरेदी करण्यात येणार आहे.



## एव्हरेस्टवीर रफिकला तत्पर मदत

**जगातील** सर्वोच्च शिखर असलेले एव्हरेस्ट शिखर यशस्वीपणे सर करणाऱ्या औरंगाबाद येथील हवालदार रफिक शेख ताहेर पटेल यांनी नुकताच एव्हरेस्टवर तिरंगा फडकवला. एव्हरेस्ट सर करणारा महाराष्ट्र पोलीस दलातील रफिक शेख हा पहिला पोलीस आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील खुलताबाद तालुक्यातील शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या रफिक शेख यांनी तिसऱ्या प्रयत्नात एव्हरेस्ट सर केले. एव्हरेस्टवर चढाईसाठी त्यांना एक महिना १५ दिवस लागले. दरम्यान एव्हरेस्ट उतरताना त्यांच्या पायाला हिमदंश झाला. त्यांना काठमांडू येथे उपचारासाठी हलविण्यात आले. परंतु दुखापत गंभीर असल्याने विशेष तज्ज्ञांकडून उपचार होणे आवश्यक होते. हे उपचार दिल्ली येथील आर्मी रिसर्च ॲण्ड रेफरल हॉस्पिटलमध्ये उपलब्ध असल्याने त्यांना तेथे हलवणे गरजेचे होते. याबाबत माहिती मिळताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने संरक्षणमंत्री मनोहर पर्रिकर यांच्याशी संपर्क साधला. काठमांडू येथून दिल्लीच्या आर्मी हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले. निष्णात डॉक्टरांकडून उपचार करण्यात आले. रुग्णालयातून बरे होऊन महाराष्ट्रात आल्यानंतर श्री. शेख यांनी घरी जाण्यापूर्वी सर्वप्रथम मुंबईत येऊन मुख्यमंत्र्यांची मंत्रालयात भेट घेऊन तत्पर मदतीबद्दल आभार मानले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी रफिक शेख यांच्या मोहिमेसाठी व उपचारासाठी आलेला सुमारे ३५ लाखांचा खर्च राज्य शासन करणार असल्याची घोषणा केली.



## हाळगाव येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषी महाविद्यालय

**राहुरी** येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठांतर्गत अहमदनगर जिल्ह्यातील हाळगाव (ता. जामखेड) येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषी महाविद्यालय स्थापन करण्यास मंत्रिपरिषदेत मान्यता देण्यात आली.



क्षेत्रफळ आणि लोकसंख्येनुसार मोठा असलेल्या अहमदनगर जिल्ह्यामध्ये शेतीखालील क्षेत्र मोठे आहे. त्यामुळे या जिल्ह्यात कृषी महाविद्यालय स्थापन झाल्यास कृषी विकासाला चालना मिळेल. शिवाय स्वयंरोजगार आधारित कुटीरोद्योग उभे करण्यासाठी स्थानिक पातळीवर मनुष्यबळ निर्माण होईल. या महाविद्यालयासाठी आवश्यक असणाऱ्या ६४ शिक्षकवर्गीय व ३७ शिक्षकेतर अशा १०१ पदांच्या निर्मितीसाठी उच्चस्तर समितीची मान्यता घेऊन मंत्रिमंडळाच्या मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करण्याचे आदेश यावेळी देण्यात आले.

## सर्व समाजासाठी गावात एकच स्मशानभूमी

**गावातील** स्मशानभूमी ही वेगवेगळ्या समाजासाठी वेगवेगळी ठेवण्यापेक्षा सर्व समाजासाठी एकच स्मशानभूमी असावी. यासंदर्भात ग्रामपंचायतीने येत्या २ ऑक्टोबर रोजीच्या विशेष ग्रामसभेत तसा ठराव करून तो स्मशानभूमीच्या दर्शनी भागात लावावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

---

राज्य शासनामार्फत अनुसूचित जातीसाठी बांधण्यात येणाऱ्या १ लाख ७५ घरांपैकी २५ हजार घरे ही मातंग समाजातील गरजूंसाठी ठेवण्यात येणार आहेत.

## मुंबईचे डबेवाले स्वच्छता दूत

**स्वच्छ** भारत अभियान हे अभियान न राहता आता एक लोकचळवळ झाली असून या चळवळीत मुंबईतील डबेवाले सामील झाले आहेत. जेवणापूर्वी हात स्वच्छ धुवावे, डब्यातील शिल्लक अन्न इतरत्र न टाकता ते कचरा पेटीतच टाकावे हा स्वच्छतेचा संदेश २ लाख कुटुंबांपर्यंत हे डबेवाले पोहोचवणार आहेत.

अंधेरी रेल्वे स्टेशन येथे ‘स्वच्छ भारत मिशन’चे प्रकल्प संचालक प्रवीण प्रकाश यांच्या हस्ते या मोहिमेचा शुभारंभ झाला. यावेळी स्वच्छ महाराष्ट्र अभियानचे संचालक उदय टेकाडे, मुंबई डबेवाला संघटनेचे माजी अध्यक्ष रघुनाथ मदगे उपस्थित होते. दरम्यान यावेळी प्रातिनिधिक स्वरूपात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डब्यांवर स्टिकर लावण्यात आले. स्वच्छ भारत अभियानात डबेवाले स्वयंस्फूर्तीने सहभागी होऊन स्वच्छतेचा संदेश देणार आहेत, ही या अभियानाची फलश्रुती आहे.



दररोज दोन लाख व्यक्तींपर्यंत डब्बे पोहोचविण्याचे काम करतात. या डब्यांवर लावण्यात आलेल्या स्वच्छतेच्या संदेशामुळे डब्बेवाल्या व्यक्ती व त्यांचे कुटुंब यांच्यामध्ये स्वच्छतेची शिस्त येण्यास मदत होईल.

## नागपूर आयआयआयटी परिसरातच विधी संस्कृत विश्वविद्यालय

**राष्ट्रीय** आणि राज्य स्तरावरील शैक्षणिक संस्था एकाच शैक्षणिक संकुलात येण्यासाठी महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ आणि कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयांना वारंगा (ता. नागपूर) येथील इंडियन इंस्टिट्यूट ऑफ इन्फरमेशन टेक्नॉलॉजीच्या परिसरातील जमीन देण्याचा निर्णय मंत्रिपरिषदेच्या बैठकीत घेण्यात आला. त्यासाठी यासंदर्भात यापूर्वी घेण्यात आलेल्या निर्णयात बदल करण्यात आला आहे.

नागपुरात होत असलेले विधी विद्यापीठ, संस्कृत विश्वविद्यालय आणि आयआयआयटी यांना वेगवेगळ्या ठिकाणी जमिनी मंजूर झाल्याने शैक्षणिक संस्थांचे संकुल उभारण्यात अडचणी येत होत्या. शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने सर्व शैक्षणिक संस्थांना एकाच परिसरात जमिनी उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी त्या-त्या संस्थांकडून होत होती. त्यानुसार महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठास काळडोंगरी येथील २४.२९ हेक्टर जमीन यापूर्वी मंजूर करण्यात आली होती.

## राज्यात यावर्षी 'लोकमान्य सार्वजनिक गणेशोत्सव'

**लोकमान्य** टिळक यांच्या १६० व्या जयंती वर्षानिमित्त 'स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळणावरच' या घोषणेस १०० वर्षपूर्ण होत असल्याबद्दल तसेच सार्वजनिक गणेशोत्सवाला १२५ वर्षे पूर्ण होत असल्याबद्दल राज्यात २०१६ व २०१७ यावर्षी लोकमान्य सार्वजनिक गणेशोत्सव महोत्सव व लोकमान्य उत्सव साजरा करण्यात येत असल्याची घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री विनोद तावडे यांनी विधानपरिषदेत केली. लोकमान्य सार्वजनिक गणेशोत्सव अभियान दि. ५ ते १५ सप्टेंबर, २०१६ या कालावधीत राबवण्यात येईल. या अभियानात स्वदेशी, साक्षरता, बेटी बचाव, व्यसनमुक्ती व जलसंवर्धन या एका कल्पनेशी निगडित जनजागृती देखावा दर्शवणे आवश्यक आहे. ही



स्पर्धा तालुका, जिल्हा आणि विभागस्तरावर राबवण्यात येणार आहे. स्पर्धेत सहभागासाठी तालुक्याच्या गटशिक्षण अधिकाऱ्यांकडे अर्ज सादर करावे लागेल. विजेत्यांना विभागीय स्तरावर प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकासाठी अनुक्रमे २ लाख रुपये, दीड लाख रुपये व १ लाख रुपये, जिल्हा स्तरासाठी प्रथम १ लाख, द्वितीय ७५ हजार, तृतीय ५० हजार तर तालुकास्तरासाठी अनुक्रमे २५, १५, १० हजार रोख पारितोषिक देण्यात येणार आहे.

## हेल्मेट नाही तर पेट्रोल नाही



हेल्मेट परिधान न करणाऱ्या दुचाकी वाहनचालकांना पेट्रोलपंपावर इंधन पुरवठा न करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याची माहिती परिवहन मंत्री दिवाकर रावते यांनी नुकतीच विधानपरिषद व विधानसभेत दिली. सर्वोच्च न्यायालयाद्वारे नियुक्त केलेल्या रस्ता सुरक्षा समितीने मोटार वाहन कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. या कायद्यानुसार दुचाकी वाहन चालकाने व त्यासोबत बसणाऱ्या व्यक्तीने हेल्मेट वापरणे बंधनकारक आहे.

## अध्यापकांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे

**राज्यातील** उच्च व तंत्र शिक्षण क्षेत्रात कार्यरत अध्यापकांचे सेवानिवृत्तीचे वय ६२ वर्षे करण्याबाबत २०११-१२ दरम्यान घेण्यात आलेल्या निर्णयांचा पुनर्विचार करून त्यांच्या सेवानिवृत्तीचे वय आता ६० वर्षे करण्याचा निर्णय मंत्रिपरिषदेच्या बैठकीत घेण्यात आला. प्राचार्यांच्या सेवानिवृत्तीचे वय सरसकट ६५ वर्षे करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. अकृषी विद्यापीठे, तंत्रशास्त्र विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक, ग्रंथपाल, उपग्रंथपाल, साहाय्यक ग्रंथपाल तसेच संचालक, उपसंचालक व सहायक संचालक, शारीरिक शिक्षण यांच्या सेवानिवृत्तीचे वय ६० वरून ६२ वर्षे करण्याबाबत यापूर्वी निर्णय घेण्यात आला होता. या निर्णयांचा पुनर्विचार करून त्यांच्या सेवानिवृत्तीचे वय पुन्हा ६० वर्षे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### विधानपरिषद सभापती



**विधानपरिषदेच्या सभापतीपदी रामराजे निंबाळकर यांची एकमताने निवड झाली आहे. विरोधी पक्षनेते म्हणून धनंजय मुंडे, सभागृहाचे नेते म्हणून सहकारमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांची निवड झाली आहे.**

### विश्वकोश निर्मिती मंडळ

**महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळावर विविध क्षेत्राशी निगडित २३ सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या सदस्यांपैकी दोन सदस्यांची पदे रिक्त झाल्याने डॉ. अरुणा ढेरे आणि दीपक घैसास यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती ३ वर्षांसाठी आहे.**

### 'ज्ञानोबा-तुकाराम' पुरस्कार

**राज्य शासनाच्या वतीने संत साहित्यासाठी तसेच मानवतावादी कार्यासाठी दिला जाणारा सन २०१५-१६ चा 'ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार' हा संशोधक-समीक्षक डॉ.उषा माधव देशमुख यांना घोषित करण्यात आला. संत साहित्यावर उत्कृष्ट साहित्य लिहिणाऱ्या व्यक्तीला राज्य शासनाच्या वतीने प्रतिवर्षी ज्ञानोबा तुकाराम पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. रुपये ५ लक्ष रोख, मानपत्र तसेच मानचिन्ह असे पुरस्कारांचे स्वरूप आहे.**

CM ट्विटस्

@Dev_Fadnavis

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राच्या विकासाच्या अनुषंगाने अनेक महत्त्वाचे निर्णय घेत असतात. या निर्णयांची माहिती ते तत्काळ ट्विटरद्वारे प्रसृत करतात. गतिमान आणि पारदर्शक विकासासाठी त्यांची आत्यंतिक तळमळ या ट्विटसमधून दिसून येते. गेल्या महिनाभरातील त्यांचे काही ट्विटस्.**

सिन्नर तालुक्यातील (जि. नाशिक) डुबेरे गावातील जलयुक्त शिवारच्या यशाबाबत...

Water storage capacity reaches4.16crore litre; Benefits 27acre farmland Dubere village, Nashik #JalYuktShivar results.

गुरुपौर्णिमेनिमित्त...

If the youth learns to strike a balance betweenGuru's teachings & technology, nothing can stop them from being successful in life!

व्हर्च्युअल आणि डिजिटल क्लासरूममुळे ग्रामीण–शहरी दरी कमी होण्यास मदत होईल.

क्लासरूमच्या उद्घाटनानंतर विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची उत्तरे देताना...

It's my earnest appeal to students to master the apprenticeship of your passion & jobs will come in plenty

रशियासाठी महाराष्ट्र पर्यटन व सांस्कृतिक कार्यच्या मानद राजदूत म्हणून डॉ. इरिना ग्लुशकोवा यांच्या नावाच्या घोषणेनंतर...

It was inspiring to interact & know about Dr. Irina

It is a unique project which makes the farmer, our one of the most valued partner in the development process.

मच्छी विक्रेत्या महिलांना मुद्रा बँकेचे कर्ज मिळण्याच्या दृष्टीने मच्छी विक्रीचे परवाने देण्यासंदर्भात...

Directed BMC Commissioner Ajoy Mehta to draft a licensing policy as soon as possible for fisherwomen engaged in selling fish.

These licenses will help these fisherwomen to avail loans under Government of India's MUDRA scheme.



## कृषी दिनी व्यक्त होताना...

**We are determined & working hard for betterment of farmers through #JalYuktShivar & every possible way.**

पंढरपूर येथे पर्यावरण वारीनिमित्त...

Glad that we could take Hon PM's mission of #SwachhBharat till rural Maharashtra & Swachhata Dindi was organised...

If we do not respect Mother Nature now, it will not bless us anymore. This was highlighted at 'Paryavaran Wari'..

आयटीआयसाठी व्हर्च्युअल व डिजिटल क्लासरूमच्या उद्घाटनानंतर...

Glushkova's work on Marathi language and culture of Maharashtra.

Dr. Irina Glushkova is an eminent Marathi scholar;studied history of Maratha Kings & translated many books to Russian.

नागपूर–मुंबई महाराष्ट्र समृद्धी मार्गातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांविषयी...

मंत्रिमंडळ निर्णयाची माहिती देताना...

Maharashtra Cabinet decides to give Tur Dal @ ₹120/Kg per ration card to Antyoday(AAY) and BPL ration card holders from August to October month festive season. This decision will benefit around 70,07,589 ration card holders.

९ ऑगस्ट आदिवासी दिन

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

## आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

**संस्थेचे उद्दिष्टये आणि कार्य**

- महाराष्ट्रातील अनुसूचित जमातींचा मानववंशशास्त्रीय अभ्यास करणे.
- महाराष्ट्रातील अनुसूचित जमातींच्या चालीरिती, रुढी व परंपरा यांचा अभ्यास करणे
- आदिवासी कला व संस्कृती जतन करण्याकरिता **आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय**
- अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी ऑनलाईन करण्यासाठी **आदि 'प्रमाण'** प्रणाली
- अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना **MPSC/UPSC परीक्षांसाठी प्रशिक्षण** सत्रांचे आयोजन करणे

आदि प्रमाण प्रणाली https://etribevalidity.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध
आदिवासी विकास विभागाचे संकेत स्थळ : https://tribal.maharashtra.gov.in

# आदिवासी दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...



**देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री



**विष्णू सवरा**
आदिवासी विकास मंत्री



**राजे अम्ब्रीशराव अत्राम**
आदिवासी विकास, राज्यमंत्री

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 18th to 24th August 2016
Date of Publication : 10th of every Month

# लोकमान्य : लोकराज्य




सर्वाधिक खपाचे मासिक

प्रति/ TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक ब्रिजेश सिंह, महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे–बेलापूर रोड, नवी मुंबई – ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : ब्रिजेश सिंह